
शनिवार । २६ जानेवारी १९८० । ७५ पैसे

# माणूस

## क्या हार में, क्या जीत में,
## किंचित नहीं भयभीत मैं,
## कर्तव्य पथपर जो मिले,
## यह भी सही, वह भी सही!

— अटलबिहारी वाजपेयी



गेल्या आठवडयात अटलजी मुंबईला आले असताना 'माणूस' प्रतिनिधीने त्यांची भेट व मुलाखत घेतली. मुलाखतीच्या शेवटी प्रतिनिधीने 'संदेश' मागितला. अटलजींनी वरील काव्यपंक्ती तिथल्या तिथेच एका कागदावर स्वहस्ताक्षरात लिहून आपल्यातला कवी अजून जागा असल्याची प्रचिती आणून दिली.

मुलाखत पृष्ठ....४

# आज तळोजा पेटले....उद्या बेलापूर, परवा पनवेल !

खास वार्तापत्र । चंद्रकांत दीक्षित

तळोजा औद्योगिक परिसर आज तूर्त शांत झाला आहे. या शांततेसाठी तिघांना आपले जीव गमवावे लागले आहेत आणि ८ जणांना अपंगत्व स्वीकारावे लागले आहे. एवढे झाले नसते तर शांततेला बराच अवधी लागला असता म्हणूनच औद्योगिक कलह नेहमीच जीवानिशी खेळ झाला तरच शांत होतात, हा सिद्धात होऊ पहात आहे आणि आता येथे शांतता (!) प्रस्थापित झाली आहे. येथील कारखाने सुरू झाले आहेत. सुरूही राहतील परंतु ती शांतता सूडाचे भावनेने ठिणगी पेटवून उभी राहिली आहे हे विसरता कामा नये. म्हणूनच वाटतं की, शांतता झाली खरी पण किती दिवस टिकणार? कारण परत कधीतरी आणखी काही घडणार काय? घडल्यास त्याचे स्वरूप कसे राहील? का आताच झालेल्या प्रकारारातून एकूणच औद्योगिक पट्टे व कामगार चळवळीला वेगळे वळण लागणार आहे? प्रश्न–प्रश्न आणि केवळ प्रश्नच उभे आहेत.

एक तर महाराष्ट्राच्या नवविकसित उभारणीमध्ये जी कारखानदारी उभी राहिली, उभी राहात आहे, तिचे योग्य ते सवर्धन झाले पाहिजे यात वाद असू नये. परंतु त्याचबरोबर औद्योगिकतेचे वाढीसाठी जो कामगार वर्ग आहे, त्याचेही हक्काचे संरक्षण झाले पाहिजे आणि उभयपक्षी अशी रेशीमगाठ झालीच तर ते कारखाने फुलतील, वाढतील, त्यातून विकासार्थ होणारे उत्पादन वाढेल; परंतु 'तळोजा' आज एक समस्या होऊ पहात आहे.

'तळोजा' येथे घडले तरी काय म्हणून हा प्रश्न उपस्थित झाला? खरं म्हणजे 'तळोजा' आहे कोठे तेच नकाशात पहावे लागते. पुणे–ठाणे रस्त्यावर पनवेलच्या पुढे आठ किलोमीटरवर तळोजा हे कोकणातलं गाव. तेथील परिसरात, डोंगराचे कुशीत, अगदी हाजीमलंगचे पायथ्यालगत म्हणाना. हा औद्योगिक परिसर एम्. आय्. डी. सी.ने वसविला आहे. येथे सुमारे १४०-१५० विविध प्रकारचे कारखाने उभे राहिले आहेत, काही उभे राहात आहेत. या कारखान्याचे वैशिष्टय म्हणजे त्यातल्या अनेक कारखान्यातून औषधी रसायनाचे उत्पादन केले जाते. यातले प्रत्यक्षात आज तरी ८० कारखाने चालू आहेत. काही सुरू होण्याचे मार्गावर आहेत. मुळातच सारा कारभार गेल्या दहा वर्षांचा. त्यातल्या अनेकांची उभारणी १९७१ ची. व नंतरची केमिकल्स, स्टील, अॅल्युमिनियम, वायर, रबर, ग्लासवर्क, आईस फॅक्टरी अशी त्याची विविध रूपे आणि त्या सर्वांतून सुमारे १० हजार कामगार आपली कामगिरी दाखवीत आहेत. नक्कीच कामगारांचा आकडा द्यावयाचा तर तो आहे ९३२५.

यातही 'इन्डाल, मर्क, हिंदुस्थान लिव्हर, फॅब्रिकेटर आदी कारखाने मोठे म्हणजे ज्यात सुमारे ४००।५०० कामगार आहेत असे. अन्य कारखाने अगदी २५ पासून ३०० पर्यंत कामगार सामावून घेतात येवढे. आणि त्यातच जिथे स्फोट झाला असे 'प्रमोद रबर इंडस्ट्रीज'सारखे की येथे ५६ कर्मचारी कामावर होते, हे कर्मचारी कायमस्वरूपी आणि १३ ते १५ कामगार हंगामी स्वरूपाचे. या कारखान्याचे उत्पादन रबरी साधनाचे. हाही कारखाना तसा नवाच म्हटला पाहिजे. या कंपनीत कामगार संघटित झाले ते प्रसिद्ध कामगार नेते डॉ. दत्ता सामंत याचे पुढाकाराने आणि डॉ. दत्ता सामंतप्रणीत येथे 'युनियन' स्थापन झाली. आणि एकदा कामगार संघटित झाल्यावर जे जे सोपस्कार होतात ते ते सुरू झाले म्हणजे 'डिमांडस्' आणि त्यातूनच हा संघर्ष सुरू झाला. कंपनीला जे देण्यासारखे होते ते त्यांनी दिले (असे म्हणतात) परंतु जे मिळाले नाही त्यासाठी कामगार निर्धाराने संपावर गेले. दि. १३ ऑक्टोबर


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : पस्तिसावा
२६ जानेवारी १९८०
किंमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन.
अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

१९७९ पासून. कारण होतं – 'जे हंगामी कामगार आहेत ते कंपनीने कायम करून घ्यावेत !' आणि मालकांचे म्हणजे श्री. जयकरण सूर्यबली दीक्षित याचे म्हणणे– त्याचा येथे संबंधच उत्पन्न होत नाही. आणि संघर्षास सुरुवात झाली. मालक विरुद्ध कामगार. पहिली ठिणगी अशी पडली.

संपावरील कर्मचारी दमदार परंतु उत्पादनात खंड. म्हणून मालकानेच कामगार न्यायालय गाठले. आणि या न्यायालयात सुरू असलेला संप बेकायदेशीर ठरला. डॉ. सामंताना त्याच्या या विविध संघटनाच्या कामामुळे वेळ मिळाला नसेल म्हणा, परंतु त्याचे लक्ष या कामगारांकडे कमी झाले. पर्यायी कामगारानी डॉक्टराचे नेतृत्व सोडले आणि 'आपलेच आपण' अशा सामुदायिक नेतृत्वाने चालू असलेला सप पुढे रेटला व चालू ठेवला.

कामगार न्यायालयाने संप बेकायदेशीर ठरविला. कारखाना परिसरात निदर्शने–घोषणांना बंदी मिळविली. उत्पादन तर सुरूच झाले पाहिजे म्हणून कंपनी मालकानी डायरेक्ट मुबईहून कामगार आणले आणि कंपनी सुरू केली. बरे जे कामगार आणले ते जवळपास एकजात यूपियन भैय्ये. मालक दीक्षित तर खुद्द 'रायबरेली'चे आणि कामगार भैय्ये, म्हणजे लढवय्येच म्हणाना ! त्यातून हा संघर्ष वाढू लागला व त्याची प्रत्यक्षातली ठिणगी मकरसक्रांतीचे दिवशी, १४ जानेवारी १९८० रोजी सायंकाळी.

### ठिणगीचे कारण

ठिणगीचे कारण असे सागितले जाते की, कंपनीत मुबईहून आणलेल्या कामगारापैकी एकाने बाहेर निदर्शने व घोषणा करणाऱ्या कामगाराची छेड काढली. नुसती छेड काढली असे नव्हे तर दमदाटी केली गेली आणि त्यांचेवर कंपनीतून काही दगड फेकले गेले. एवढेच नव्हे तर काही (बाहेरच्या) कामगाराचे म्हणणे असे की, पिस्तुलातून गोळयाही झाडल्या गेल्या. संघर्ष पेटल्यावर बाहेरील कामगार सरळ पोलीस स्टेशनवर मोर्चाद्वारे गेले व त्यानी मालकाविरुद्ध 'आमच्यावर पिस्तूल झाडले' म्हणून तक्रार दिली. परंतु पोलिसाकडे आधीच दीक्षित यानी कामगारांनी दगडफेक केल्याची तक्रार दिली होती म्हणून पहिल्या तक्रारीनुसार तळोजा पोलिसानी मोर्चातील एकाला त्या संदर्भात ताब्यात घेतले. या निमित्ताने चाललेला संघर्ष पेटला. जणू आगीत तेल ओतले गेले. तातडीने कामगार संघटित झाले व त्यानी इतर कामगार संघटनेतील कामगारांशी संपर्क साधला आणि दि. १५ जानेवारीस हा औद्योगिक परिसर 'बंद' केला. सकाळी सुमारे ५-६ हजार कामगार प्रमोद रबर इंडस्ट्रीजच्या परिसरात जमा झाले आणि घोषणा-प्रतिघोषणा, मुर्दाबादचे नाऱ्यानी आसमंत भरून गेला. संबंध औद्योगिक परिसरात विलक्षण वातावरण तयार झाले. केव्हा काय होईल याची शाश्वती राहिली नाही. अनेक कंपन्यांची वाहने कामगारानी अडविली होती. अनेकांच्या स्कूटर्स रस्त्यावरच बंद कराव्या लागल्या होत्या. सगळे बंद म्हणजे सगळेच बंद.

आणि असा बंद असताना प्रमोद रबरचे मालक जयकिरण सूर्यबली दीक्षित (की जे घाटकोपरला राहतात) घाटकोपरहून सुसाट वेगाने आपल्या गाडीतून आले. त्यांना (म्हणे) आपल्या त्या मुबईहून आणलेल्या कामगाराची व धाकटया भावाची–रामप्रकाशची (राजन भैया)ची ते फॅक्टरीत असल्याने काळजी होती. त्यानी सुसाट वेगात असलेल्या गाडीतून औद्योगिक परिसरात येतायेताच आपल्या पिस्तुलातून अगदी 'शोले' टाईप गोळीबार चालविला. धाँय-धाँयचे आवाज. कंपनीपासून 'मर्क' कंपनी सुमारे १ ते १॥ किलोमीटर आहे. तेथून त्यानी स्वतःच्या कंपनीत जाईपर्यंत गोळीबार चालविला. गाडी वेगात असल्याने असेल, त्यात कुणीही जखमी झाले नाही. परंतु कंपनीजवळ एकाला गोळी लागली आणि आत्माराम तुकाराम कोपरकर (पेणधर पनवेल) हा कामगार तात्काळ ठार झाला. श्रीराम जयराम पाटील, जनार्दन धर्मा खुटाडकर (दोघेही नावडे-पनवेल) हे जखमी झाले. आपल्यातलाच एक ठार झाला म्हणून जमाव बेभान झाला आणि त्याने कंपनी पेटवून दिली. दगडविटाचा खच झाला होता. लोखंडी सळया भिरकावल्या जात होत्या. हाती येईल ते कंपनीकडे फेकले जात होते. 'मारो-काटो बदला लो' अशा घोषणा तर कुणाचा मेळ कुणात नाही अशा चालल्या होत्या. कर्मचारी विलक्षण प्रक्षुब्ध अवस्थेत बदला घेऊ इच्छित होते तर कंपनीचे मालकद्वय व आतले ३२ कामगार भैय्ये आपल्यापरीने बाहेरच्या जमावावर दगडविटा, सोडावॉटर बाटल्या, बियर बाटल्या गच्चीवर उभे राहून फेकीत होते आणि मालकही बेभानपणे गोळया झाडीत होते. कंपनीने धडाधड पेट घेतला होता. काड्-काड् धाड-धाड तड-तडचे आवाज होत होते तर आगीच्या ज्वाळा आसमंत भेदून जात होत्या. हाजीमलंगचा डोगर संपूर्ण धुराने वेढला होता. यापुढे काय हे कोणालाच सांगता येत नव्हते. कामगार आणि मालकांच्या संघर्षात आणखी कोण बळी जाणार याची कुणालाच शाश्वती नव्हती. नव्हे सारी औद्योगिक वसाहतच त्यात बळी जाण्याचा धोका होता. असलेले पोलीस बळ अत्यंत अपुरे होते. जादा कुमक यावयास अवकाश होता. असलेला सब-इन्स्पेक्टर श्री. प्रल्हाद बनसोडे जमावाने केव्हाच जायबंदी केला होता. तर पोलीस इन्स्पेक्टर वामनराव साळुंके आपल्या २०-२५ पोलिसांनिशी जमाव आणि कंपनीच्यामध्ये प्राणाची बाजी लावून कायदा व सुव्यवस्था राखण्याचा प्रयत्न करीत होते. अर्थात कुणाचेच तेथे चालत नव्हते, चाललेही नसते. जमाव अनावर होता. अशा कात्रीत पोलीस दल सापडलेले आणि जादा कुमक आली. भराभर पोलीस आले. सरासरा एस्. आर. पी. उतरली. पनवेल विभागाचे पोलीस उपअधिक्षक श्री. खामकर यांनी कंपनी दरवाजा रोखला. पोलिसांनी भराभर मोक्याच्या जागा घेतल्या. तेवढयात पनवेल विभागाचे प्रांताधिकारी श्री. संजय नारायण, मामलेदार श्री. एस. डी. गुप्ते आले. जमाव आटोक्यात नव्हता. त्याचा रोख आता पोलिसांवर होता. दणा-दणा दगडी भिरकावली जात होती. फटा-फटा पोलिसांवर, अधिकाऱ्यांवर विटा फुटत होत्या. या सगळया फौजफाटयात पनवेलचे आमदार श्री. दत्ता पाटील नावडेकर (शेकाप) आपले जिल्हा परिषदेतील सहकारी श्री. दशरथ ठाकूर व इतर ५-६ कार्यकर्त्यांसह कामगाराना सामोरे जाऊन शांततेचे आवाहन करीत होते, हात जोडीत होते, शांततेची भीक मागत होते. परंतु फू-फू करणारा उन्मत्त पाण्याचा प्रवाहच तो ! त्याने आमदारांना धुडकावले व बजावले, 'आमदार तुम्ही मधी पडू नका, आम्ही बघतो काय होते ते !' जमाव काबूत येत नव्हता. कंपनी जळत होती. आतले ३४ जण आगीतच मरणार होते. प्रांताधिकारी संजय नारायण यानी त्वरित १४४ कलमावर सही

केली आणि भाषेच्या अडचणीमुळे मामलेदार गुप्तेंनी ती जमावापुढे वाचली व तिचा ताबा पोलिसाकडे आला

आता पोलिसापुढे छडीमाराखेरीज उपाय नव्हता. त्यांनी शिस्त पकडली आणि छडीमारात जमाव काहीसा मागे हटला. परंतु दुप्पट वेगाने त्याने पोलिसांवर चाल केली. आता अश्रुधूर पथकाने आपले काम केले. भक्–भक् करीत अश्रुधूराची नळकाडी फुटू लागली. परंतु मुबईचे छायेत असणारे तळोजा आणि मुबईहूनही येथे येणारे कामगार ! त्यानी भराभर ती नळकांडी फुटायचे आत पोलिसावर भिरकावली, इतर जमाव दगड विटांचा मारा चोख करीतच होता. शेवटी हवेत गोळीबाराच्या फैरी झडल्या. काड् काड् आवाज आले आणि त्या सूचनेनेही जमाव पांगेना म्हणून पोलिसानी ३४ फैरी झाडल्या त्यात एक कामगार ठार झाला व ५।६ जण जखमी झाले आणि जमावाची पळापळ सुरू झाली. इकडे कंपनीचे दीक्षित गच्चीवर धुराचे लोळात होतेच. पोलिस इन्स्पेक्टर वामनराव साळुके चार पोलिसांसह कंपनीत केव्हा गेले ते कळलेच नाही. कंपनी आगीत भक्षस्थानी पडत होती, धुराचे लोळ निघत होते. साळुके गुपचूप गच्चीवर गेले आणि त्यानी धुराने काळेठिक्कर पडलेले दीक्षित याना झेपावून कवळी घातली आणि त्यांचे पिस्तुल ताब्यात घेतले. अद्याप तीन गोळ्या शिल्लक होत्या. नेताच पडला आणि सगळेच शरण आले. पोलिसांनी भराभर त्याना ताब्यात घेतले, गाड्यात चढविले. कंपनी सगळीच संपली होती. आणि एक भीषण युद्धही. रसायनाची टाकी फुटल्याने व गोळीबाराने जखमी झालेल्याना उचलले गेले, दवाखान्यात पोहचविले गेले. आणि १५ जानेवारी एकदाची संपली.

दिवसभराचे पडसादाने आसमंत पार हादरले. तातडीने जिल्हाधिकारी, पोलिस उपमहानिरीक्षक, जिल्हा पोलिसप्रमुख आलेले होते. त्यांनी कायदेशीर नाकेबंदी केली होती तर कामगार संघटनांनी संघटित होऊन दि. १६ रोजी 'बंद'चा कॉल दिला व पोलिसांचा स्वैर गोळीबार, अकार्यक्षमता याचा निषेध केला. तातडीने मुबईला खलिते गेले. आणि दि. १६ जानेवारी 'बंद' पूर्णपणे पाळला गेला. वातावरण क्षुब्ध होते. सायंकाळी मुबईचे कामगार नेते खानोलकर आले. कामगार संघटनांची सभा झाली. तीत मृतात्म्याना श्रद्धाजली, गोळीबाराची न्यायालयीन चौकशी, अकार्यक्षम पोलिसांची चौकशी व्हावी, हे ठराव झाले व एक 'समन्वय समिती' श्री. एस्. व्ही. मोकल याचे अध्यक्षतेखाली स्थापन झाली. तीत अनेक कंपन्यातील कामगार प्रतिनिधी घेतले जाणार आहेत. या समितीने पहिलाच निर्णय घेतलेला आहे. 'कारखाने शांतपणे सुरू करावयाचे आहेत व झालेल्या प्रकरणी सनदशीरपणे लढा द्यावयाचा आहे.'

आता तूर्त हा परिसर शांत झाला आहे. कारखाने पूर्ववत सुरू झाले आहेत. ही स्थिती किती काळ शात राहाते ते पहावयाचे आहे. कारण रसायनाच्या स्फोटात जखमी झालेला अनिल गजानन म्हात्रे (२२ वर्षे) हा तरुण शनिवार दि. १९ रोजी मुबईचे सायन हॉस्पिटलमध्ये मृत्यू पावला आहे. म्हणजे ३ मृत्यू, ८ जखमीचे जीवावर ही शांतता प्रस्थापित झाली आहे.

मी 'तळोजा' परिसरात आसुडगाव, नावाडे, तळोजा येथे तर गेलोच परंतु खुद्द पनवेलमध्ये आमदार दत्ता पाटील, त्यांचे सहकारी ठाकूर, आत्माराम पाटील, अशोकराव तहसीलदार गुप्ते, काही नागरिक, काही राजकीय पक्षाचे कार्यकर्ते, पोलिस अधिकारी, छोटे पोलिस हुद्देदार याना भेटलो. माहिती मिळविली. औद्योगिक परिसर पाहिला. भेट झाली नाही ती खुद्द दीक्षित बंधुंची. ते खालापूर तुरुंगात दिनांक २३ पर्यंत पोलिस कस्टडीत आहेत. (त्यामुळे त्यांची बाजू येथे कमी पडेल.)

## पक्ष व नेते यांचे दुर्लक्ष

कामगार संघटना व त्यांचे नेते, पुलोद शासन, मालक वर्ग, राजकीय कार्यकर्ते या सर्वांची निश्चित काही जबाबदारी आहे की नाही, हा प्रश्न माझ्यापुढे उभा आहे. कामगाराना त्याचे न्याय्य हक्क मिळालेच पाहिजेत यात वाद नाही वा तडजोडही होऊ शकत नाही. तथापि योग्य कायद्याची माहिती ही कामगार नेतेच देऊ शकतात यातही वाद होऊ नये. तथापि येथे कामगारही व नेते हे अपुरे पडले असे दिसते. पुलोद शासन अधिकारावर आले ते एकाधिकारशाहीला विरोध करण्यासाठी व कामगारांचे–शेतकऱ्याचे प्रश्न त्वरित व योग्य मार्गानी सोडविण्यासाठी. परतु दुर्दैवाने पुलोद शासनातच कामगार संघर्ष वाढले व तेवढेच गोळीबारही. मालक वर्गाने आपली संपत्ती उद्योगधंद्यात घातलेली असते हे एकदम मान्य. परंतु ती वाढविण्यासाठीच हे ते नाकारू शकतात काय ? का ते समाजाचे काम व्हावे, समाजाला रोजगार मिळावा म्हणून संपत्ती घालतात, याचा त्यानी विचार करावा कारण रोजगाराची जेवढी आवश्यकता कामगारांना आहे तेवढीच कामगाराची गरज मालक वर्गाला आहे. नव्हे ते उभयपक्षी एकमेकांवर अवलंबून आहेत. शेवटी आपले राजकीय-पक्ष व नेते, या वर्गाविषयी काय लिहावे ? सगळा आनंद आहे. या झालेल्या संघर्षात एकटे आमदार सोडले तर कुणीही जमावापुढे धाडसाने गेले नाही. नव्हे आपला काही संबंधच नाही अशा पद्धतीने कुणीही राजकीय पक्ष व नेते या प्रकरणी संघटना म्हणून गेले नाहीत वा अद्यापही त्यांनी काहीही पुढाकार घेतला नाही ही खेदाची बाब आहेच, तितकी चिंताजनकही.

पोलिस खात्याविषयी आपल्यात सर्वसामान्यपणे अढी आहे. परंतु येथे मात्र पोलिसानी कमीतकमी बळाचा वापर करून शांतता प्रस्थापित केली याविषयी मी भेटलेल्या नागरिक – नेत्यात एकमत आहे. मग कामगार संघटना त्यांचा निषेध करीत आहेत हे योग्य आहे काय याचा विचार झाला पाहिजे. ज्या दीक्षितांना पकडण्यासाठी भर आगीत इन्स्पेक्टर वामनराव साळुके घुसतात व जिवाची बाजी लावून त्यांचे पिस्तूल ताब्यात घेतात त्यावेळी सर्वांनी पाहिले नाही का, की दीक्षित आगीने काळेठिक्कर पडले होते तसे साळुकेही ओळखण्यापलीकडे झाले होते ते ! परंतु समाजातला घटक हा पोलीस आहे, समाजातली सारी वैगुण्ये, गुण त्यात राहणार हे आपण मान्य करीत नाही. यातून पोलिसाविषयी आकस असणे शक्य आहे.

मुख्य प्रश्न आहे तो हा की, आज तळोजा पेटले, उद्या बेलापूर पट्टा आहे. परवा पनवेल उद्योग नगरी आहे रोज एखाद्या पट्ट्यात कामगार–मालक संघर्ष उफाळणार असेल तर महाराष्ट्रातली कारखानदारी धोक्यात येणार नाही काय ? यासाठी समाजधुरिणानी विचार करून औद्योगिक करारावर उपाय शोधला पाहिजे व कारखानदारी वाढतानाच त्याच्या संवर्धनाची जबाबदारी घेतली पाहिजे.

म्हणजे कामगार सुखी आणि कारखानदारही.

या वेळी एक आणखी जाणवले ते असे की, दोन वेळा गोळीबार व दोन वेळा बंद झाल्याने औद्योगिक परिसर अशांत झाला. कामगार मेले. एवढे होऊनसुद्धा मजूरमंत्री, गृहमंत्री वा मुख्यमंत्री येऊ शकले नाहीत, ही शरमेची बाब आहे या बाबत बोलताना आ. दत्ता पाटील म्हणाले, 'राजकारण सांभाळण्याचे घाईत कुणा मंत्र्याला वेळ झाला नसेल' हाच फटका अखेरचा ठरावा.

या परिसरातील कामगारांविषयी काही जणांचे म्हणणे असे की येथील कामगार घरचे शेतीभातीवाले आहेत. त्यामुळे रोजगार मिळाला तरच पोट भरेल अशी स्थिती नाही. त्यामुळे घरचे खाऊन ते कितीही दिवस संप चालवू शकतात.

पोलीस अधिकारी व कंपन्याचेच लागेबांधे आहेत असे नव्हे असा आरोप करताना एक कार्यकर्ता म्हणाला की, येथील कपन्यानी शेकाप, जनता, काँग्रेस या सगळ्यानाच या निवडणुकीत जीप्स व पैसे पुरविले होते. त्याचा साहजिक परिणाम म्हणजे नेते कंपनी-व्यवस्थापकाकडे आपुलकीच्या दृष्टिकोनातून बघतात.

'उरण' येथील कोर्टात सशयित आरोपी जयकरण सूर्यबली दीक्षित व त्याचा धाकटा भाऊ रामप्रकाश (राजा) व इतर ३२ कामगार यांना पोलीस कस्टडीसाठी उभे केले त्या वेळी मुंबईहून नामवंत वकील त्याचेसाठी घाईघाईने आले होते. या आरोपीत दीक्षित बंधू व्यतिरिक्त त्याचे बस ड्रायव्हर, २ क्लिनर, सिक्युरिटी फोर्सचे ८ व इतर २२ कामगार (आतले) आहेत. त्याचेवर भा. दं. वि. ३०२, ३०७ ही कलमे लावली आहेत व दीक्षित याचेवर त्या व्यतिरिक्त शस्त्रकायदा भंग २५ लावले आहे. (त्याना पिस्तूल-परवाना आहे. परंतु वापर नको तिथे केला म्हणून कदाचित २७ कलम लागेल.)

जमावातील ६ जण पकडले आहेत. अद्याप सुमारे १५ जण पकडावयाचे आहेत. त्याचेवर भा. दं. वि. १४७,४८,४९ आदी कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

□

---

# अफगाणिस्तानचे आव्हान

## हिमालयीन राष्ट्रांचा महासंघ हवा

वा. दा. रानडे

तिसरे महायुद्ध जवळ आले आहे का? आणि भारत रणक्षेत्र होणार आहे का? अफगाणिस्तानातील बातम्यांनी हे दोन चिंताजनक प्रश्न आपल्या मनात येणे स्वाभाविकच आहे. त्यांचा विचार करण्यापूर्वी अफगाणिस्तानात जे घडले व घडत आहे ते का व कसे घडले, त्याचे स्वरूप व अर्थ काय? जागतिक राजकारणावर व भारतावर त्याचे कोणते परिणाम होण्याचा संभव आहे? या साऱ्या घटनाबाबत पुरेशी जागरूकता आपण दाखविली का? भारताची भूमिका काय आहे, काय हवी? या प्रश्नाची उत्तरे शोधायला हवीत.

जगात अमेरिका व रशिया या बड्या राष्ट्राच्या संघर्ष क्षेत्रापैकी व्हिएटनाममधून अमेरिकेला माघार घ्यावी लागली. उत्तर व दक्षिण व्हिएटनामचे एकीकरण झाले. आशियात आपले प्रभावक्षेत्र वाढविण्यासाठी रशियाने व्हिएटनामला मोठ्या प्रमाणावर लष्करी व आर्थिक मदत केली. काम्पूचियात आपल्याला अनुकूल राजवट स्थापण्यासाठी व्हिएटनामने तेथे लष्करी हस्तक्षेप केला त्याचा शाब्दिक निषेध करण्यापलीकडे अमेरिका व पाश्चात्य राष्ट्रे काही करू शकली नाही. काम्पूचियातील पॉलपॉटची चीनला अनुकूल राजवट वाचविण्यासाठी चीनने आपले सैनिक मदतीसाठी पाठविले; पण व्हिएटनाम सैनिकांपुढे त्यांना माघार घ्यावी लागली – आशियात व्हिएटनामच्या रूपाने आपल्या बाजूची एक प्रभावी शक्ती रशियाने निर्माण केली आहे.

बड्या राष्ट्राचे दुसरे संघर्ष क्षेत्र अरब-इस्रायल तो प्रश्न पूर्णपणे सुटला नसला तरी संघर्ष सध्या तरी थंडावला आहे. बाकीच्या अरब राष्ट्रापासून इजिप्तला वेगळे काढून इस्राएलशी त्याची तडजोड घडवून आणण्यात अमेरिकेने यश मिळविले. या दोन देशानी एकमेकाशी राजनैतिक संबंध प्रस्थापित करण्याचा करार २६ जानेवारीस होत आहे. इजिप्तचे धोरण बाकीच्या अरब राष्ट्राना मान्य नसले तरी त्यांनी सध्या संघर्षाची भूमिका घेतलेली नाही. त्यामुळे हे संघर्ष क्षेत्र सध्या तरी थंड आहे.

भारतीयउपखंड हे बड्या राष्ट्राचे तिसरे संघर्ष क्षेत्र आहे. अफगाणिस्तानातील घटनामुळे या संघर्ष क्षेत्राला महत्त्व आले आहे. अफगाणिस्तानातील रशियन लष्करी हस्तक्षेप निषेधार्ह तसाच अफगाण बंडखोराना लष्करी मदत करून अमेरिका व चीन करीत असलेला हस्तक्षेपही निषेधार्ह आहे; पण ही परिस्थिती का उद्भवली? त्यामागे कोणत्या शक्ती आहेत हे समजून घेण्यासाठी केवळ आजच्या घटनाचा विचार न करता काही वर्षे मागे गेले पाहिजे. भारताप्रमाणेच अफगाणिस्तानचे धोरण अनेक वर्षे अलिप्ततेचे होते व बड्या राष्ट्रांनीही ते मान्य केले होते. त्याच्या विकासासाठी रशिया व अमेरिका या दोन्ही राष्ट्राची मदत होत होती. मग त्याला ही तटस्थता सोडायला लावून आपल्या प्रभावाखाली आणण्याच्या आणि आपल्याला अनुकूल राजवट तेथे स्थापण्याच्या हालचाली रशियाने का सुरू केल्या?

अमेरिका आणि रशिया या दोन्ही बड्या राष्ट्राचे आशियात आपले प्रभावक्षेत्र वाढविण्याचे प्रयत्न गेली काही वर्षे चालू आहेत. इराण व पाकिस्तान या देशांना मोठ्या प्रमाणात लष्करी व आर्थिक मदत अमेरिकेने केली. भारत-पाकिस्तान युद्ध झाल्यानतर पाकिस्तानची लष्करी मदत काही वर्षे बद केली तरी इराणची मदत चालूच ठेवली.

पृष्ठ २१ वर

# पराभव हे वरदानही ठरू शकेल....जर !
# अटलजींचा प्रेरणादायक संदेश

**जनता पक्षाचे एक ज्येष्ठ नेते व माजी परराष्ट्रमंत्री श्री. अटल बिहारी वाजपेयी गेल्या सप्ताहात महाराष्ट्रातील पक्ष कार्यकर्त्यांच्या बैठकीसाठी मुंबईत आले होते. जनता पराभवाची चिकित्सा, पक्षाचे भवितव्य, संघटनात्मक बाबी, रा. स्व. संघाचा प्रश्न, आंतरराष्ट्रीय परिस्थिती इ. अनेकविध विषयांवर, सुमारे पाऊण तास वेळ काढून खास 'माणूस' साठी त्यांनी दिलेली ही मुलाखत. शब्दांकन : विनय सहस्रबुद्धे.**

**: जनता पक्षाच्या अनपेक्षितपणे झालेल्या दारूण पराभवाची चिकित्सा देशभर सुरू आहे. नवनवी कारणे पुढे येत आहेत. जनता नेत्यांनीही काही ढोबळ प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. पण पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांनी पराभवाची नेमकी कोणती वस्तुनिष्ठ चिकित्सा केली आहे, हे अद्याप समजलेले नाही. याबाबत आपण काही सांगू शकाल ?**

: पराभवाच्या संदर्भात बरीच चर्चा झाली आहे व जवळजवळ सर्व मुद्दे चर्चेत येऊन गेले आहेत. आपण म्हणता तशी वस्तुनिष्ठ चिकित्साही पक्षनेत्यानी केली आहे.

पहिली गोष्ट म्हणजे, १९७७ साली जनता पक्ष विजयी झाला तेव्हासुद्धा कॉंग्रेसला आपली परपरागत मते मिळाली होतीच. खुद्द नवी दिल्लीतसुद्धा या पक्षाला ३० टक्के मते मिळाली होती. या निवडणुकीत ही परंपरागत मते इंदिरा कॉंग्रेसला मिळालीच, शिवाय गेल्या निवडणुकीत आम्हाला ज्यानी मते दिली होती त्यातील निम्म्यापेक्षा अधिक लोकानी या वेळेला आमच्या विरोधी मतदान केले.

दुसरी गोष्ट म्हणजे, उत्तर प्रदेश, बिहार, हरियाना व इतर राज्यातही काही ठिकाणी जनता आणि लोकदल याच्यात मते विभागली गेली व त्याचा फायदा इंदिरा कॉंग्रेसला मिळाला. या शिवाय इतरही कारणे सागता येतील. आम्ही आमच्या पक्षाची एकसंघ पक्ष अशी प्रतिमा निर्माण करू शकलो नाही. आमच्या नेत्याच्या महत्त्वाकांक्षा पक्षाच्या हिताच्या आड आल्या.

**: पण हरिजनाची मते यावेळेस जनता पक्षालाच मिळतील अशी आपणा सर्वांचीच खात्री होती, त्याचे काय झाले ? शिवाय मुस्लिम मतांबद्दलही पक्ष नेत्यांना आशा वाटत होती, त्याचे काय ?**

: हरिजन मते आम्हाला मिळाली. फार काय पण १९७७ च्या तुलनेत ती निःसंशय अधिक प्रमाणात मिळाली. पण ग्रामीण भागात याचे काही दुष्परिणामही झाले. अनुसूचित जातीजमातीत जसे हरिजन आहेत तशाच अन्य जातीही आहेत, आणि त्यांच्यातही भांडणे, उच्चनीच भेद आहेत. त्यामुळे हरिजन मतदार आम्हाला मते देणार याची जाणीव होताच हरिजनाचा दुस्वास करणाऱ्या वाल्मिकी जातीच्या लोकांनी आमच्याविरुद्ध मतदान केले. प्रत्यक्ष दिल्लीत हे घडले. अशी कित्येक उदाहरणे देता येतील. अर्थात हे जे घडले याबद्दल आम्हाला वाईट वाटले तरी त्याचा पश्चाताप आम्हाला नाही. इसका सबसे दुःखदायी पहलू ये है कि हम भारतीय उदारचेता होनेका दावा करने के बाद भी एक हरिजन को देश का प्रधान नही होने देते. ही आमची वेदना आहे. रामायण, महाभारतातही शूद्र, चांडाळ, ब्राह्मण सर्वजण समान असल्याचे शिकविले जाते, पण अजून सर्वसामान्याना काही ते पटत नाही. हरिजन पंतप्रधान होणार ही गोष्ट, इतराचं राहू द्या, पण अनेक हरिजनानाही पटत नव्हती. आमच्या परपरागत सस्काराचा हा परिणाम आहे. राजस्थानात अंत्योदयाचा फायदा ज्याना मिळाला त्यातले बहुसंख्य मागासवर्गीय आहेत, पण त्याची मते मिळाली नाहीत. दिल्लीत बहुसंख्य हरिजन आणि मागासवर्गीय सफाई मजदूर आहेत. दिल्ली प्रशासनाची सूत्रे जेव्हा जनता पक्षाकडे आली तेव्हा पहिल्या प्रथम आम्ही त्याचा पगार सरसकट दरमहा पन्नास रुपयांनी वाढविला. पण मते मिळाली नाहीत. का ? काही हरिजनानीच आम्हाला विचारल, 'पैरे के जुते को क्या सिरपर रहना है ?' हे सारं फार भयानक आहे ! मी उत्तर प्रदेशात अनेक ठिकाणी प्रचारासाठी गेलो. काही ठिकाणी मी भाषणासाठी स्टेजवर जाण्यापूर्वीच माझ्या हातात चिट्ठ्या दिल्या गेल्या, त्यात म्हटलं होतं, 'कृपया, बाबूजीबद्दल फार बोलू नका.' आम्ही हे सारं जाणून घेत आहोत. मी मघाशीच सांगितल्याप्रमाणे याचा आम्हाला खेद आहे, पण पश्चातापाची भावना अजिबात नाही. परिणाम काहीही होवा, बाबूजी आमचे नेते राहणार यात शंका नाही.

**: पण हे असं काही होईल याची आधी कुणालाच कल्पना आली नाही ?**

: ज्या प्रमाणात कल्पना यायला हवी त्या प्रमाणात येऊ शकली नाही. त्याला कारणं आहेत. यावेळी, स्वातंत्र्योत्तर काळात प्रथमच ही निवडणूक म्हणजे 'पंतप्रधानपदासाठी सार्वमत' होतं. हरि-

जनांचा नेता एखाद्या पक्षाच्या बाजूला असणं वेगळं आणि एक हरिजन नेता पंतप्रधानपदाच्या शर्यतीत असणं वेगळं. जगजीवनरामच पंतप्रधान होणार ही गोष्ट आम्ही स्पष्ट केली होती आणि तेच काहींना रुचलं नाही. इंदिरा गांधी काय ब्राह्मण आहेत ? पण त्या हरिजन नाहीत हीच गोष्ट मतदारानी लक्षात ठेवली. खुद्द संजय गांधीनीच सांगितलं आहे की लोक मला माझ्या मतदारसंघात ब्राह्मणच समजतात. अर्थात हा सगळा हरिजन मते मिळण्या न मिळण्याचा भाग झाला. आमच्या पराभवाला हेच एकमेव कारण आहे असे कुणीही म्हणणार नाही, असे म्हणण्यात काहीही अर्थ नाही.

**: आणि मुस्लिम मतांबद्दल काय ?**

: १९७७ च्या तुलनेत मुस्लिम मते फारशी कमी झालेली नाहीत. पण अधिकांश मते श्रीमती इंदिरा गांधीच्या पक्षाला मिळाली हे नाकारण्यात अर्थ नाही.

**: १९७७ च्या जनता पक्षाच्या विजयानंतर 'भारतीय मतदार अशिक्षित आणि अडाणी असला तरी तो सूज्ञ आहे' असं जनता पक्षाच्या अनेक नेत्यांनी म्हटलं होतं. भारतीय मतदाराला लोकशाही हवी आहे असाही निष्कर्ष आपण काढला होता. मग आता इंदिरा काँग्रेसचा विजय म्हणजे हुकुमशाहीचा विजय असे आपण म्हणणार की...**

: नाही, नाही. असं म्हणता येणार नाही. भारतीय मतदार सूज्ञ आहे ही आमची धारणा आजही कायम आहे. आमच्या भांडणाबद्दल लोकानी व्यक्त केलेला हा संताप आहे. पक्षाची आणि कळत न कळत लोकशाहीचीही अतिशय चुकीची प्रतिमा आम्ही लोकांपुढे ठेवली. लोकशाहीच्या नावाखाली नेत्यांमधली भांडणे लोकांना नापसंत होती. तरीही साक्षर, सुशिक्षित मतदारांनी आम्हाला मते दिली. पण अशिक्षित आणि गरीब जनतेला लोकशाहीची ( आम्ही उभी केलेली ? ) प्रतिमा अपील होत नव्हती, होत नाही. नसबंदी आणि आणीबाणीकालीन अत्याचाराची भीतीही पुसट झाली होती. अशा स्थितीत लोकानी प्रामुख्याने जनता पक्षाला नाकारण्यासाठी म्हणून इंदिरा काँग्रेसला मते दिली. हा Negetive कौल आहे.

**: पक्षांतर्गत भांडणामुळे पक्षाची प्रतिमा बिघडली असे आपण म्हणता, पण मग इतकं सारं होऊनही जे तुमच्याशी भांडले, पक्षातून फुटून निघाले त्यांच्याशी, म्हणजे लोकदलाशी, तुम्ही पुन्हा एकीचे प्रयत्न का करीत आहात ? 'एक इंदिरा काँग्रेस नाही तर जनता', असे आपण म्हणत होतात, मग आता तिसऱ्या गटाला महत्त्व का देत आहात ? आणि समजा तुमची युती झालीच तरी तुम्ही एकत्र नांदाल यावर जनतेने कोणत्या आधारावर विश्वास ठेवायचा ?**

पहिली गोष्ट म्हणजे लोकदलाशी केवळ पारस्पारिक सहकार्याच्या गोष्टी होत आहेत, पक्ष विलीनीकरण किंवा लोकसभेत संयुक्त आघाडी करणे इ. बाबत आम्ही उत्सुक नाही. संसदेच्या पटलावर आम्ही जसे सर्व विरोधी पक्षाशी सहकार्य करणार आहोत तसेच लोकदलाशीही करणार आहोत. चार पक्षानी आघाडी बनविली तरी त्याला नियमानुसार अधिकृत विरोधी पक्ष म्हणता येत नाही, त्यामुळे विरोधी पक्ष नेत्याचाही प्रश्न उद्भवत नाही. शिवाय इंदिरा काँग्रेस सत्ताधारी झाल्याने अधिक बलाढ्य बनली आहे, त्यामुळे काही मर्यादित स्वरूपात सहकार्य करणे उभय पक्षाना भाग आहे. बिहारमध्ये आमच्या पक्षाशी सहकार्य करण्याचा प्रस्ताव प्रथम त्यांच्याकडून आला, आता उत्तर प्रदेशात सहकार्याची तयारी दाखवून आम्ही केवळ प्रतिसाद दिला आहे. अर्थातच ही तडजोड काटेकोरपणे तात्विक आधारावर झालेली नाही. परंतु उभय पक्षाच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला आहे, अशा स्थितीत अशा मर्यादित तडजोडीशिवाय गत्यंतर नाही.

इंदिरा काँग्रेसला जनता पक्ष हाच एकमेव पर्याय आहे ही आमची धारणा आजही कायम आहे व तिला निश्चित आधार आहे. मतांची टक्केवारी किंवा मिळालेल्या जागा याचाच फक्त विचार केला तर हे पटणार नाही. पण कामाचा विस्तार, कार्यकर्त्यांची संख्या, इ. गोष्टीचा विचार करता इंदिरा काँग्रेसला देशभर समर्थपणे तोंड देऊ शकेल असा जनता पक्ष एकमेव पक्ष आहे. आमचा पक्ष फुटला असला तरी त्यातून फक्त एकच घटक बाहेर पडला आहे, बाकी चारही घटक आणि अनेक पूर्वीचे अपक्ष अद्यापही पक्षातच आहेत.

लोकदल आणि जनता पक्षाने आगामी निवडणुकीत सहकार्य केले तर मतदार त्यावर विश्वास ठेवणार नाहीत, लोकांना ते पटणार नाही, ही गोष्ट काही प्रमाणात खरी आहे. उदाहरणार्थ, मुंबई आणि दिल्लीत अनेक कार्यकर्त्यांनी अशा सहकार्यास विरोध केला आहे. पण मुंबई किंवा दिल्ली म्हणजे भारत नाही ! इंदिरा काँग्रेसला एकत्रितपणे विरोध करण्याऐवजी आम्ही आपणात लढत बसलो तर उत्तर प्रदेश आणि बिहारातले मतदार म्हणतील 'इतना मार खाने के बावजूद ये लोग आपसमेंही लढ रहे हैं !' अर्थात उद्या विधानसभेच्या निवडणुका आल्या तर तेव्हा लोकदलाशी युती करायचीच असे काही आम्ही अद्याप ठरवलेले नाही.

**: याचा अर्थ विधानसभांच्या निवडणुकींना लवकरच तोंड द्यावे लागणार हे जनता नेत्यांनी गृहित धरले आहे आणि...**

. विधानसभा बरखास्त करून निवडणुका घेणे अनुचित आहे अशी पक्षाची ठाम भूमिका असली तरी वेळ आल्यास निवडणुकीना तोंड देण्याची आमची तयारी आहे. १९७७ मध्ये जनता राजवटीत घेतलेल्या निर्णयाच्या आधारावर इंदिरा काँग्रेस विधानसभा विसर्जनाचे मनसुबे आखीत आहे, परंतु तेव्हाच्या व आताच्या परिस्थितीत महदंतर आहे. तेव्हा आधी आम्ही सर्वोच्च न्यायालयाची अनुमती मिळविली होती. न्यायमूर्तींनी त्यावेळी स्पष्ट म्हटले होते की, आणीबाणीत देशाचे संघराज्यात्मक स्वरूप नाहीसे झाले होते, या पार्श्वभूमीवर विधानसभाचे विसर्जन उचित ठरते. तेव्हा केंद्र सरकारने हा विसर्जनाचा घाट घातलाच तर जनता पक्ष त्याला कसून विरोध करील आणि त्याविरुद्ध न्यायालयातही जाईल.

**: या दारुण पराभवानंतर जनता पक्षाने आपल्या कार्यकर्त्यांना आता कोणता कार्यक्रम दिला आहे ?**

: निवडणुकीतील दारूण पराभवाच्या धक्क्यातून आता आमचे कार्यकर्तेही सावरले आहेत. या पराभवाकडे एक इष्टापत्ती या दृष्टीने आम्ही पाहात आहोत. १९७७ साली लोकानी जनता पक्षाला

एक प्रबळ विरोधी पक्ष म्हणून निवडून दिले असते तर ही वेळ कदाचित आली नसती. आम्ही एकदम सिंहासनावर जाऊन बसलो, त्यामुळे पक्षबांधणीस पुरेसा न्याय मिळाला नाही. आता सदस्यता मोहीम पुन्हा सुरू करणार आहोत. वेगवेगळ्या समित्यांची स्थापना झाली आहे. कमजोर समाजघटकांसाठी स्वतंत्र सेल बनवून त्याना कार्यप्रवण करण्यात आले आहे. स्थानिक प्रश्न सोडविण्यासाठी कार्यकर्त्यांनी रचनात्मक आदोलने सुरू करावीत यासाठीही प्रयत्न सुरू आहेत. हे सारे कार्यक्रम सर्वत्र नीट पार पडले तर पराजयही आम्हाला वरदान ठरेल

**: आसामच्या प्रश्नाबाबत आपल्याला काय वाटते ? या प्रश्नाचे गांभीर्य जनता पक्षाने जाणले आहे का ?**

: केंद्रात काळजीवाहू सरकारची अस्थिर राजवट संपली आहे, तेव्हा आता आसामचा प्रश्न सुटेल अशी आशा आहे. परकीय नागरीकाची नावे वगळण्याच्या कामाला या आधीच सुरूवात झाली आहे. ही प्रक्रिया गुंतागुंतीची असली तरी स्थानिक जनतेने समंजसपणे सहकार्य केले तर ती सुरळीत पार पडेल. या प्रश्नात कोणीही जातीयवाद किंवा धर्मवाद आणू नये कारण ते कोणाच्याच हिताचे नाही. इंदिराजींनी निवडणुकीपूर्वी मुस्लिम मते मिळावीत यासाठी अशी एकांगी भूमिका घेतली होती. परंतु आता त्या राष्ट्रहिताची भूमिका घेतील अशी आशा आहे आमच्या पक्षाने या प्रश्नावर सखोल विचार केला आहे. ऐन निवडणुकीच्या काळातही देशाच्या हितासाठी या भागातील परकीय नागरिकांची नावे यादीतून गाळली पाहिजेत अशी आग्रही भूमिका सर्वप्रथम मांडणारा जनता हाच एकमेव पक्ष होता.

**: पण तुमचे कोणी राष्ट्रीय नेते तिकडे जाऊन आल्याचं ऐकीवात नाही.**

: आमचे सरचिटणीस सुरेंद्र मोहन जाऊन आले आहेत. पक्षाध्यक्ष आणि अन्य नेतेही लवकरच त्या भागाला भेट देणार आहेत.

**: इंदिरा गांधींचे मंत्रिमंडळ नुकतेच सत्तारूढ झाले आहे, त्यावर आपली काही प्रतिक्रिया–**

: मला एच. एन. बहुगुणाबद्दल अपार सहानुभूती आहे. तसेच श्री. भगवत झा आझाद याचे मी अभिनंदन करू इच्छितो. त्यांनी राज्यमंत्रीपद नाकारून इंदिराजींची 'नोकरी' करण्यास नकार दिला आहे. मगर एक बात स्पष्ट है. मंत्रिमंडल से ये मालूम होता है कि श्रीमती गांधी के तौर तरीकोंमें कुछ परिवर्तन नही हुआ है।

**: लॉर्ड कॅरिंग्टन यांच्या भेटीनंतर श्रीमती इंदिरा गांधींनी अफगाणिस्तानाबद्दल केलेल्या निवेदनावर आपली काही प्रतिक्रिया ?**

: इंदिरा गांधींनी सोविएत रशियाच्या अफगाणिस्तानातील अतिक्रमणास विरोध केला आहे व त्यांची ही नवी भूमिका हा जनता पक्षाने प्रथमपासून घेतलेल्या भूमिकेचा विजय आहे. श्रीमती गांधींनी परकीय वृत्तपत्रांना मुलाखत देताना वेगळाच सूर काढला होता. आमचे युनोतील प्रतिनिधी बृजेश मिश्रा याच्या भाषणानेही भारताची भूमिका संदिग्ध बनली होती. वस्तुतः युनो-आमसभेच्या ठरावात 'सर्व परकीय शक्तींनी अफगणिस्तानातून बाहेर जावे' असेच केवळ म्हटले होते. त्यात रशियाचा उल्लेखही नव्हता, अशा स्थितीत भारताने या ठरावाबद्दल तटस्थ भूमिका का घ्यावी ? आपल्या या भूमिकेमुळे भारतीय उपखंडात आपण अलग पडल्यासारखे झाले होते. संसदेचे अधिवेशन सुरू झाल्यावर श्री. बृजेश मिश्रा याची भूमिका व श्रीमती गांधींचे आत्ताचे निवेदन यात असे अंतर का राहिले याचा जाब आम्ही विचारणार आहोत.

**: श्रीमती गांधी रशियन अतिक्रमणाबाबत हेच धोरण पुढे चालू ठेवतील को–**

: या घडीला काहीही सांगणे कठीण आहे.

**: पाकिस्तानला अमेरिकेकडून शस्त्र पुरवठा वाढत आहे, त्याबद्दल काय ?**

: हे सारेच प्रश्न एकमेकाशी संलग्न आहेत. तसेच रशियन अतिक्रमणामुळे उद्‌भविलेली परिस्थिती इतकी गंभीर आहे त्यामुळे तिसऱ्या जागतिक महायुद्धाचा धोका निश्चितच वाढला आहे. अफगाणिस्तान रशियाचे परंपरागत लक्ष्य आहे आणि रशियाच्या या उघड अतिक्रमणामुळे पाकिस्तानला शस्त्रे देण्याच्या अमेरिकेच्या इरादाला एक चांगले गोंडस निमित्त मिळाले आहे. 'अज्ञान आणि मागासलेपणा या पाकिस्तानच्या समस्या आहेत, शस्त्रास्त्राची कमतरता ही नव्हे' हे अमेरिकेला पटवून देण्यात जनता सरकार यशस्वी झाले होते, पण रशियाच्या या कारवाईमुळे त्याना एक आयता बहाणा मिळाला आहे शिवाय आता चीन आणि अमेरिकेच्या भारतीय उपखंडातील संयुक्त हालचालींना रोकणे अधिक कठीण झाले आहे. अशा स्थितीत रशियन अतिक्रमणाचे समर्थन करणे अत्यंत चुकीचे आहे.

**: आता एक शेवटचाच प्रश्न ? रा. स्व. संघाबाबत आपण काहीं चिंतनीय विचार व्यक्त केले होते. त्या संदर्भात रा. स्व. संघाने काहीं करावे याबाबत आपण प्रयत्नशील आहात किंवा कसे ?**

: पक्षातीलच काहींनी दुहेरी निष्ठेचा बागुलबुवा निर्माण केला होता, त्यावरील ती एक सहज प्रतिक्रिया होती. संघाचा विचार करण्यासाठी संघाचे नेते समर्थ आहेत. मी वेगळे काही करण्याची आवश्यकता नाही. बदलत्या परिस्थितीत संपूर्ण ताकदीसह जनता पक्ष बळकट व्हावा, वाढावा, यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे, आणि मी तेच करणार आहे.

**: पण संघ आणि दुहेरी निष्ठेबाबत एकदा सोक्षमोक्ष लावा असे वारंवार आपण सांगत आहात, तरीहीं हा वाद उफाळून वर येतोच आहे, त्याचे काय ?**

: ज्यांना केवळ वादच घालायचाय त्याची गोष्ट वेगळी, परंतु पक्षाचे अध्यक्ष आणि सर्व वरिष्ठ नेत्यांच्या मते हा वाद संपला आहे. जनता पक्षाचा एखादा कार्यकर्ता जोपर्यंत पक्षाची ध्येयधोरणे, पक्षाचे तत्त्वज्ञान इ. ना सोडून वा त्याच्याविरुद्ध काही कृती करीत नाही तोपर्यंत तो कोणत्या सांस्कृतिक संघटनेशी संबंध ठेवतो व काय करतो इ. बाबतची चर्चा पूर्णतः अनावश्यक, अनुचित आणि अप्रासंगिक आहे, आणि म्हणूनच माझ्या मते दुहेरी निष्ठेच्या प्रश्नात तथ्य नाही.

जनतात विलीन झालेल्या घटक पक्षाशी संबंधित अनेक विद्यार्थी, कामगार वा युवक संघटना आज कार्यरत आहेत. त्यांच्यात अधिक-अधिक सहकार्य वाढीला लागेल व या संघटना परस्पराच्या जवळ येतील याकडे अधिक लक्ष द्यायला हवे. □

बार्शी येथें भरणाऱ्या आगामी मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी विराजमान होणारे

# महाराष्ट्राच्या वैचारिक क्षेत्रातील बिनीचे 'सरदार'

## डॉ. भीमराव कुलकर्णी

साहित्य-संमेलनाच्या बाबतीत गेल्या काही वर्षांच्या घटना पाहिल्या तर, संमेलनाध्यक्षाच्या नाममहात्म्याचा आणि ही संमेलने ज्या ठिकाणी भरताहेत, त्या विशिष्ट स्थानांचा काही अन्योन्य संबंध असावा, असे वाटू लागते. 'यशवंत मी, जयवंत मी' म्हणणाऱ्याना कराडला दुर्गादेवीने दाखविलेला इंगा तर अजूनही ताजा आहे! वाक्यातील कर्त्याशी किंवा कर्माशी बाधीलकीच्या नात्याने निगडित असलेले क्रियापद कर्त्याला किंवा कर्माला धूप न घालता, तृतीय-, पुरुषी, नपुसकलिंगी बनले म्हणजे त्याला मराठीच्या व्याकरणात 'भावे प्रयोग' असे का म्हणतात, हे दादोबा पाडुरंगानी व्याकरण लिहिल्यावर लक्षात यावयास १४० वर्षे लागली. चंद्रपूरच्या साहित्य-संमेलनात दोन गंगाधराच्या स्पर्धेत त्या दोघाच्याही न कळत मध्येच चोर-घडी साधण्याची किमया करणाऱ्या वामनाला आपण सहजपणे तीन पावलात 'बळी'ना पाताळात लोटू, या संभ्रमातून बाहेर पडता पडता स्वत:ची अवस्था रामटेकच्या भग्न त्रिविक्रम वामना-सारखी झाल्याचे पाहावे लागले! त्यामुळे 'चंद्रपूरला जाण्यापेक्षा चंद्रावर जाणे बरे' अशा नव्या म्हणीचा मराठीत जन्म झाला. बार्शीच्या बाबतीत असे काही घडेल असे वाटत नाही. कारण मागचा अनुभव जमेस धरून, महाराष्ट्रातील विचारवंताचे नेतृत्व करणाऱ्या एका समन्वयशील सरदाराची योजना करण्याचे कौशल्य या वेळी बार्शीकरानी साधले आहे. 'बार्शी' हे नावच मुळी 'बारा शिव' या नावावरून संक्रमित झाले आहे. तेथे अशा प्रसंगी गंगाधरनामक या तेराव्या शिवाची योजना करण्याचे औचित्य कोणाच्या नजरेतून सुटेल? परंतु हा तेरावा आकडा भारतीय अंकमालिकेत काही सरळपणे घडू देण्यासाठी प्रसिद्ध नाही. त्यामुळे या बारा शिवाच्या माहेरघरी 'दक्ष दक्ष' म्हणतच आपल्या संमेलनरूपी उमेची प्रतिष्ठा साभाळण्याची कसरत अध्यक्षांना करावी लागेल की काय, अशी शंका येण्याइतपत आकाश ढगाळलेले आहे. इडापिडा टळो आणि हे ढग जिथल्या तिथे वितळोत!

'प्राध्यापक गंगाधर बाळकृष्ण ऊर्फ अण्णासाहेब सरदार' या नावाच्या केवळ उच्चाराने, आज त्या नावाला एक गंभीर, भारदस्त आणि आदरमिश्रित अशी सुंदर लय आहे, याची जाणीव होते. सरदाराचा जन्म ठाणे जिल्ह्यातील आदिवासी मुलुखातील एका छोटया कोळीराज्यामध्ये झालेला. जव्हार हे त्याचे नाव. महात्मा गांधींनी आपल्या जन्मासाठी जी तारीख निवडली, नेमक्या त्याच तारखेला म्हणजे २ ऑक्टोबरला सरदाराचा जन्म व्हावा, हाही एक लक्षणीय योगायोगच. त्यांना 'सरदार' ही उपाधी कशी मिळाली, यासंबंधी अद्यापपर्यंत माझ्या वाचनात काही आले नसले तरी, त्यांचे कोणी वाडवडील जव्हारच्या एवढ्याशा दरबारात कमरेला तलवार ठेवून बसताना माझ्यासारख्या कुलकर्ण्याने पाहिले असावे आणि सातबाराच्या खात्याला गुपचूपपणे 'सरदार' ही उपाधी लावून तो मोकळा झाला असावा, असे मानण्यास भरपूर जागा आहे. मात्र इंग्रजांच्या राज्यात आडनावाची आणि व्यवसायाची गल्लत भरपूर प्रमाणात झाल्याने त्याच्या वडिलांनी काही व्यापार, काही सावकारी करून तुका वाण्याचे ब्रीद साभाळण्याचे कार्य केले आहे, असे दिसते. कारण त्या काळच्या सावकाराप्रमाणे त्यांचे वडील नव्हते, हे त्याच्या-बद्दलच्या आठवणी लिहिणाऱ्यानी आणि त्याना ज्यानी ज्यानी आपल्या मुलाच्या घरी वृद्धावस्थेत पाहिले व त्यांनी आपल्या एकुलत्या एका मुलातून जे काही घडविले, त्यावरून अगदी सहजपणे लक्षात येते. गोरगरिबांच्या मोहल्ल्यात आपली व्यावसायिक नीतिमत्ता सांभाळून निष्ठेने व सचोटीने तद्वारा परमेश्वरभक्ती करता येते, हे त्यानी दाखवून दिले. तुका वाण्याप्रमाणे लाखाचे बारा हजार करण्याइतका अव्यवहारीपणा त्याच्यात नव्हता आणि त्यांच्या आजूबाजूच्या सावकारांप्रमाणे व्याजावर व्याज चढवून मुद्दलापोटी कुळांची आयुष्ये बरबाद करण्याचे व्यावसायिक कसब दाखविण्यातही त्यानी कधी कृतार्थता मानली नाही. बालपणापासून आपल्या सचोटीच्या आणि दयाधर्मशील मातापित्यांचे संस्कार घेऊन प्रा. सरदार समाजात वावरू लागले, त्यावेळी नकळतच मध्यमवर्गीयाची ब्राह्मणी चौकट झुगारून देऊन अवतीभवतीच्या दरिद्री नारायणामधून वाकडी वाट करून धुडाळण्याचा ध्यास त्यांच्या मनाने घेतला आणि तोच त्याच्या सबध आयुष्याला कलाटणी देणारा ठरला. आज प्रा. सरदाराची 'विचारवत' म्हणून जी काही घडण झालेली दिसते, त्याच्या प्रेरणा फार खोलवर आहेत. लहानपणी आदिवासींचे दारिद्र्याने पिचलेले हाडाचे सापळे आपल्या अवतीभवती अखंडपणे वावरताना त्यानी पाहिले. वारली, ठाकूर, महादेव कोळी, कातोडी, कोकणे इत्यादी लोकाचा तो अस्थिचर्म जनसागर पाहता पाहता त्याच्या जगण्याचे जे जीवघेणे दर्शन त्याना घडले, त्यावेळी आपल्या नेहमीच्या दोन डोळ्यानी त्याच्याकडे पाहण्याचे सामर्थ्यच आपण हरवून बसलो आहोत, याची त्यांना जाणीव झाली आणि त्याच्या-बद्दलच्या अपार करुणेनं, जिव्हाळ्यानं आपल्या तिसऱ्या डोळ्याने हा समाज पाहिल्याखेरीज हा समाज दिसणार नाही, कळणार नाही, हे त्याच्या लक्षात आले. त्याच्या हयातभरच्या प्रवासात ही सारी पददलित माणसे त्याना चागली कळली आहेत. परंतु ती कळणे ही

विचाराची पहिली पायरी आहे, त्यांना तशा अवस्थेतून सोडविण्यासाठी समाजामध्ये काय काय घडले पाहिजे, याचे चिंतन हाच त्याच्या मुक्तीचा खरा मार्ग आहे, हे त्यानी लक्षात घेतले आहे. म्हणूनच आपल्या समाजरचनेला दीनदलितांना मुक्त करण्याचे खरे सामर्थ्य कसे आणि केव्हा प्राप्त होईल, याचा चिरंतन ध्यास हा त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा एक महत्त्वाचा भाग आहे. 'ज्ञानान्मोक्ष' आणि 'ज्ञानापसि प्रेम उत्तम' या दुहेरी सूत्राची उपासना करूनच हा प्रश्न सुटू शकेल, या निर्णयाप्रत ते केव्हाच येऊन पोचले आहेत. आपल्या उमेदीच्या काळातच त्यांनी आपल्या आचारविचाराचा 'मार्ग' निश्चित करून त्या मार्गाने ते चालत राहिले आहेत. त्याची अनेकानेक दृश्य फळे त्यांच्या दृष्टिपथात येत आहेत, आणि सावकाश का होईना समाज-जागृतीची चिन्हे क्षितिजावर प्रकटलेली दिसताहेत, हे समाधानही त्यांना आहे. आपल्या चातुर्वर्ण्याधिष्ठित, जातीप्रधान आणि पापपुण्याच्या कल्पनांनी ग्रासलेल्या समाजात हे जागृतीचे कार्य मोठ्या प्रमाणात गतिमान होणार नाही, याची त्याना मनोमन जाणीव आहे. म्हणूनच आपल्या सनातनी विचार सरणीचा पुरस्कार करणारी किंवा ती विचारसरणी आंधळेपणाने आचरण्यात आपले कर्तव्य केल्याचे समाधान मानण्यातील गतानुगतिकता झुगारून देण्यासाठी ज्यांनी ज्यानी आपल्या आयुष्याची बाजी लावली, अशा कर्त्या पुरुषाचे, विचारवंतांचे ऋण हाती घेऊन सरदार वाटचाल करीत असताना दिसतात. कणाकणाने खडक फोडून त्यातून मशागती योग्य भूमी तयार करणाऱ्या जातिवंत कृषिवलाप्रमाणे हे विचाराचे संक्रमण करण्याचे कार्य, अनेक पिढ्याचे आहे. बुद्ध, महावीर याच्यासारख्या महापुरुषानी या प्रक्रियेला सुरुवात केली. महाराष्ट्रात तर ज्ञानेश्वरापासून फुले-आगरकर-आंबेडकरापर्यंत हे कार्य सातत्याने चालूच आहे. आपण एक त्या विचाराचा 'साधा पाईक' म्हणून त्यांचे विचार समजावून देण्याचे कार्य सरदारांनी हाती घेतले आणि त्याच्या कार्याचे मर्म समजावून देण्याचे कार्य आज सरदारानी इतक्या चांगल्या प्रकारे केले आहे की, त्याना आजच्या पिढीच्या विचारवंताचे विनीचे सरदार अशी उपाधी दिली तर ती सार्थ ठरेल, असा विश्वास वाटतो.

प्रा. सरदारांचा मनःपिंड हा इथून तिथून जातिवंत विचारवंताचाच होय. टिळक-गांधी युगाच्याकाळात आपल्याकडच्या राष्ट्रप्रेमी तरुणाना या महापुरुषाच्या छायेत राहून कृती करण्याची प्रेरणा मिळत गेली. त्यामुळेच कदाचित याकाळात तरुणांमधील कृतिशीलता वाढीस लागली, परंतु स्वतंत्रपणे कर्तृत्व गाजविण्याची, स्वतंत्र रीत्या विचार करण्याची त्याची शक्ती क्षीण झाली असावी, असे मानण्यास खूपच जागा आहे. कारण 'सेनापति' जितका मोठा तितकी त्याच्या मुखाने विचार करण्याची सवय शिपायाना लागते. प्रा. सरदाराना अशा प्रकारची कृतिशीलता मानवण्यासारखी नव्हती. अगदी बी. ए. ची परीक्षा तोंडावर आली असता, तत्कालीन लाटेबरोबर हेलकावे खात, त्यानीही गांधीच्या मिठाच्या सत्याग्रहात उडी घेऊन तुरुंगाचा रस्ता धरला आणि आपल्या एकुलत्या एका मुलाने हा आततायीपणा करावा, या कल्पनेते त्यांच्या संस्थानी वातावरणात वाढलेल्या आईवडिलाना खूपच मानसिक कष्ट त्यानी सोसावयास लावले. ही कृतिशीलता आपणास मानवणारी नाही, हे त्यावेळीच त्यांच्या लक्षात आले. धर्मनिष्ठ अशा मध्यवर्गीय सारस्वत-ब्राह्मणाच्या कुळात अशा कृतिशील धकाधकीची फारशी मोठी परंपराही नाही. स्वास्थ्यप्रिय बौद्धिक विलासात किंवा त्या स्वास्थ्यप्रियतेला पोषक ठरेल अशा मध्यमवर्गीय चाकरमान्याचे जीवन जगणारा हा समाज. या समाजात जन्मलेल्या सरदाराना आपल्या घरच्या वातावरणामुळे, चिंतन, लेखन, चर्चा हेच आपल्या प्रकृतीला विशेष मानवणारे आहे, याची जाणीव झाली. आपल्या हयातभरच्या या क्षेत्रातील त्यांच्या तपश्चर्येने अनेक कृतिशील कार्यकर्त्यांना जमले नाही, ते प्रगमनशील विचार मंथनाचे कार्य करण्यात ते आज आघाडीवर राहिले आहेत, हे स्पष्टपणे दिसून येतच आहे.

## वामन मल्हारांचा वारसा

शिक्षण पुरे झाल्यानंतर सरदारांना पुण्याच्या नाथीबाई ठाकरसी महिला विद्यापीठामध्ये अध्यापनाचे कार्य करण्याची संधी मिळाली, हा योगायोगही त्यांच्या वैचारिक घडणीत महत्त्वपूर्ण ठरला आहे. प्रा. वामन मल्हार जोशी याची समतोल विचाराची परंपरा त्यांना खूपच जवळची वाटावी अशी होती. स्त्रीजीवनाबद्दल अतीव आस्था आणि जिव्हाळा असणाऱ्या वामनरावांनी आपल्या लेखनाला त्या जिव्हाळ्यातून स्त्रीजीवन चिंतनाची एक अनोखी बैठक प्राप्त करून दिली. सरदारांनी त्यांचा वारसा चालविण्याचे, त्यांच्या खुर्चीवर बसताक्षणीच, जणू मनोमन ठरविले असावे. परंतु वामन मल्हाराचे स्त्रीजीवनविषयक चिंतन आणि प्रा. सरदाराचे चिंतन यात एक मूलभूत भेद आहे. स्त्रीशिक्षणामुळे एक अननुभूत अशी बौद्धिक शक्तीची एक नवी जाण स्त्रियांना नव्यानेच प्राप्त होत होती, तिची रूपे न्याहाळण्यात वामनराव दंग झाले होते. आपल्या अभिजात सौजन्य प्रियतेने वामनराव ही स्त्रीशक्ती कुतूहलाने न्याहाळीत होते आणि नव्या प्रेरणांची जाणीव देऊन तिला ते अभिमंत्रितही करीत होते. सरदारानी या समोर बसलेल्या स्त्रीशक्तीला वामनरावाप्रमाणेच केवळ वाङ्मयीन जाण देण्याचे कार्य न करता, सामाजिक प्रेरणाचे भान ठेवून समाजात का वावरले पाहिजे, हे सागण्याचे कार्य केले. आयुष्याच्या चिंतनशीलतेच्या आजच्या परिपक्व अवस्थेत, नवे शिक्षण प्राप्त झालेली आजची स्त्री कालच्यापेक्षा कितपत पुढे गेली आहे, असा प्रश्न त्याना वारंवार पडतो. केवळ पुस्तकी शिक्षणाने आजची स्त्री पुढे चालली आहे, प्रगत जाणिवाच्या मानसिक शिक्षणाच्या अभावी तिच्यात एक 'नवे दास्य' उदयास येत आहे, याने ते अस्वस्थ आहेत. एकदरीत कालच्या स्त्रीप्रमाणे आजची स्त्रीही पिचतेच आहे, तिच्या पिचण्याची आजची रीत वेगळी एवढाच काय तो फरक. आपल्या एकदर समाज शक्तीमध्ये परंपरेचे अधिष्ठानच इतके प्रबळ आहे की, त्याच्याविरुद्ध झगडण्याचे त्राण नसलेला आपला समाज सर्व अंगानी सारखा पिचतो आहे, ही आजच्या विज्ञाननिष्ठ युगातही आपली खरी शंका आहे. आदिवासी समाजातील आपल्या बरोबर वावरणारे लहानपणचे मित्र आपल्या डोळ्यापुढे फारसे शिक्षण न घेताच दारिद्र्याने झिजत नाहीसे झाल्याचे जसे त्याना पहावे लागते तसेच आपल्यासमोर बसलेल्या अनेक बुद्धिमान स्त्रिया शेवटी रूढ संसाराच्या गर्तेतच पडून निष्प्रभ होत गेल्या, हेही त्याना दिसून आले. अशावेळी बहुजन समाजातील

पृष्ठ १८ वर

# पुनरागमन असे घडले. पुनर्मांडणी मात्र कठीण

प्रा. अशोक चौसाळकर, कोल्हापूर

१९८० च्या सुरुवातीस इंदिरा गांधी पुन्हा भारताच्या प्रधानमंत्री बनत आहेत. १९७७ साली त्यांचा पराभव झाल्यानंतर त्या राजकीयदृष्ट्या संपल्या असल्याचा त्यांच्या राजकीय विरोधकांनी पुकारा केला. चरणसिंगांनी तर सांगितले की, जनता पक्ष पुढील तीस वर्षे सत्तेवर राहाणार आहे. पण १९७७ च्या मध्यास इंदिरा गांधींनी राजकारणात पुन: प्रवेश केला आणि एका नव्या राजकीय शक्तीचे सृजन करीत, अनेक प्रतिकूल अडचणींना तोंड देत त्यांनी १९८० च्या सुरुवातीस सत्ता आपल्या ताब्यात घेतली. इंदिरा गांधींच्या नेत्रदीपक आणि आश्चर्यकारक 'पुनरुज्जीवनाचा प्रस्तुत लेखात अभ्यास करण्यात आला आहे.

इंदिरा गांधींच्या साध्य व साधनाबाबत मतभेद असले तरी विसाव्या शतकातील उत्तरार्धातील त्या एक वेगळ्या आणि अतिशय महत्त्वाच्या अशा नेत्या आहेत.

भारतात लोकशाही राबवताना भारतीय समाजाचे ऐक्य कायम राहावे अशी पं. नेहरूंची इच्छा होती. भारतात संसदीय लोकशाही असताना त्यांनी या सर्व बाबींकडे लक्ष दिले होते. समाजातील वैविध्य आणि भेद यांच्या आविष्कारास मुक्त स्वातंत्र्य देऊनही या समाजास एकतेच्या सूत्रात बांधणारी अशी ही राज्यपद्धती होती. यामध्ये सर्वसाधारण भारतीयांच्या राजकीय सुज्ञतेवर विश्वास ठेवण्यात आला होता. त्यामुळे समाजातील स्पर्धा या राजकीय व्यवस्थेमध्ये अभिव्यक्त होत राहिल्या. १९५२ पासून जरी दरडोई मताधिकार बहाल करण्यात आला तरी त्या हक्काचा अर्थ व आशय समजावयास बराच वेळ लागला. या काळात पं. नेहरू भारतात नव्याने निर्माण झालेल्या मध्यमवर्गाचे पुढारी होते. म्हणूनच ते जाती, धर्म, वर्ग आणि भाषा यांना छेदून जाणारे, भारताच्या एकात्मतेचे प्रतीक होते. प्रख्यात ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञ उर्सुला हिग्स म्हणतात त्याप्रमाणे भारतात एकतेची भावना फार तीव्र आहे आणि पं. नेहरू याचे प्रतीक होते. त्यांनी भारताच्या आधुनिकीकरणास सुरुवात केली आणि औद्योगिकरण व आधुनिकीकरण यातून निर्माण झालेल्या सामाजिक व आर्थिक शक्तींनी स्पर्धा तीव्र केली आणि विकासाच्या नव्या वाटा निर्माण केल्या. पं. नेहरू भारताचा भांडवलशाही मार्गाने विकास करू इच्छित होते. पण त्यांनी एक भान सतत राखले. लोकांच्या पाठिंब्यावर व शक्तीवर अवलंबून राहून राजकारण केले तरच या देशातील एकात्मता व लोकशाही टिकेल हे ते भान होते.

पं. नेहरूंचा वारसा खऱ्या अर्थाने इंदिरा गांधींच्याकडे आला. १९६९ पर्यंत त्या भांडवलदार, परदेशी कंपन्या आणि बडे जमीनदार यांच्याशी आघाडी सांभाळून राज्य करीत होत्या. पण १९६९ साली त्यांनी नव्या धोरणाचा स्वीकार केला. त्या नव्या प्रगतीशील व राष्ट्रवादी भांडवलदारांच्या पुढारी बनल्या. पाश्चात्य साम्राज्यवाद्यांच्या मदतीने देशाचा भांडवली विकास घडवून आणणाऱ्या वर्गाच्या त्या शत्रू बनल्या आणि १९६९ साली भारतातील वर्गसंघर्षास एक नवे वळण लागले पण इंदिरा गांधींच्या तडफदार राजकारणामुळे, त्यांच्या 'गरिबी हटाव'च्या घोषणांमुळे आणि विरोधकांच्या कमजोर आघाडीमुळे त्यांनी १९७१ साली मोठा विजय संपादन केला.

१९७२–७३ साली देशात दुष्काळ पडला. शिक्षणाच्या सार्वत्रिक प्रसारामुळे आणि लोकशाहीच्या संख्यात्मक विस्तारामुळे लोकांच्या मनात तीव्र राजकीय जाणीव निर्माण झाली होती, हरित क्रांतीमुळे नवा शेतकरी वर्ग उदयास येत होता. वाढत्या कारखानदारीमुळे लढावू कामगारवर्ग वाढत होता. या निरनिराळ्या गटात संघर्षास सुरुवात झाली. दरडोई मताधिकार आणि देशातील लोकशाहीमार्गाने होणारी आधुनिकीकरणाची प्रक्रिया याचा तो राजकीय आविष्कार होता. १९७३–७४ मध्ये संघटित क्षेत्रात आणि पांढरपेशा मध्यमवर्गात फार मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला. जयप्रकाशांचे 'नवनिर्माण' आंदोलन या असंतोषाची अभिव्यक्ती होती.

यातूनच राज्यपद्धतीवर प्रचंड दबाव आला आणि इंदिरा गांधींची लोकप्रियता पण घसरू लागली. त्यापासून निर्माण झालेल्या अडचणीतून निघण्यासाठी इंदिरा गांधींनी आणीबाणीची घोषणा केली. आणीबाणीच्या काळात पण इंदिरा गांधींना संसदीय लोकशाही नष्ट करावयाची होती असे वाटत नाही. कारण भारतासारख्या विशाल देशात, जेथे राजकीय जागृती मोठ्या प्रमाणात झाली आहे–हुकुमशाही फार दिवस चालणार नाही असे त्यांना वाटत असावे. १९७७ साली निष्पक्ष आणि स्वतंत्र निवडणुका घेऊन त्यांनी पुन: संसदीय लोकशाहीची पुनर्स्थापना केली. शांततामय मार्गाने सत्तांतर करून त्यांनी त्यांच्या राजकीय जीवनातील सर्वांत चांगली गोष्ट केली. त्यामुळेच त्यांना आज प्रधानमंत्री बनता आले. मि. रॉय विनरसारख्या अमेरिकन राज्यशास्त्रज्ञाने याबाबत त्यांचे कौतुकच केले आहे.

जनता पक्षाचा विजय हा संसदीय लोकशाहीचा विजय होता. ज्या मध्यमवर्गाने १९७१ साली इंदिरा गांधींना सत्तेवर आणले त्या वर्गानेच जनता पक्ष हा एक नवा पर्याय निर्माण करून त्यांना पदच्युत केले. जयप्रकाशांच्या नेतृत्वामुळे जनसंघ, भालोद व संघटना कॉंग्रे-

सचे मूळचे प्रतिगामी स्वरूप झाकाळले गेले आणि एक राष्ट्रीय पर्याय उभा राहिला. इंदिरा गांधींचा फार मोठ्या प्रमाणात पराभव झाला.

मोरारजी देसाई प्रधानमंत्री झाले. पण ते नव्याने उगम पावणाऱ्या वर्गाच्या आशाआकांक्षा पूर्ण करू शकले नाहीत कारण त्यांचे विचार बरेचसे मागासलेले होते. त्यामुळे त्यांनी नेहरू युगातील अनेक लोकशाही प्रथा परत आणल्या तरी सरकारबद्दल लोकांचा अपेक्षाभंग सुरू झाला. त्यातच गृहमंत्री चरणसिंग व संरक्षण मंत्री जगजीवनराम यांच्यामध्ये संघर्षास सुरुवात झाली. चरणसिंग नव्याने श्रीमंत झालेल्या मागासवर्गीय शेतकऱ्यांचे पुढारी होते तर जगजीवनराम हरिजनांचे. चरणसिंगांनी इंदिरा गांधींवर हल्ले करावयास सुरुवात केली कारण इंदिरा गांधींना नेस्तनाबूत करून आपण मोरारजींना काढू शकू असे त्यांना वाटत होते. इंदिरा गांधींवर खटला भरणे हा त्यांच्या दृष्टीने राजकारणातील एक डाव होता. सरकारने शहा आयोगाची स्थापना केली. शहा आयोगाने जनता पक्षास आपला राजकारणासाठी वापर करू दिला. शहा आयोगाची कार्यप्रणाली विचित्र होती. कारण व्यक्तीला गुन्हेगार समजून न्यायमूर्ती शहा प्रश्न विचारत असत. अर्थात शहा आयोगाचे सर्वच निष्कर्ष चूक आहेत असे म्हणता येणार नाही पण आधी नियुक्त करण्यात आलेल्या आयोगाप्रमाणेच त्याचादेखील राजकाणासाठी वापर करण्यात आला. इंदिरा गांधी इतके दिवस गप्प होत्या पण त्यांना अटक करण्यात आली आणि त्या पुनः राजकारणात उतरल्या.

## तीन धडे

१९७७ च्या पराभवापासून इंदिरा गांधी तीन धडे शिकल्या होत्या. त्या संदर्भातच राजकारण करण्याचा त्यांचा विचार होता.

१. एकदा पराभव झाला तरी लोकशाहीत जनता सार्वभौम असते आणि जनतेचा गमावलेला पाठिंबा त्यांच्या समस्यावर झगडे करून पुनः मिळविता येऊ शकतो.

२. परंपरा आणि नवता यांच्या संघर्षात सापडून आधुनिकीकरणाकडे जाणाऱ्या खंडित व विभाजित भारतीय समाजास राष्ट्रीय आणि अखिल भारतीय पुढाऱ्यांची गरज आहे. विविधतेतून एकता निर्माण करण्याची गरज आहे. जनता पक्षाजवळ एक तत्त्वप्रणाली नाही आणि पुढारीदेखील नाही म्हणून पक्षातील अंतर्भेदामुळे त्यात फूट पडणे अपरिहार्य आहे. अशावेळी त्याच फक्त पर्याय बनू शकतात.

३. स्पर्धात्मक राजकारणातून निर्माण झालेल्या समस्या आणीबाणीसारख्या उपायांनी सुटत नसतात तर त्या राजकीय उपायांनी सोडवाव्या लागतात.

१९७७ च्या लढ्यात काँग्रेस पक्ष त्यांच्या विरोधकांच्या ताब्यात होता. देवकांत बारुआसारखे त्यांचे जुने मित्र त्यांचे शत्रू झाले होते. त्यांच्या पाठिंब्यावर निवडून आलेले ब्रह्मानंद रेड्डी त्यांचे शत्रू बनले. रेड्डी व चव्हाण यांनी काँग्रेस आपल्या ताब्यात घेऊन शंकरराव चव्हाण, टी. अंजैया, देवराज अरस यांच्यासारख्या इंदिरा पाठिराख्यास महत्त्वाच्या पदावरून दूर करण्यास सुरुवात केली. काँग्रेसचा इंदिरा गांधी यांच्यामुळे पराभव झाला असे बहुसंख्य काँग्रेसजनांना वाटत होते. जून १९७७ साली ९ राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुका झाल्या व त्यात काँग्रेसचा पुनः पराभव झाला. जनता पक्षाचा विजय झाला असला तरी बहुतेक ठिकाणी पक्षाला मिळालेल्या मतात घट झाली. उदा. उत्तर प्रदेशात पक्षास मार्चमध्ये ६८ टक्के मते मिळाली होती. पण जूनमध्ये त्यास फक्त ४८ टक्केच मते मिळाली. याउलट काँग्रेसला ३२·५ टक्के मते मिळाली; जी मार्चमध्ये मिळालेल्या मतापेक्षा जवळ जवळ सात टक्के जास्त होती. चव्हाण–रेड्डींना नसले तरी इंदिरा गांधींना हे समजून चुकले की, जनता पक्षावर एक मोठा विभाग नाराज झाला आहे. समाजातील जाती व वर्गसंघर्षाची अचूक जाण असल्यामुळे हा वर्ग दलितांचा आहे हे समजण्यास त्यांना वेळ लागला नाही.

हरिजन आणि मुसलमान हे वर्ग जनता पक्षापासून दूर जात असून या दोन विभागाच्या जोरावर आपण राजकारणात परत येऊ शकू याची खात्री पटताच त्यांनी उडी घेतली. त्यांच्यापुढे दोन अडचणी होत्या. काँग्रेस पक्षावर चव्हाण व रेड्डी यांचा ताबा होता आणि चरणसिंग आणि जनता सरकार त्यांच्या हात धुऊन पाठीस लागले होते. पण इंदिरा गांधींच्या अनुपस्थितीत चव्हाण–रेड्डी पक्षाचे व्यवस्थित नेतृत्व करू शकले नाहीत. जनता पक्षातील अंतर्गत विसंवादामुळे आणि उजव्या अर्थकारणामुळे देशात असंतोष निर्माण झाला. कारण लोकांना त्वरित बदल हवा होता. पण चरणसिंगांनी सार्वजनिक क्षेत्रांवर हल्ले करावयास सुरुवात केली. पक्षाने जमीन सुधारणाबाबत बोलायचेच बंद केले. जनसंघाने पक्षावर वर्चस्व मिळविण्याचा प्रयत्न सुरु केला आणि इतिहासाच्या शैक्षणिक पुस्तकात लुडबुड करून मुसलमानांना दुखवले. जातीय दंगलींची त्यातच भर पडली. जनता पक्षातली भांडणांनी लोक वैतागले.

या सर्व गोष्टींचा फायदा घेण्यासाठी इंदिरा गांधींनी लोकांचा पाठिंबा खालून उभारावयास सुरुवात केली दलितांवरील अत्याचाराविरुद्ध त्यांनी रान उठविले आणि चरणसिंगांवर जबरदस्त हल्ला केला. मोरारजी–चरणसिंग हे भांडवलदार व जमीनदार यांचे प्रतिनिधी असून सर्वसाधारण लोकांसाठी लढणारी एक बहादुर स्त्री म्हणून त्यांनी आपली प्रतिमा लोकांत उभारावयास सुरुवात केली. हरिजन–गिरिजनांनादेखील इंदिरा गांधींसारखा पुढारी असला तर हवाच होता. १९७७ साली गुजरातमध्ये या वर्गाचा त्यांना प्रचंड पाठिंबा मिळाला. इंदिरा गांधींचा सरकारशी विरोध जेवढा तीव्र, जेवढा आक्रमक, तेवढा जास्त पाठिंबा त्यांना मिळू लागला.

१९७८ साली त्यांनी काँग्रेस पक्षाचे दुसऱ्यादा विभाजन केले. या विभाजनात रेड्डी व चव्हाण यांची फारशी चूक नव्हती पण इंदिरा गांधींना काँग्रेस आपल्या ताब्यात घ्यायची होती. आंध्र आणि कर्नाटक या राज्यात सत्ता काबीज करणे आणि महाराष्ट्र व आसाम या प्रांतात चव्हाण व बारुआ यांचे सामर्थ्य खच्ची करणे हे दोन प्रमुख उद्देश त्यामागे होते. यावेळी काँग्रेस नेत्यांनी त्यांना पाठिंबा दिला नाही, पण तिसऱ्या चौथ्या क्रमांकाचे पुढारी त्यांच्या पक्षात सामील झाले. बहुमत चव्हाण आणि रेड्डी यांच्यापाठीमागे होते. परंतु निवडणुकांचा निकाल लागताच बहुसंख्य काँग्रेसवाले आपल्यामागे येतील याची त्यांना खात्री वाटत होती. त्यामुळे त्यांनी हा धोका पत्करला.

हरियानातील कर्नाल, उत्तर प्रदेशातील आझमगड आणि बिहार-

मधील समस्तीपूर येथे झालेल्या संसदीय पोटनिवडणुकीत कॉंग्रेस (आय) च्या उमेदवारांनी ४५ टक्क्यापेक्षा जास्त मते मिळविली. आंध्र व कर्नाटक या दोन राज्यात जनता व कॉंग्रेसचा प्रचंड पराभव झाला. महाराष्ट्रात पण साखरसम्राटांची सत्ता नष्ट करीत पक्षाने उल्लेखनीय यश मिळविले. कॉंग्रेसजन इंदिरा कॉंग्रेसमध्ये मोठ्या प्रमाणावर सामील झाले. १९७८ च्या सुमारास इंदिरा गांधीनी पहिली फेरी जिंकली. त्यांनी कॉंग्रेसमधील आपल्या विरोधकाचा पराभव करून जनता पक्षावर हल्ला करावयास सुरुवात केली.

याच काळातील जनता पक्षातील अंतर्गत मतभेद विकोपास गेले. सूरजकुंडहून चरणसिंग मोरारजीवर शरसंधान करीत होते. त्याचे पर्यवसान चरणसिंगाना मोरारजीनी मंत्रिमंडळातून काढून टाकण्यात झाले. इंदिरा गांधींचा जनता पक्ष फोडण्याचा प्रयत्न चालू होता कारण त्याना माहीत होते की, अमर्याद महत्त्वाकांक्षा असलेले, स्वार्थ हाच देव मानणारे आणि आलेली संधी हीच शेवटची मानून ती मिळविण्यासाठी वाटेल ते करणारे अनेक वरिष्ठ नेते जनता पक्षात आहेत. चरणसिंग व जगजीवनराम यांच्यापैकी चरणसिंग आपल्या काव्यास लवकर बळी पडतील असे त्याना वाटत होते कारण चरणसिंगाच्या पाठीमागे जास्त खासदार होते.

त्यासाठीच त्यानी चिकमगळूरहून निवडणूक लढविली आणि जनता पक्ष उमेदवाराचा सणसणीत पराभव करून जिंकली पण लोकसभेचा विशेषाधिकार भंग केला म्हणून त्याना लोकसभेतून काढून टाकण्यात आले आणि त्याना तुरुंगात पाठविण्यात आले. याच काळात त्यांचे उमेदवार समस्तीपूर, फत्तेपूर, खंडवा व सिधी येथून पराभूत झाले. मोरारजींनी स्पेशल कोर्टचे पाश त्याच्याभोवती आवळावयास सुरुवात केली आणि देवराज अरस व एम्. जी. आर. पण त्यांच्यापासून फुटले. एकात्म जनता पक्षाचा पराभव करणे आपणास अवघड आहे असे त्याना वाटू लागले. 'किस्सा कुर्सी का' खटल्यात संजय गांधीना सजा झाली आणि खास न्यायालयाचे पाश त्यांच्या गळ्याभोवती आवळले जाऊ लागले.

प्रस्थापित व्यवस्थेमध्ये आपणास स्थान नाही याची जाणीव होताच हा लढा व्यवस्थेबाहेर जाऊन लढविण्याचा इंदिरा गांधीचा विचार होता. कारण त्याना ज्या वर्गांचा पाठिंबा होता त्या वर्गांचे या व्यवस्थेमध्ये फारसे हितसंबंध गुंतलेले नव्हते. तळातले वर्ग इंदिरा गांधीना व्यवस्थेबाहेर खेचू इच्छित होते. पण त्यांचे अरस, रेड्डी, तिरपुडे यांच्यासारखे सहकारी न्यायालयाच्या अधिक्षेपास तयार नव्हते. कारण ते मूलतः 'कॉंग्रेस कल्चर'च्या विरुद्ध होते पण इंदिराजींच्या बंडखोर प्रतिमेस साजेसे होते.

या अडचणीतून चरणसिंगानी इंदिरा गांधीची सोडवणूक केली. त्यानी जनता पक्षाविषयी लोकाच्या मनात अप्रीती निर्माण केली (त्याच्या अंदाजपत्रकामुळे मोठ्या प्रमाणात वाढ झाली.) राजनारायण व मधु लिमये यानी जनता पक्षातील जातीयवादी शक्तीवर हल्ले करून जनता पक्षात विभाजन घडवून आणले. गेली दोन वर्षे इंदिरा गांधी याचीच वाट पाहात होत्या. १९६९ साली अशीच चरणसिंगानी त्यांची कोंडीतून सुटका केली होती. त्यावेळी त्यानी व्ही. व्ही. गिरी याना दुसऱ्या क्रमांकाची मते देऊन याच मोरारजींच्या चक्रव्यूहातून इंदिराजींची सुटका केली होती. इंदिरा गांधीची चक्रव्यूहातून सुटका होताच, त्यानी आपल्या अभिजात राजकीय कौशल्याद्वारे चरणसिंग व चव्हाण याना पाणी पाजले.

१९७९ च्या जुलै-ऑगस्ट महिन्यात इंदिराजी सोडून इतर सर्व पक्षाचे पुढारी मधू लिमयानी निर्माण केलेल्या भ्रमजालात अडकले होते लिमयानी तिसऱ्या पर्यायाची कल्पना मांडली आणि स्थितीवादी मोरारजी-जनसंघ याच्यापासून सुटका करून घेण्यासाठी या भ्रमजालाकडे सर्वजण धावले. ही कल्पना कितपत व्यवहार्य आहे. याचासुद्धा कुणी विचार केला नाही. इंदिरा गांधीना हे भ्रमपटल फारच उपयोगी पडले. कारण त्याच्या मदतीने तिसऱ्या आघाडीचे सरकार बनत असेल तर ते त्याना हवेच होते. चरणसिंगाना प्रधानमंत्री बनायचे होते आणि चव्हाण-इंदिरा गांधी यानी त्याना प्रधानमंत्री बनविले. त्याना डाव्या व उजव्या साम्यवादी पक्षानी पाठिंबा दिला. हे सारे त्यावेळी अशा भ्रमात वावरत होते की, थोड्याच दिवसात आपण स्वतंत्र होऊ आणि बाईंना तुरुंगात पाठवू. पण इंदिराबाई काही कच्चा गुरूच्या चेल्या नव्हत्या. मधू लिमये आणि राजनारायण याचे शहाणपण त्यानी मागेच जोखले होते.

## कॉंग्रेस (यू) नामशेष

कॉंग्रेस पक्षाने स्वत चे हसे करून घेतले. निवडणुकानंतर पक्ष निष्प्रभ झाला आणि पक्षाचे सर्व सामर्थ्य एकीकरणवादी आणि एकीकरणविरोधी कॉंग्रेसवाल्याच्या झगड्यात खत्म झाले. दरम्यान देवराज अरस आणि नासिकराव तिरपुडे याचा गट फुटून निघाला. एकीकरणविरोधकांचे असे मत होते की, जनता पक्षात फूट पडल्यानंतर पक्षास राष्ट्रीय राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावता येईल. त्याच्या इच्छेप्रमाणे जनता पक्ष फुटला देखील. पण कॉंग्रेसचे नेते यावेळी गडबडले. स्वर्णसिंग व चव्हाण यांनी आपला पक्ष बिनभरवशाच्या चरणसिंगांच्या दावणीला नेऊन बांधला. २५ मंत्रीपदे मिळून सुद्धा त्याना ७५ खासदाराना एकत्र राखता आले नाही. पक्षात फूट पडली. आपल्या पक्षाची ताकद माहीत असतानाही त्यानी चरणसिंगांना लोकसभा बरखास्त करू दिली. त्याना माहीत असायला हवे होते की, त्यांचा पक्ष डिपॉझिट गमावणाऱ्या लोकाचा पक्ष आहे आणि निवडणुकीस सर्वात जास्त नुकसान त्याच्याच पक्षाचे होणार आहे. पण चव्हाण मधू लिमयाच्या भ्रमजालात अडकले. कॉंग्रेस (यू) पक्ष त्याच्या अविचाराची फळे सध्या चाखीत आहे. काही दिवसात तो नामशेष झाल्याशिवाय राहणार नाही. कारण संघटना कॉंग्रेसच्या म्हाताऱ्या नेत्यामध्ये होती तेवढी जिद्द पण पक्षाच्या सध्याच्या नेतृत्वाजवळ नाही.

इंदिरा गांधीनी शत्रू पक्षात पसरलेल्या भ्रमजालाचा फायदा घेऊन चरणसिंगांना प्रधानमंत्री बनविले आणि एका महिन्यात त्यांना पदच्युत केले. या काळात संजीव रेड्डी, चव्हाण व चरणसिंग यानी इंदिरा गांधीनी आणीबाणीत केली नसेल तेवढी भारतीय राज्यघटनेची विटंबना केली. ज्या प्रधानमंत्र्याने एकदाही लोकसभेच्या सामोरे न जाता बहुमत नाही म्हणून आपल्या पदाचा राजीनामा दिला तो प्रधानमंत्री आपण खरेखुरे प्रधानमंत्री आहो म्हणत देशावर सहा महिने राज्य करीत राहिला. देशाच्या अर्थकारणाचे अपार नुकसान करीत राहिला. 'डाव्या' व 'लोकशाहीवादी' आघाडीचो

फळं इतकी कडू असतील असे वाटले नव्हते.

चरणसिंगांना पदच्युत करून आणि लोकसभेच्या मध्यावधी निवडणुका घ्यावयास लावून इंदिरा गांधीनी दुसरी फेरी जिंकली आणि कसलेल्या खेळाडूप्रमाणे त्यानी तिसऱ्या फेरीसाठी तयारी सुरू केली. यावेळी त्यांचा अर्धा विजय निश्चित होता. कारण त्याना त्रिकोणी संघर्षास तोंड द्यायचे होते आणि त्रिकोणी संघर्षात ज्या पक्षास ३५ टक्के मते पडतात तो जिंकू शकतो असे यामागचे साधे गणित होते, जे राजकीय पडिताना समजले नाही. इंदिरा गाधीना तळातील वर्गाचा पाठिंबा होता आणि त्याचा मूळचा पाठिंबा टिकून होता. तळातल्या वर्गाचा त्याना पाठिंबा असल्यामुळेच त्या जयप्रकाशांच्या वावटळीत पण टिकून राहिल्या. कोणत्याही पक्षास बहुमत मिळणार नाही हे राजकीय पडित कोणत्या आधारावर सागत होते हे जाणणे अवघड आहे. कारण ज्याला आपल्या निवडणूक पद्धतीची थोडीतरी माहिती आहे त्याला हे कळून यायला हवे होते की, विरोधी मतात मोठ्या प्रमाणात फाटाफूट झाल्यामुळे काँग्रेस (आय)ला गुणक मिळणार आहे, जो त्या पक्षाला ३५ टक्के मते मिळाली तरी बहुमत मिळवून देईल.

इंदिरा गाधीनी आपली संघटना उभारावयास सुरुवात केली. त्या एकट्याच स्थिर सरकार देऊ शकतात याची खात्री पटताच भाडवलदार आणि हितसंबंधी गट त्यांच्याभोवती गोळा होऊ लागले. एच. एन. बहुगुणा, शंकरराव चव्हाण, वसंतदादा पाटील, मोहनलाल सुखाडिया, के. हनुमन्तैया यानी पक्षात सामील होण्याचा निर्णय घेतला. हळूहळू हरिजनाची, मुसलमानांची व इतर दलिताची बाजू घेऊन लढणारा पक्ष ही प्रतिमा धूसर होत जुन्या काँग्रेस पक्षाची प्रतिमा निर्माण होऊ लागली, जो सर्वसमावेशक होता. नव्याने मतदार झालेल्या वर्गास आपल्याकडे ओढण्याचा प्रयत्न त्यानी सुरू केला. चार महिन्यात पक्ष निवडणुकीस सज्ज झाला.

याच काळात चरणसिंग राजनारायण यानी धुमाकूळ घातला. जनता पक्षवाले भाडत राहिले आणि जगजीवनराम आपण पुन: जिंकणाऱ्या बाजूकडे जावे की जनता पक्षात रहावे याचा विचार करू लागले. यावेळी आपली व्यूहनीती इंदिराजीनी विचारपूर्वक आखली होती. त्याचे विरोधक दोन तीन गटात विभागले होते. चरणसिंग मागासवर्गीय शेतकऱ्याच्या पाठिंब्यावर भर देत होते पण त्याचा प्रभाव हरियाना व प. उत्तर-प्रदेशापुरताच मर्यादित होता. नुसत्या मागासवर्गीयाच्या पाठिंब्यावर चरणसिंगाना विजय मिळविणे शक्य नव्हते. जनता पक्ष उच्च वर्गीयाच्या पाठिंब्यावर विसंबून होता पण चरणसिंगाची भीती दाखवून त्यानी उच्चवर्णीयाना आपल्याकडे ओढले. जनता पक्षास उत्तर भारतात फक्त राजपुताची आणि बनियाचीच मते मिळाली. जगजीवनराम याच्यामुळे आपणास हरिजनाची मते मिळतील असे जनता पक्षास वाटले. जगजीवनराम याच्यामुळे हरिजनाची मते विभागतील अशी इंदिरा गाधीना भीती वाटत होती म्हणूनच त्यानी राम आमच्या पक्षात येणार आहेत अशा अफवा पसरविल्या, त्याना जनता पक्ष प्रधान मंत्री करणार नाही असे सागावयास सुरुवात केली. हा हरिजनांची मते मिळविण्यासाठी केलेला डाव आहे असे सागावयास सुरुवात केली. याचा मतदाऱ्यावर चागला प्रभाव पडला.

चरणसिंगांच्या सरकारविरुद्ध व्यापाऱ्यानी युद्ध सुरू केले त्यामुळे किमती मोठ्या प्रमाणात वाढल्या. साखर व वासलेट मिळेनासे झाले. लोक बेचैन झाले. कायदा व सुव्यवस्था बिघडली. दिल्ली, बिहार व उत्तर प्रदेश या राज्यात सरकार नावापुरतेच होते. सर्व लोकांना अराजकाचे अस्थिरतेचे आणि सार्वत्रिक गोंधळाचे भय वाटू लागले. इंदिरा गाधीनी जनता पक्ष व लोकदल याना झोडपण्यास सुरुवात केली. त्यानी लोकदल व जनता पक्षात फरक केला नाही. लोकाना पण तो फरक करू दिला नाही. त्यांनी स्थिर सरकार देण्याचे आश्वासन दिले.

देशात हळूहळू इंदिरा गाधीच्या बाजूने वातावरण तयार होऊ होऊ लागले. ज्याने प्रामाणिकपणाने लोकात मिसळून समजावयाचा प्रयत्न केला असला तर त्यास हे सहज दिसून आले असते. महागाईत भरडली जाणारी जनता सार्वत्रिक उदासीनता दाखवत होती. १९७० साली मध्यमवर्ग जनता पक्षाच्या बाजूने असल्यामुळे उत्साह जाणवत होता. यावेळी इंग्रजी वर्तमानपत्राच्या पूर्वग्रहदूषित संसर्गापासून दूर असलेली जनता जनतापक्षास शिक्षा द्यावयास सिद्ध झाली होती. लोकाची 'उदासीनता' पाहून राजकीय पडित मतदान ५० टक्के सुद्धा होणार नाही असे सागत होते. पण जवळ जवळ ५५ टक्के लोकानी मतदान केले आणि इंदिरा गाधीना प्रचंड विजय मिळवून दिला.

## राष्ट्रीय मध्यम वर्ग

ज्या राष्ट्रीय मध्यम वर्गाने जनता पक्षाची स्थापना करून १९७७ साली त्यास पदारूढ केले होते, त्याच वर्गाने १९८० साली इंदिरा गाधीना पुन. सत्तेवर आणले आणि जनता पक्षाला पूर्णत. पराभूत केले. कारण प्रस्थापित राजकीय पद्धतीत भाडवलशाही विकास जनता-लोकदल घडवून आणू शकत नाहीत याची त्यास खात्री पटली. त्याच्या राजवटीत ससदीय राज्यपद्धतीस धोका निर्माण झाला. इंदिरा गांधीना परत आणून तिला परत कार्यक्षम करण्याचा हा त्याचा प्रयत्न आहे. त्याशिवाय केरळपासून जम्मूपर्यंत पक्षास जो विजय प्राप्त झाला त्याचा अर्थ लावता येत नाही. हळूहळू शक्तीशाली होत जाणारा हा वर्ग, राष्ट्रीय एकात्मता व सार्वभौमत्व याना धोका निर्माण होत आहे हे इराण व पाकिस्तान आणि अफगाणीस्तान या देशात घडणाऱ्या घटनावरून जाणत होता त्यामुळेच तो इंदिरा गाधीकडे वळला.

इंदिरा गाधीनी ५२५ जागापैकी ३५१ जागा जिंकून ⅔ बहुमत मिळविले. यावेळी त्याच्या पक्षाने फार चागले काम केले. निवडणुकीचे शास्त्र राबविण्यात काँग्रेसवाल्याची तुलना करता येत नाही. त्याच्या असाधारण कौशल्यापुढे आर्. एस्. एस्. निष्प्रभ ठरले. कारण समाजात डोळसपणे मिसळण्याची संघवाल्याना सवय नाही. त्याच्यामुळे जनता पक्षाची मुसलमान-हरिजन मते मात्र गेली. जगजीवनराम याना निकामी करण्यासाठी काँग्रेस (आय)ने वापरलेले तंत्र फार यशस्वी ठरले. त्यामुळे हरिजन प्रधान मंत्री आमच्या डोक्यावर बसणार म्हणून उच्चवर्णीयानी जनता पक्षास मते दिली नाहीत आणि जनता पक्षातील जनसंघवाले बाबूजीना फसवतील, त्यांना ते आपला खरा नेता मानीत नाहीत म्हणून

हरिजनांनी त्यास मते दिली नाहीत. जनता पक्षाचा सर्वच देशात दारूण असा पराभव झाला. लोकदलाला जागा जरी जास्त मिळाल्या तरी त्यास मते जनता पेक्षा फारच कमी मिळाली आहेत, यावरून लोकदलाच्या मर्यादा स्पष्ट व्हाव्या.

इंदिरा गांधीबाबत लोकाचे बरेच भ्रम आहेत. त्या भारतातील सर्व राजकारणी पुढाऱ्यामध्ये जास्त पुरोगामी असल्या तरी त्या मुळातच क्रांतिकारक नाहीत. त्या बंडखोर आहेत आणि अनेक नव्या वर्गाची मने त्या आपल्याकडे वळवू शकतात. भारतातील विविध जाती व वर्ग यामध्ये निर्माण झालेल्या राजकीय चैतन्याला त्याच कारणीभूत आहेत. त्यामुळेच कुमारमंगलम् याच्यासारख्या डाव्यांना त्यांना डावीकडे वळवून क्रांती करता येईल असे वाटले; पण कुमार मंगलम्, डी. पी. धर, रजनी पटेल, देवकांत बारूआ, नंदिनी सत्पथी याचे प्रयत्न संजय गाधीच्या साहाय्याने इंदिरा गाधीनी अयशस्वी केले. पण अजूनही काही डाव्याना वाटते की, त्या 'डाव्या' आहेत आणि त्यांच्या मदतीने 'क्राती' करता येईल; पण त्या आपल्या उद्दिष्टापासून फारशा चळलेल्या नाहीत हे त्यानी मेरी कॅरसला दिलेल्या मुलाखतीवरून स्पष्ट होते. 'माणूस'ला दिलेल्या मुलाखतीत पण त्यांनी आपण गाधीवादी मार्ग अवसरणार असल्याचे स्पष्ट केले आहे. हा 'गांधींवादी' मार्ग लोकशाही मार्गाने भाडवलशाहीचा विकास करणे हा होय. लोकाचा जास्तीत जास्त पाठिंबा घेऊन विकासाची फळे लोकात वितरित करणे हा होय. हा त्याच्या धोरणाचा गाभा आहे. डाव्या गटानी त्याच्याकडे आशाळभूतपणे पाहणे फारसे बरोबर नाही कारण या देशातील अविकसित भाडवलशाहीचे त्या अपत्य आहेत; पण ज्यास वर्ग व जाती यांचे स्वरूप समजत नाही, देशाचे अर्थकारण कळत नाही, क्रांतीचे राजकारण उमजत नाही तेच या भ्रमास भुलतात कुमार केतकर हे याचे चागले उदाहरण आहे.

इंदिरा गांधी पावणेतीन वर्षातच पुन: जुन्या दिमाखाने पदारूढ होत आहेत याचे महत्त्व अनन्यसाधारण असे आहे. त्याच्या पुनरागमनाचे महत्त्वाचे कारण त्याचा लोकावरचा अपार विश्वास हे आहे. त्यांनी पराभव झाला तरी, जनता पक्षाच्या राजवटीत त्रास झाला तरी धीर न सोडता लोकात काम केले. त्याचा पाठिंबा खालून उभा केला. जनता पक्षाच्या उजव्या अर्थकारणामुळे व गृहकलहामुळे लोक त्यांच्याकडे वळले. हा त्याचा वैयक्तिक विजय आहे. कारण पक्षाची संघटना नष्ट झालेली असता स्वत.च्या लोकप्रियतेच्या बलावर त्यानी ४३ टक्के लोकांचा पाठिंबा मिळविला. जनता पक्षावर सारखा दबाव ठेवला. त्यांच्यामध्ये फूट पाडली. भालोद, जनसघ व कम्युनिस्ट हे तीन गट एकत्र येत नाहीत हे पहिले कारण हे तीन गट एकत्र आले की आपल्याला धोका आहे हे त्याना माहीत होते.

इदिरा गाधी पुन: सत्तेवर आल्या आहेत त्याच्याकडून लोकाच्या खूप अपेक्षा आहेत. अपेक्षाभंगामुळे १९७१ पासून लोक या टोकापासून त्या टोकापर्यंत जात आहेत. त्याना इदिरा गाधी मदत करू शकतील का? देशाच्या अर्थकारणात त्या बदल करू शकतील का हा महत्त्वाचा प्रश्न आहे. निवडणूक जिंकण्यासाठी इंदिराजीनी मोठ्या प्रमाणावर प्रतिगामी लोकाना तिकिटे दिली. संजय गांधी कॉंग्रेसमधील बदनाम भाडवलदार, दिवाळखोर, राजेरजवाडे आणि भ्रष्ट व्यापारी याचे पुढारी आहेत. कॉंग्रेसला संघटना नाही. १९७१ साली होते तेवढेसुद्धा प्रगतीशील पुढारी पक्षाजवळ नाहीत. संजय गाधी सरकारला उजवीकडे ओढण्याचा नेहमीच प्रयत्न करणार. त्यात देशाची आर्थिक स्थिती अतिशय बिकट झालेली आहे. कारण भारतीय शेतीत दर पाच सहा वर्षांनी येणारे दुष्काळ चक्र १९८० पासून सुरू झाले आहे. आतरराष्ट्रीय बाजारात खनिज तेलाचे भाव खूप वाढत आहेत. सरकारी शासनयंत्रणा अतिशय खिळखिळी झाली आहे. कॉंग्रेसजवळ फक्त इंदिरा गांधी हेच एक उत्तर आहे.

स्पर्धात्मक राजकारणातील डावपेचांचा वापर करून इंदिरा गाधीनी जनता सरकार खेचले. याच मार्गाचा वापर आता जनता पक्ष केल्याशिवाय राहणार नाही. विशेषत. चरणसिंगाचे लोकदल किसानांच्या मागण्यासाठी जास्त लढाव् भूमिका घेईल अशी अपेक्षा आहे. त्याप्रमाणे जनसंघ सुद्धा सरकारवर हल्ला करण्याचे मार्ग शोधीत असेल. समाजवादी व साम्यवादी पक्ष संघटित क्षेत्रातील कामगाराचे अधिकार रक्षिण्यासाठी चळवळीचा मार्ग स्वीकारतील. संघटित क्षेत्रावर हल्ला केल्याशिवाय चलनवाढ थावत नाही, जमीनदाराकडून जमीन घेतल्याशिवाय जमीन वाटप करता येत नाही, श्रीमंत वर्गावर जास्त कर लादल्याशिवाय साधने मिळत नाहीत, अमेरिकन मल्टी नॅशनल कपन्यांच्या मदतीशिवाय देशाचा भाडवली विकास होत नाही, हे सर्व करायचे म्हणजे समाजातील मोठ्या वर्गास दुखवणे आहे. या अडचणीतून इंदिरा गाधी कसा मार्ग काढतील हे आता आपणास पाहावयाचे आहे. स्पर्धात्मक राजकारणातून निर्माण होणाऱ्या समस्या त्या राजकीय व आर्थिक उपायांनी सोडवतात की आणीबाणी सारख्या किंवा राष्ट्रपती शासनासारख्या उपायानी सोडवतात हे या प्रश्नाचे उत्तर काळच देईल; पण आणीबाणी पुन. आणावी असा म्हणणारा एक गट इंदिरा कॉंग्रेसमध्ये असेल हे मात्र निश्चित. □


मान्यता पावलेला चरित्रग्रंथ

**टॉलस्टॉय – एक माणूस**

दुसरी आवृत्ती । लेखिका : सुमती देवस्थळे । मूल्य : पंचावन्न रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ४११ ०३०

# पुस्तके

रेखा इनामदार

## समुद्र

### विकल व्याकुळ उदासीनतेच्या विरणाऱ्या(च!) लाटा ?

अशा केविलवाण्या लाटांची गाज तुम्हाला, तुमच्या अवघ्या कमावलेल्या किंवा कुठल्याशा क्षणी तुम्हाला वा इतरांना गवसलेल्या व्यक्तिमत्त्वाला हादरवून टाकणारी निश्चितच आहे. पण त्याहीपेक्षा महत्त्वाचं म्हणजे आपलं अजस्त्र एकाकीपण उघडंबोडकं करून ती तेथेच थांबत नाही, कारण त्या एकाकीपणाची अजस्त्रता आणि भीषणता, क्वचित आधार तिला पूर्वीच ओळखीचा झालेला आहे-तो नवीन नाही. तर या एकाकीपणाशी संवाद साधण्याची अपरिहार्यताच इथे निर्माण होते ही या कवितेची जमेची बाजू आहे. म्हणून हा समुद्र एकतर तुमच्या अंगावरच येतो किंवा तो काही अंतरावरूनच पहावा लागतो, कारण तेवढे अंतर शाबूत ठेवूनच त्याच्या भव्यतेचे सौंदर्यवर्णन करणे पचेल ! नाहीतर बुडण्याचा धोका पत्करल्या खेरीज त्याची कमी–जास्त 'खोली' लक्षात येणे कठीण आहे. ती 'खोली' ही सावध नजरेने टिपली पाहिजे नाहीतर या लाटा फार वाकबगार आहेत. खोलीचा आभासच त्या अनेकदा निर्माण करतात हेही नमूद केले पाहिजे. पण तळापर्यंत पोचण्याच्या दिशा शोधण्याचा हा एक जबरदस्त प्रयत्न आहे आणि समजूतदार एकाकीपण जिद्दीनं लाटांचे तडाखे सोसत पुढे चाललं आहे.

वसंत दत्तात्रय गुर्जरांचा हा 'समुद्र' (अगदी मुखपृष्ठावरील छायाचित्रापासून) अनेक गोष्टी आपल्यात सामावून घेणारा तर आहेच, पण त्यामुळं त्याचं बळ वाढत मात्र नाही. म्हणूनच या 'काहीबाही गोष्टीं'मुळे वाटणारं भलतं सलतं क्षणभंगुरच टिकतं ती व्याकुळता, विकलता यांचे केवळ तरंग उमटत राहतात.

'आज ही अवस्था आली.
जगणं सुद्धा निभावून नेणं मुश्किल झालं.
'चार चोपडया शिकून' (कविता क्र. पाच पृ. दहा) किंवा
'अस्तित्वाच्या झगडयात सर्व मोडून पडतं.
गुदमरून जायला होतं...
माझ्यात इतरांनी स्वतःला सोडून दिलं'

(पृ. अकरा) हे पोकळीतील गुदमरणं कुठे आत जाऊन सलत नाही. उदास शांत सूर्य–चंद्र–वारे– पाऊस आणि कधी मावळणारं तर कधी निळचा नवलाईतून मोकळं होणारं आकाश मनात टपोरं होऊन सांडतच नाही. कारण कवीलाच अजूनी ते स्वच्छ झालेलं नाही. (कमीत कमी पंधरा कवितातून गुर्जरांनी या आकाशाला आणि समुद्राला कवेत घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. पृ. अठ्ठावीस–कविता क्र. एकतीस ते पृष्ठ क्र. पंचेचाळीस) विचारांची वल्ही मारणे जमलेलं नाही–त्यामुळेच 'विश्वाच्या अंगणातला हा एकाकीपणा' सजवलेला किंबहुना काही ठिकाणी तर तकलादू वाटतो. मग तो आरपार जाऊच शकत नाही आणि दुःख भेदूही शकत नाही. कारण ते दुःखही फक्त मतलवी असतं. म्हणूनच फार दुबळ असतं. (पृ. चोवीस कविता क्र. २७, कविता क्र. १५, १६) त्याच्याशी संबंधित गोष्टींच्या गाठीही फार सैल असतात त्या सुटल्या तर फक्त ठसठसणारी हळवेवण येत. ते आग लावणारं दुःख नसतं,तो आकांतही तेवढया वेळ पुरताच असतो, घुटमळणारा नसतो. कारण ती वेदनाच शाश्वत आणि वैश्विक नसते. आणि उसकटलेल्या–विसकटलेल्या, दुखऱ्या आठवणी बिलगतात पण तेव्हा क्षण गाफील असतात.

धारदार व्यथा वहालही करून जातात. असे गाफील क्षण गुर्जरांच्या कवितेत अनेकदा तरारलेले दिसतात, पण अशा क्षणी आळवलेले कोमल स्वरही करुणच आहेत.

थोडया फार फरकानं
फारकती डोकं टेकून बसल्या
उठल्या चालल्या आठवणी
सावध अन् धाडसी खेळी करून गेल्या'

(पृ. सात) अशा असंख्य खेळी जोजवताना मग त्या एकटेपणाला दिलासा मिळाल्यासारखं वाटतं. अशा कातर वेळी हरवून जायला अंधाराची गरजही भासत नाही. देखणं रुपचित्र एकाच्या डोळचातून दुसऱ्याच्या नजरेत आपोआप उमटतं–पण तेव्हा त्याची जाणीवही होत नाही (पृ. आठ) पांढऱ्या शुभ्र डौलदार कबुतरांचे थवे उडता उडता अवचित हद्दपार पण होतात आणि 'हाताची लांब सडक बोटं' ही गुंतलेली नाहीत, कपाळावरचं कुंकू मुळातच पुसट आहे असं कळतेपण हळूहळू येतं. या सगळचाच आर्द्र ओल्या संदर्भाचं कूळ फार बेभरवशाचं आहे.

प्रत्येक ढगाच्या कोंदणात नैराश्य बसलं
मायाळू होऊन
प्रत्यही पोकळी जाणवत
अपुरेपणाचा शोध लावत
प्रत्येकानं प्रत्येकावर अभाग्य प्रेम केलं.
प्रत्यक्षात प्रत्येक जण
भरवसा नसल्यासारखे

मात्र बरोबर चालत राहिले, (पृ. बारा) आपण सर्वाच्यात नकळत आणि सर्वजण आपल्यात कळत नकळत घुसत, गुतत जाताना सगळघाच संदर्भाच्या रेषा पुसट होतात. तेव्हा मग निरभ्र आकाशाच्या तुकड्याला आत घेणाऱ्याचं घरही 'आपल' नसतं. आपलेपणाच जिथे घोर फसवणूक करतो तिथे काही स्थळं, वस्तू, व्यक्ती आणि त्यांना चिकटलेले संदर्भही निरर्थक ठरतात. पण त्यातली निरर्थकताही जेव्हा अर्थपूर्ण वाटायला लागते तेव्हा आपल्या अनादि अस्तित्वातच कळा खूप लागतात. कमळं उमलू लागतात. अशा काही उमलत्या कमळांसाठी तरी, त्यांच्या फुलण्याची वाट बघत 'एकमेकांनी एकमेकांसाठी निरागस होणं' पुनः पुन्हा जमवायचंच असतं. (ही सगळी धडपड गुर्जरानी (पृ. सोळा) एकाच छोटघा कवितेत फार समर्थपणे व्यक्त केलेली आहे. पृ. अठरा कविता क्र. अठराचा इथे आवर्जून उल्लेख करायला हवा. ती या संग्रहातील मला सर्वात आवडलेली कविता आहे.) आणि अशा निरागसतेला लावणाऱ्या झळाही मूकपणानं सोसायच्या असतात. त्या सोसताना झालेलंच हे लेखन आहे.

'काही वाटून न घ्यायचं कुणी ठरवलं
त्यामुळेच ना कित्येक कविता
तशाच राहून गेल्या लिहायच्या' (पृ. अठ्ठेचाळीस) म्हणूनच सोसण्याच्या भरात या निरागसतेनं अनेकदा गुर्जरांना चकवलंही आहे. याची साक्ष त्यांची शब्दकळा देते. अनेकदा एकाच भावावस्थेत बुडून गेल्यानं 'अस्तित्व', 'कबुतरं', ' ('फुलं' फार फार कोमेजलेली आहेत) 'आकाश', याच शब्दखेळीत किंवा त्यांच्याशी चिकटलेल्या समीकरणात कवीचं मन हरवून गेलंय्. ते त्याचं त्यालाही शोधणं मुष्कील होतंय्. म्हणून या लाटा विफल आणि चटकन विरून जाणाऱ्या आहेत अशा अर्थात 'आपण मारलेले, टाकलेले खडेही वेडेखुळे नाहीतच' असा माझा दावा मुळीच नाहीये. *

समुद्र (कविता संग्रह)
वसंत गुर्जर
प्रास प्रकाशन
पृष्ठे : ४८, मूल्य : सहा रुपये

# 'हाकारा'चे स्वागत

दिनांक पाच जानेवारी रोजी महाराष्ट्र मानव-विज्ञान परिषदेच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या 'हाकारा' या त्रैमासिकाच्या पहिल्या अंकाचा प्रकाशन समारंभ टिळक स्मारक मंदिरात पार पडला.

'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' ही संस्था केवळ आदिवासी लोकांचा व त्यांच्या संस्कृतीचा व समस्याचा अभ्यास करण्याच्या मर्यादित हेतूने स्थापन झालेली नसून आदिवासीचा विकास व्हावा व त्यांच्या समस्यांना तोंड फुटून त्या सोडवण्यासाठी पावले उचलावीत अशा व्यापक उद्देशाने स्थापन झाली आहे. दलितांना सघटित करणाऱ्या व त्याची आंदोलने घडवून आणणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना तसेच दलित चळवळीचा अभ्यास करणाऱ्या सर्वांना एक पक्षातीत व्यापक व्यासपीठ मिळावे हाही परिषदेचा प्रयत्न आहे. आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन व चर्चा व्हावी, कार्यकर्त्यांमध्ये सुसंवाद साधला जाऊन एकमेकांच्या समस्यांबद्दल मनमोकळी चर्चा व्हावी तसेच त्यांचे प्रशिक्षण व्हावे आणि मुख्य म्हणजे नागरी लोक व आदिवासी यांच्यामध्ये असणारी प्रचड दरी कमी होऊन आदिवासीच्या प्रश्नांकडे सुशिक्षीत समाजाचे लक्ष वेधले जावे अशा अनेक उद्देशानी परिषदेतर्फे 'हाकारा' हे त्रैमासिक सुरू करण्यात आलेले आहे.

आदिवासी पहिल्यापासूनच नागर समाजापासून पूर्णपणे अलग पडलेले लोक आहेत. पुढारलेल्या जगातल्या कितीतरी गोष्टी अजूनही त्यांच्यापर्यंत पोहोचलेल्याच नाहीत. त्यामुळे त्याचे शोषण करणे बाहेरून तेथे आलेल्या लोकाना सोपे गेलेले आहे. आदिवासी बाह्य, तथाकथित सुधारलेल्या समाजापासून वेगळे पडल्यामुळे, तसेच एकमेकांपासूनही वेगळे पडल्यामुळे संघटित होऊ शकलेले नाहीत. आज निरनिराळ्या आदिवासी भागात वेगवेगळ्या विचाराचे, वेगवेगळ्या कल्पना प्रणालीना तसेच राजकीय पक्षांना बांधील असणारे आदिवासी व बिगर आदिवासी गट संघर्षात्मक व रचनात्मक काम करत आहेत. परंतु हे सगळे सुटेसुटे, एकमेकापासून लांब असे एकटे पडलेले आहेत. त्यांना एकमेकांच्या अनुभवांची देवाणघेवाण होणे व कामात सुसूत्रता येऊन समान प्रश्नावर एकत्र येण्यामुळे संघटनाची प्रक्रिया सुरू होणे आवश्यक आहे 'हाकारा' हे त्रैमासिक या कामातली एक महत्त्वाची पायरी ठरू शकेल.

'हाकारा'च्या पहिल्या अंकात (जानेवारी–मार्च, १९८०) श्री. अनिल गोरे यांचा 'भारतातील आदिवासी' हा माहितीपूर्ण लेख तसेच 'जबरन जोत आदोलना'वर एक खास विभाग आहे. या प्रदीर्घ विभागात महाराष्ट्र व मध्य प्रदेश शासनाच्या अतिक्रमित जमिनीसबंधीचे आदेश व अतिक्रमणे रीतसर करण्यासंबंधीचा नवा आदेश छापून त्याबरोबरच या आदेशांमधल्या त्रुटी दाखवून देणारा श्री. शरद कुलकर्णी याचा लेख व या सबंधात विधानसभेत झालेल्या चर्चेचा वृत्तातही देण्यात आलेला आहे. याशिवाय डॉ. वसुधा धगमवार, श्री. रावसाहेब कसबे, श्री. गोविंदराव शिंदे, श्री. अशोक ताकमोक आदीचे लेख तसेच पुस्तक परीक्षण, संस्था परिचय इत्यादी सदरेही आहेत

मुखपृष्ठ व आतील सजावटीचा मला मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो. श्री. शशि चित्रे यांनी सर्व ठिकाणी वारली शैलीतली अतिशय सुदर चित्राचा कल्पकपणे वापर केलेला आहे. यामुळे हा अंक साधा पण अत्यंत आकर्षक झालेला आहे.

'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदे'च्या या नव्या उपक्रमाचे स्वागत करून 'हाकारा'ला मी सुयश चिंतितो.

–शशांक ओक

'हाकारा'
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद,
मानवशास्त्र विभाग,
पुणे विद्यापीठ, पुणे–४११००७.
वार्षिक वर्गणी, रु. १२

## फिनिक्स निवड

# SUCCESS !

By Michael Korda
(Coronet Books,
Pages 297, £ 1–25)

अलीकडे पौंड व डॉलर यांचा दर भारतीय रुपयाच्या संदर्भात पुष्कळ वेळा वर-खाली होत असतो. त्यामुळे अमेरिकन व ब्रिटिश पुस्तकांचा कन्व्हर्शन रेट म्हणजेच पुस्तकाची नेमकी किंमत रुपयात देणं अवघड होऊन बसलं आहे. वर्षानुवर्षे जे लोक पुस्तक विक्रीचा धंदा करीत आहेत, त्यानाही नेहमीच ताजे कन्व्हर्शन टेबल जवळ ठेवावे लागते. बरेच दुकानदार तर प्रत्येक पुस्तकाच्या कोपऱ्यावर पेन्सिलीने रुपयात किंमत लिहून ठेवतात. हे असे केल्याने पुस्तक थोडेसे वाईट जरूर होते. परंतु प्रत्येक वेळेला दुकानदारास, 'अहो, याची काय किंमत ?' असे विचारावे लागत नाही. पुस्तकाच्या दुकानात browsing करणे ही इतकी गोड गोष्ट असते की, तिथे जेवढे कमी बोलले जाते तेवढीच त्या दुकानाची scholestic air जास्त !

हे कोर्डा (लेखक) अजिबात कोरडे नसून अत्यंत श्रीमंत आहेत असे मी याच लेखकाच्या Power ! या पुस्तकाचा परिचय करून देताना माणूसच्या ३० जुलै १९७७ च्या अंकात सागितले आहे. यशस्वी कसे व्हावे हे जेव्हा कोर्डा सांगतात तेव्हा ते नव्या बाटलीत जुन्या दारूसारखे नसते. यशस्वी कसे व्हावे या विषयावर पूर्वी डेल कार्नेजी, नॉर्मन व्हीन्सेंट पील, नेपोलिन हील वगैरे असंख्य लेखकानी पुस्तके लिहिली आहेत. परंतु हे जुने लेखक यशस्वी होताना नीतीमूल्ये जपून कसे यशस्वी व्हावे हे शिकवत होते. पण कोर्डा हे आधुनिक पिढीला नीतीमूल्याची फारशी चाड न ठेवता कसे यशस्वी व्हावे याचे मार्गदर्शन करतात आणि म्हणूनच ते तरुण पिढीचे लोकप्रिय लेखक झाले आहेत.

मायकेल कोर्डा हे न्यूयॉर्कमधील सायमन ॲन्ड स्कश्टर या प्रख्यात प्रकाशन संस्थेचे मुख्य संपादक आहेत. त्यानी या पुस्तकाच्या सुरुवातीसच सॉमरसेट मॉमचे एक वाक्य उद्धृत केले आहे.

The common idea that success spoils people by making them vain, egotistic, and self complacent is erroneous; on the contrary it makes them for the most part, humble, tolerant and kind. Failure makes people bitter and cruel. यानंतर लगेच कोर्डानी स्वत ची ब्रीदवाक्ये दिली आहेत, ती अशी. लोभी होण्यात, महत्त्वाकांक्षा बाळगण्यात, टॉपला जाण्यात, श्रीमंत होण्यात काही वावगे नाही वगैरे वगैरे.

कोर्डा यशाकडे सर्व दृष्टिकोनातून बघतात. यशाविषयी भय, सेक्स व यश, स्त्रिया व यश, यशाची गोड फळं चाखण्याची लज्जत, यश मिळवण्याची किमया, वगैरे अनेक गोष्टीचा उहापोह या पुस्तकात आहे. तो इतका की, क्षणभर आपल्याला वाटते की, अपयशाचे अनायक युजीन ओ नील, काफ्का, डोस्टोव्हेस्की, सॅम्युएल बेकेट, वर्जीनीया वुल्फ, निजिन्स्की, नित्शे, सिल्विया प्लाथ वगैरे अनेक बुद्धिवंतांनी अपयशामागे धाव घेऊन काय मिळवले हा आपल्याला प्रश्न पडतो.

जेव्हा कोर्डा म्हणतात की, यश हे एक प्रकारचे पॉवरफुल वाजीकरण वा बंदेज आहे तेव्हा आपल्याला बुवा JFK ची आठवण येते. JFK मधला F हा फोर्निकेशनसाठी आहे हे मी आधी लिहिलेच होते ! एकदा एक wag असंही म्हणाला होता की, केनेडीच्या मृत्यूनंतर इतक्या स्त्रियानी त्यांच्याशी शय्यासोबत केल्याचा दावा केला की, ते जर खरे असते तर JFK ला चहाचा पेलाही उचलणे मुश्कील होऊन बसले असते ! यशामुळे सेक्स व सेक्समुळे आणखीन यश असे हे सत्कृत चक्रच होऊन बसते असे कोर्डाचे म्हणणे आहे ! अर्थात हे सर्व पर्रमिसीव्ह सोसायटीमध्ये. याउलट मनोविश्लेषण करणाऱ्यांना असेही आढळले आहे की, यशाचे टोक गाठणाऱ्यांपैकी काहीना एकदम नपुसकत्व जडते. यश म्हणजे बदलणे. सर्व क्षेत्रात जे. पी. च्या टोटल रेव्होल्यूशनसारखा टोटल चेंज ! कोर्डा म्हणतात की, एका क्षेत्रात बदल व दुसऱ्या क्षेत्रात static राहणे म्हणजे दुःखाला आमंत्रण देण्यासारखे होय.

यशामुळे स्वाभिमान व आत्मविश्वास वाढतो हे कोर्डाचे म्हणणे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. परंतु बेसुमार व अमाप यशामुळे प्रसंगी उद्दामपणा वाढतो असे कुठेच कोर्डा लिहीत नाहीत. अंतर्मुख होणे वगैरे या पिढीसाठी नाही ! नया जमाना– नवं तत्त्वज्ञान ! नव्या दमाचा शूर शिपाई ..! यशाच्या कल्पनेने कोर्डा इतके झपाटलेले आहेत की यश म्हणजे एक प्रकारची मुक्तीच असे त्यांना वाटते. आपण कोणत्या युगात प्रवेश करीत आहोत याची टेस्ट आपणास या तत्त्वज्ञानापासून मिळते.

स्त्रियांनी यशस्वी कसे व्हावे याचे कोर्डानी वेगळे विवेचन केले आहे त्यांच्या पुस्तकातील हा भाग वाचला की हसू येते. पुरुषाशी काम घेताना ( म्हणजे साधे काम ! पैसे वगैरे मागण्यासाठी) सरळ त्याच्या डोळ्यात बघावे व त्याला outstare करावे. यानी जर पुरुष थोडा नर्व्हस झाला नाही तर डोळ्यात पाणी आणावे ! पण मला वाटते स्त्रियांना काहीही शिकवण्याचा प्रयत्न कुणीही करू नये. कारण सीग्मंड फ्राईडने ३० वर्षे स्त्रियांचा अभ्यास केला व शेवटी टाहो फोडला, 'स्त्रीला काय हवे असते ? तिच्या मनात काय असते ?' (What does a woman want ? ) अर्थात स्त्रियांच्या निकडीविषयी पुरुष कसे रिॲक्ट होतात हे कोर्डानी स्वत.वरून सांगितले असेल. चवघवीत यश काहीना एकदम मिळते तर इतर काहीना कष्ट करून मिळते. परंतु कोर्डा असे म्हणतात की, काही यशस्वी माणसे अपयश पचवून पचवून वर आले आहेत. प्रत्येक अपयश म्हणजे जणू यशाआड असलेल्या विघ्नाकडे फेकले जाणारे आयुधच अशा चिकाटीने काही लोक कार्य करीत राहतात. मला अशा लोकांचच अप्रुप वाटतं. नियतीनं बहाल केलेलं यश व पैसा सर्वांच्या वाट्याला येत नाही.

हे पुस्तक लिहितांना कोर्डानी न्यूयार्क टाईम्स, फॉर्च्युन, सायकॉलॉजी टुडे, सक्सेस, ग्लॅमर, ॲटलांटिक मंथली, हार्पर, बिझनेस विक, टाईम, न्यूजविक, एस्क्वायर वगैरे जगप्रसिद्ध मासिकातून माहिती घेतली आहे.

या कारणामुळे पुस्तक बरेच वाचनीय झाले आहे.

प्रत्येक प्रकरणाच्या सुरुवातीला प्रख्यात लेखकाची बोधवचने दिली आहेत. ग्रॅहॅम ग्रीनने त्याच्या आत्मचरित्रात ( A sort of life ) लिहिले आहे, 'Failure too is a form of death' अपयश म्हणजे जिवंतपणी आलेला मृत्यू हे निर्विवाद आहे. साधूसंत असे म्हणतात की, यश वा अपयश आले, सुख वा दुःख आले तरी माणसाने तटस्थ राहावे. पण बिहेवियरल सायकॉलॉजिस्ट बी. एफ. स्किनरची ऑपरन्ट सायकॉलॉजी ज्यांना माहीत आहे त्यांना हे पटायचे नाही. त्यांनी उंदरावर प्रयोग करून असे सिद्ध केले की वारंवार वैफल्य वा अपयश आल्याने तो पिचतो. त्या उलट ज्या उंदराना सतत तीच ती प्रक्रिया केल्याबद्दल स्कीनरनी बक्षीस दिले ते उंदीर जास्त हुषार व शक्कल लढविणारे बनले. उंदरांपासून माणसाचा अभ्यास. Extrapolation...

यशाचे भय असणे हा एक विरोधाभास आहे की काय असा आपल्याला प्रश्न पडणे साहजिक आहे. पण या विषयावर कोर्डाने या पुस्तकात डोळस चर्चा केली आहे. अपराध. गील्ट. हा एक मानवी मनाचा भला मोठा कॅनव्हास आहे. आणि या कॅनव्हासवरच डोस्टोव्हस्कीसारख्या प्रचंड प्रज्ञावंताने या विषयावर अनेक चित्रे रेखाटली आहेत. या चित्राचे बारकावे पाहिले की मन गागरून जातं. स्तंभित होऊन जातं. सुन्न व थक्क होऊन जातं. त्यामुळेच डोस्टोव्हेस्कीला Master of Morbid Psychology हा किताब बहाल केला गेला आहे.

अपराधामुळे, सुप्त मनाच्या अस्फुट संकेतामुळे, आपण अशा रितीने वागतो की, आपल्याला शिक्षा मिळावी. या शिक्षेचा एक कठोर प्रकार म्हणजेच अपयश आपल्या पदरात पाडून घेणे. अर्थात् बऱ्याच लोकांना या मानवी मनाच्या देवाण घेवाणीविषयी माहिती नसते. आणि मग कधी इतरावर खापर फोड तर कधी नशिबावर खापर फोड असे प्रकार होतात. अर्थात् कुणी असाही मुद्दा काढेल की, असे अपराधी मन मिळणे हाच एक नशिबाचा दैवदुर्विलास म्हणावा लागेल. आपणही थोडेसे extrapolation करू या. डेथ विश ही प्रत्येकाच्या सुप्त मनात असते. ग्रॅहॅम ग्रीनच्या म्हणण्याप्रमाणे अपयश हा एक प्रकारचा मृत्यूच आहे. म्हणजे फेल्युअर हा सुद्धा एक डेथ विशचाच प्रकार आहे. वरील प्रकरणात तर कोर्डा चक्क इटॅलिक्समध्ये (पान २३९) असं म्हणतात. The instinct toward self-defeat is strong and insidious.

कोर्डा असेही म्हणतात यशाविषयी भय असणे हे काही अवास्तव नाही. घवघवीत यश मिळविण्यासाठी रिस्क घ्यावी लागते नवीन जबाबदाऱ्या, स्वतःचे सर्व काही पणास लावणे वगैरे. काही लोकांना वाटते जेवढे उंच चढावे तेवढ्या उंचीवरून कोसळलो की, जखमा भारी होतात म्हणून न चढणेच बरे. या सर्वांचाही कोर्डांनी विचार केला आहे.

श्री. कोर्डा याचे Charmed Lives नांवाचे यापुढील पुस्तक लवकरच बाजारात येणार आहे. तेही मी विकत घेणार आहे.

श्री. कोर्डा हे कोरडे तर नाहीच. पण ते कोरडं लिहीत सुद्धा नाहीत.

— जे. एन्. पोंडा

## NEW TITLES RECEIVED

| | Rs |
|---|---|
| 1. Persons, Passions And Politics – Mohmmad Yunus – (Daring exposure of political intrigues before and after independence) | 50/- |
| 2. A Pictorial History of Indian Cinema – Firoze Rangoonwalla. | 72/- |
| 3. The Sea, The Sea – (Booker Prize winner novel) – Iris Murdoch | 27-60/- |
| 4 Lhasa, The Open City – (A Journey to Tibet) – Han Suyin. | £ 1–25 |
| 5. Zen And The Art of Motorcycle Maintenance – (One of the best books of the decade on Philosophy) – Robert M. Pirsig. | £ 1–25 |
| 6. Success ! – (Self improvement) – Michael Korda. | 23/- |
| 7. Holocaust – (History of the Jew Massacre) – Gerald Green. | 23/- |

✦ A 'Phoenix' member is better informed !

दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पेठ पुणे ४११०३०

# वैचारिक क्षेत्रातील बिनीचे ' सरदार ' :

पृष्ठ ८ वरून

दारिद्र्याने, अज्ञानाने पिचत गेलेल्या मनाना वाचा फोडून त्यांच्या भावना बोलून दाखविण्याची कास सरदाराना धरावीशी वाटली, आणि हे कार्य सभा–संमेलनाच्या रूपाने, चर्चा–परिसंवादाच्या रूपाने आणि कष्टप्रद अशा लेखन स्वरूपाच्या माध्यमातून ते सातत्याने करीत आले आहेत.

सरदाराच्या मनाने आपल्या तारुण्य सुलभ उर्मीतून सुरुवातीला अनेक वाटा चोखाळण्याचा प्रयत्न केला असला तरी, त्याना आपली नेमकी वाट एकदा सापडल्यानंतरच त्यांची त्यानंतरची ' वाटचाल ' त्या मार्गानं धीम्या गतीने परंतु निश्चित दृष्टिकोण डोळ्यासमोर ठेवून चालली आहे, असे दिसून येते. त्यांचे पहिलेवहिले ग्रंथ लेखन संशोधनात्मक स्वरूपाचे आहे इंग्रजाच्या आगमनापासून विष्णुशास्त्री चिपळूणकराच्या आगमनापर्यंतचा अव्वल इंग्रजीच्या काळातील मराठी ग्रंथव्यवहाराचा संशोधनपर आढावा त्यानी अर्वाचीन मराठी गद्याची पूर्वपीठिका (१९३५) या ग्रंथात घेतला आहे. त्यातही त्यांचे लक्ष संशोधनापेक्षा त्या काळात जवळ जवळ लुप्त झालेल्या आणि नव्याने नव्या स्वरूपात नुकतंच उदयाला येऊ पाहणाऱ्या मराठी गद्यशैलीच्या शोधातच अधिक रमले आहे. ह्या गद्यशैलीचा प्रकर्ष ज्या चिपळूणकराच्या निबंधमालेतून घडला, तिथपर्यंत येऊनही, निबंधमालेकडे दुर्लक्ष करण्याची प्रेरणा ही सहजासहजी घडली आहे, असे वाटत नाही. चिपळूणकरासारख्या परंपराभिमानी पत्रकाराने आपली लेखणी प्रबोधनाच्या पाऊलखुणा पुसण्यासाठी परजली गेली, हे शल्य त्यामागे प्रभावी असावं, असे मानण्यास भरपूर जागा आहे. किंबहुना १९३७ च्या सुमाराच्या सभोवतालच्या निष्क्रीय परिस्थितीने त्यांच्या मनाला घेरले असताना, १९ व्या शतकाच्या वाङ्मयाच्या अभ्यासाकडे त्या शतकातील काही उपेक्षित झालेल्या कर्त्या पुरुषाच्या कार्याचा वेध घेण्याची त्यांना प्रेरणा व्हावी, आणि त्यातून त्यांच्या लेखनाला संजीवनी प्राप्त व्हावी, ही घटना खूपच बोलकी आहे. भाऊ महाजन, लोकहितवादी, विष्णुबुवा ब्रह्मचारी, विष्णुशास्त्री पंडित आणि महात्मा फुले यांच्या कार्याचे विवेचन करताना सरदार त्यांच्या प्रगमनशील विचाराने आणि कृतीने प्रभावित झालेले दिसतात. स्फुट स्वरूपात, लेखरूपाने लिहिलेल्या आणि नंतर पुस्तकरूपाने प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या ' महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी ' (१९४२) या ग्रंथातच पहिल्यांदा सरदाराच्या मनाचा आणि त्यांच्या प्रभावी लेखनशैलीचा शोध लागला. स्त्रिया, आदिवासी आणि अस्पृश्य अशा शतकानुशतके उपेक्षित जीवन वाट्याला आलेल्या समाजाच्या घटकांच्या उद्धाराचे कार्य, हेच महत्त्वाचे कार्य होय आणि त्यांच्या मुक्तीचा मार्ग लोकशिक्षणाखेरीज अन्य असूच शकत नाही, ही प्रेरणा महाराष्ट्रात ज्या महाभागाना झाली आणि त्या प्रेरणेपोटी ज्यानी काय केले, त्यांच्या विचाराने आणि कार्याने प्रभावित झालेल्या सरदारानी अत्यंत संयमाने आणि लोकजागृतीच्या तळमळीने त्यांच्या कार्याचे मर्म या ग्रंथातून विषद करून संबंध एकोणिसावे शतक या छोट्या ग्रंथातून जणू काही साक्षात उभे केले आहे. सामाजिक परिवर्तनासाठी आणि प्रगतीसाठी ज्ञानाने येणारा ' डोळसपणा ' ही पहिली महत्त्वाची गोष्ट आणि त्या डोळसपणापोटी लोकाबद्दलचा खराखुरा मनापासूनचा आदरभाव मनात जागा झाला की साऱ्या मानवजातीचे श्रेयस आणि प्रेयस कोणते, याबद्दलची एक नवी जाणीव निर्माण होते. ही जाणीव निर्माण करायाचे कार्य काही फार थोड्या महाभागानी या महाराष्ट्रात केले. त्यातूनच नव्या युगाच्या नव्या प्रेरणा निर्माण झाल्या आणि नवा वैचारिक संघर्ष निर्माण झाला. या वैचारिक संघर्षातूनच नवे राष्ट्र जन्माला येईल, अशी यामागची पक्की धारणा आहे आणि ती इतकी महत्त्वाची आहे की, या विचारापुढे बाकीच्या सर्व हालचाली दुय्यम दर्जाच्या ठरल्या आहेत.

### ' भारतीय माणसा 'च्या अस्मितेसाठी

ज्ञानप्रधान अशा डोळसपणाने निर्माण झालेल्या वैचारिक संघर्षाखेरीज कोणत्याही राष्ट्राला गती नाही, हे एकदा लक्षात आल्यानंतर प्रा. सरदारानी गेल्या दीड-दोन शतकांतील राजकीय व सामाजिक स्थित्यंतरामागील विचारधारेचा सातत्याने अभ्यास केला. ज्या मार्क्सप्रणित विचारधारेने साऱ्या जगाला हलविले. ती विचारधारा अत्यंत महत्त्वाची असल्याने तिच्या माध्यमातून समग्र संस्कृतीचा वेध घेतला पाहिजे, हे त्यानी नेमके ओळखले. ही विचारधारा मुळातून समजावून घेत असताना तिच्याबरोबरच महत्त्व पावलेल्या राष्ट्रवादी, सर्वोदयी आणि मानव्यनिष्ठ आमूलाग्र सुधारणावादी ( Radical Humanist ), आणि गांधीवादी व आंबेडकरी विचारसरणीचाही त्यानी मागोवा घेतला. त्यासाठी स्वत.च्या घरी अभ्यासमंडळ स्थापिले आणि समविचारी तरुणाबरोबर या अभ्यासमंडळातून मुक्तपणे आणि सोत्सुक मनाने चर्चासत्रे घडवून आणली. कोणत्याही एका विचारप्रणालीच्या आहारी न जाता आणि कोणत्याही पक्षीय दृष्टीचा झापडे न लावता आपल्या देशाच्या सांस्कृतिक परंपराच्या संदर्भात समन्वयवादी दृष्टीने आणि निराग्रही दृष्टीने या भूमिकांचा समतोल ( equilibrium ) कसा साधता येईल, हे त्यानी पाहिले. त्यामुळे त्यांच्या विचाराना अनेक परिमाणाचे पदर जसे लाभले, तसेच कोणत्याही प्रकारच्या हट्टाग्रहापासून कटाक्षाने दूर राहण्यात त्याना यश आले. या साऱ्या विचारसरणीमागचा केंद्रबिंदू ' भारतीय माणूस ' हा आहे. त्याच्या सुखदु:खाशी समरस होता येईल, त्याच्या आशाआकांक्षा बदलता येतील आणि झपाट्याने आणि वेगाने बदलणाऱ्या जगाबरोबर केवळ धावण्याचेच नव्हे तर स्वत.ची अस्मिता दाखविण्याचे सामर्थ्य त्याला येईल, अशा प्रकारचा समाज निर्माण करण्याचे ध्येय त्यांच्या मनाने बाळगले आहे, आणि त्याच्या सिद्धीसाठी विचारमंथन आणि विचारप्रवर्तन अहोरात्र करीत राहण्याचे व्रत त्यानी घेतले आहे.

विचारवंत म्हटला की, त्याचे एक ठराविक चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. त्याची एकारलेली वृत्ती, त्याचा प्रसंगी दिसून येणारा विक्षिप्तपणा आणि आपल्या अवतीभोवती

जिवंत माणसे वावरत आहेत, इकडे झालेले दुर्लक्ष इ० गोष्टी विद्वान व विचारवंत याच्या बाबतीत सतत जाणवतात. सरदार त्याला अपवाद आहेत. ते कुटुंबवत्सल गृहस्थ आहेत आणि आपले कुटुंब, आणि आपल्या अवतीभोवतीचे जग याच्यात ते पूर्णपणे रमलेले आहेत असे दिसते चारित्र्य संपन्न, सत्प्रवृत्तीचे आणि अत्यंत प्रेमळ आणि आपल्या मताच्या विरुद्ध मताचाही आदर करण्याची निर्मळ वृत्ती सरदाराच्या मध्ये ओतप्रोत भरलेली आहे. सरदारांच्या या अनेकविध गुणसंपदेमुळे त्यांनी निर्माण केलेली विचारप्रधान वाङ्मय संपदा मौलिक स्वरूपाची ठरली आहे. विशेषतः मार्क्सवादी विचार-सरणीचा त्यांच्या मनावर पगडा असता ते संतवाङ्मयाकडे ज्यावेळी वळले, त्यावेळी मार्क्सवादाने संतवाङमयाची कुचाळी करणाऱ्या वाङ्मयापेक्षा अगदी वेगळा दृष्टिकोण त्याच्या 'संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुती' या ग्रंथातून प्रगट झाला. संतांनी केलेले सामा-जिक प्रबोधन दुर्लक्षिण्यासारखे नाही, हे त्यानी लक्षात आणून दिले आणि त्याच्या साऱ्या मर्यादांसह हे प्रबोधन आजच्या नव्या जगाच्या निर्मितीला कसे उपकारक ठरू शकेल, हे दाखवून दिले.

## निष्कलंक आचारधर्माची झळाळी

आपल्या आयुष्यकाळात संपादिलेली 'एकनाथदर्शन', 'तुकाराम दर्शन', 'रामदासदर्शन' ह्या संतवाङमयसंकलनपर पुस्तकाच्या प्रस्तावनातून आणि त्यांनी दिलेल्या कौशिक व्याख्यानमालेतून सिद्ध झालेल्या 'ज्ञानेश्वरांची जीवननिष्ठा' या पुस्तकाच्या पानापानातून त्याच्या संतविषयक कार्याचे प्रगत व प्रगल्भ दर्शन घडून येते. या संतांच्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणे प्रत्येक संताच्या कार्याचे व विचाराचे सामर्थ्य त्यांच्या वाङ्मयात कसे घडून येते हे सरदारानी मोठ्या मार्मिकपणे दाखवून दिले आहे. सामाजिक बहिष्कारामुळे लहान-पणीच दीनदलिताच्या व्यथाचे आणि पाथेस घेऊन आपल्या धर्म-ग्रंथाचे आलोडन करणारे ज्ञानेश्वर मूलतःच साक्षात्कारवादी असल्याने त्यानी निर्माण केलेल्या वाङ्मयातून समाजाला भेदून जाणारी व्यापक जीवननिष्ठा कशी प्रकटली आहे हे ते सागतात. वैदिक सस्कृतीतील सत्वांश कायम ठेवून नव्या प्रेरणाना निःसंकोचपणे सामोरे जाण्याची ज्ञानेश्वरादी संताची प्रक्रिया नव्या युगात समा-जाच्या सर्व थरांना अभिमंत्रीत करू शकेल, हे सरदाराना जाणवते आहे. महाराष्ट्रातीलच नव्हे तर, साऱ्या भारतातील मार्क्सवाद्यामध्ये सरदाराचे हे वेगळेपण लक्षात घेण्यासारखे आहे. ज्ञानेश्वरासारख्या सिद्ध पुरुषाचे सारेच काही वेगळे आणि असामान्याच्या कोटीतले होते. इतर संताचे तसे नव्हते. मंत्रमुद्रा, ध्यानधारणा यासारखी सिद्धपुरुषांची बाह्य लक्षणे आपल्याजवळ नसताना आणि संन्यास-मार्गाची कास न धरता एकनाथासारख्या संतानी आपल्या कळ-कळीच्या कीर्तन निरूपणाने आणि अभिजात सौहार्दाने जो लोकसंग्रह साधला त्याचेही महत्त्व त्यांना अपार वाटते. नाथाच्या लोकसंग्रहाचे व प्रबोधशक्तीचे मूळ बीज त्याच्या विधायक सृष्टीत व समन्वयशील वृत्तीत कसे आहे, हे दाखवितात सरदारानी नाथाच्या उपदेशातील स्वधर्मचरणाच्या व नैतिक मूल्यभावनेच्या आग्रहाचा मोठा गौरव केला आहे. आदर्श अपार्थिव अशा स्फूर्तिप्रद ध्येयसृष्टीचा पाया घालणाऱ्या ज्ञानेश्वरांच्या उज्ज्वल जीवन दर्शनातून आणि निष्कलंक आचारधर्मातून महाराष्ट्राच्या लौकिक जीवनात जी एक झळाळी प्राप्त झाली, ती आधुनिक विचारवंतानाही अमान्य करता येत नाही, हे सरदारांनी दाखवून दिले. लौकिक जीवन हे परमार्थाचे साधन बनले पाहिजे ही संतांची धारणा होती. ती बरोबर घेऊन आजचे लौकिक जीवन समृद्ध करण्यासाठी या लौकिक जीवनाशी संदर्भित व संबंधित असा नवा विचार प्रसृत करण्याची आवश्यकता निर्माण होते. संतांच्या काव्य दृष्टीची घडण जशी त्यांच्या अध्यात्मनिष्ठेतून घडली, तशी आधुनिक वाङ्मयाची घडण समाजधारणेतूनच झाली पाहिजे, हे लक्षात घेऊन सरदार समाजप्रणित आणि समाजप्रेरित वाङ्मयामध्ये अवगाहन करीत असतात. आजच्या दलित वाङ्मया-मध्ये त्याना पीडित शोषित मनांचा खराखुरा हुंकार दिसतो आणि दलितांच्या विद्रोहाचे त्याच्या वाङमयातून घडणारे दर्शन हे वाङ्मयाच्या जिवंतपणाचे दर्शन आहे, हे लक्षात घेऊन सरदार या वाङ्मयाचे मनापासून स्वागत करताना दिसतात. अर्थातच महात्मा फुले, सत्यशोधक समाज आणि दलिताचे वाङ्मय यांच्याबद्दल विचार व्यक्त करताना सरदारानी आपल्या मनाचा समतोल कधी ढळू दिला नाही आणि आपल्या निस्पृहतेला तिलांजलीही दिली नाही. सत्यशोधक समाजाच्या, बहुजन समाजाच्या मेळाव्यातून बोलताना त्यानी त्यांचा अनुनय करण्याची दृष्टी न ठेवता, त्याच्या गुणदर्शना-बरोबरच स्वच्छ शब्दांत त्यांच्या दोषाचीही मीमांसा करून या समाजाला आंधळ्या निष्ठेपासून सावध करण्याचे कार्य केले आहे. खऱ्याखुऱ्या विचारवंताचा निस्पृहपणा हाच वैचारिक संघर्षाला प्रवृत्त करतो आणि अशा विचारवंताला वैचारिक संघर्षाची भीती नसली तरच त्याच्यामध्ये अनाग्रही निस्पृहता व निर्भयता येते, हे सरदारांनी दाखवून दिले आहे. निस्पृहतेची नशा चढली तर वस्तु-निष्ठ दृष्टीचे अवधान सुटते आणि आपल्या मताच्या आग्रहामुळे कोणावर अन्याय होण्याची किंवा इतरांच्या भूमिकांचा विपर्यास करण्याची वृत्ती निर्माण होते. सरदारांनी कटाक्षाने असे होऊ नये, याची साधना साधली आहे. मुळातच ते भावनाशील आहेत आणि ते ज्या काळात विद्यार्थी म्हणून वावरले त्या काळातील स्वा सावरकर, शिवरामपंत पराजपे आणि अच्युत बळवंत कोल्हटकरासारख्या मात-बर वक्त्यांच्या वक्तृत्वाचा त्याच्या शैलीवर थोडाबहुत परिणाम होणे अपरिहार्य असले तरी वक्तृत्वाच्या फुलोरा फुलविणे किंवा आपल्या भावनाचे प्रदर्शन करणे अशा सारख्या वक्तृत्वगुणांची जोपासना सरदाराना करावीशी वाटली नाही. विचारवताला आवश्यक अशा संथ, सावध परंतु उलट जिव्हाळयाने तत्त्वांशाचे आकलन करण्याच्या प्रयत्नामुळे त्याच्या वक्तृत्वाला एक वेगळे परिमाण प्राप्त झाले आहे. त्याच्या वक्तृत्वाची परिणामकारकता ही त्यांच्या स्वतंत्र विचार-मंथनातून, त्यांच्या जिव्हाळ्याच्या आकलनातून आणि संतवाङ्म-याच्या अखंड परिशीलनातून निर्माण झाली आहे, असे मला वाटते. कोणत्याही विषयापाठीमागच्या सत्वांशाचा ते शोध घेतात आणि त्याच्या आधारे सिद्धान्त प्रतिपादनाचा त्यांचा प्रयत्न असतो. त्यामुळे त्याचे एखादे लहानसे वाटावे असे भाषणही त्याच्या स्वतंत्र प्रतिपादनामुळे अनेक मोठमोठ्या वक्त्यांच्या वक्तृत्वापेक्षाही अधिक परिणामकारक ठरते.

एखाद्या अनन्यसाधारण व्यक्तीच्या विचाराचे सामर्थ्य फार मोठे असते आणि त्याचे परिणाम दूरगामी होऊ शकतात. असा दूरगामी परिणाम करू शकणारे लेखन मुळातून फार थोडे असते त्यामुळे

एखाद्या माणसाच्या आयुष्यात फार मोठ्या प्रमाणात सातत्याने उत्कृष्ट प्रतीचे लेखन करता येते, हा एक मोठा भ्रम आहे, असे सरदाराना वाटते. त्यामुळे ग्रंथ लेखनासाठी बैठक घालून लिहिणे आणि एकटाकी सातत्याने लिहित राहणे, हा त्यांच्या मनाचा धर्म नाही. चर्चा करता करता भाषणे देता देता, समाजातून वावरत असता आणि अध्यापनाच्या निमित्ताने कराव्या लागणाऱ्या वाचनातून समाजाशी, विद्यार्थ्यांशी संवाद कसा साधता येईल किंवा शिकविता शिकविता किंवा बोलता बोलता आपल्या कल्पना स्पष्ट कशा होत जातील, हे ते पाहत असताना दिसतात. या प्रक्रियेतून तावून-सुलाखून निघालेल्या विचारांची मग ते साक्षेपी माडणी करतील. त्यामुळे त्यांचे लेखन मोजकेच परंतु मौलिक स्वरूपाचे उतरले आहे. किंबहुना सरदारांनी आचार्य जावडेकरांप्रमाणे स्वतंत्र ग्रंथलेखन केले नाही, हे याठिकाणी मुद्दाम लक्षात घेण्यासारखे आहे. त्यांची व्याख्यानमालेसाठी निवड करावी, त्यांना एखाद्या संपादकाने गळ घालून विभागशः लेखन करण्यास त्यांना प्रवृत्त करावे, किंवा त्यांच्या गळयात त्यांच्या मित्रांनी कसले तरी संपादनकार्य अडकवावे, तेव्हाच सरदार लेखनास आपद्धर्म म्हणून प्रवृत्त झाल्याचे दिसून येतात. 'ज्ञानेश्वराची जीवननिष्ठा' हा ग्रंथ कौशिक व्याख्यानमालेतून न्यायमूर्ती रानडे यांच्या सामाजिक विचारविमर्षांचा वेध घेणारा ग्रंथ पुणे विद्यापीठ रानडे स्मारक व्याख्यामालेमुळे आणि 'आगरकरांचा सामाजिक तत्त्वविचार' हा ग्रंथ व्हीनस प्रकाशन व्याख्यानमालेतून साकार झाला आहे. 'महाराष्ट्र जीवन : प्रगती आणि परंपरा', 'संक्रमणकाळाचे आव्हान' इ. ग्रंथाचे संपादन त्याच्यावर लादण्यात आल्यानेच त्यांच्या हातून घडले आहे.

उपेक्षित व्यक्तीच्या कार्याकडे वळणाऱ्या सरदारांनी आयुष्याच्या उत्तरकाळात न्या. रानडे व आगरकर यांच्याकडे वळावे, ही घटनाही सरदाराच्या मनोवृत्तीवर चांगल्या रीतीने प्रकाश टाकणारी आहे. महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधनाचे श्रेय रानडे आणि आगरकर याच्या वैचारिक भूमिकेवर भक्कमपणे अधिष्ठित आहे आणि या महापुरुषाच्या वैचारिक कार्यात त्याच्या सामाजिक प्रगतशीलतेचा मोठाच भाग आहे सरदार मुळातच रानडे, भाडारकराच्या नेमस्त परंपरेचे पाईक. रानड्याची नेमस्त प्रागतिक विचारसरणी आणि आगरकराची जहाल सामाजिक विचारसरणी ही त्यांना राजनीतीचे सनदशीर मार्गाने दर्शन घडविणाऱ्या नामदार गोखल्यापेक्षा किंवा चळवळीचे उग्र स्वरूप देऊन लोकशक्ती जागृत करणाऱ्या टिळकांपेक्षा अधिक महत्त्वाची वाटते. कारण वीरपूजेपेक्षा, असंघटित आणि अर्धजागृत लोकशक्तीतील अर्धजागृत समाजाकडे दुर्लक्ष करून त्याला केवळ संघटित करू पाहणाऱ्या विचारसरणीपेक्षा हे सारे ज्या लोकासाठी करावयाचे, तो लोकसमूह त्यांना महत्त्वाचा वाटतो. त्यामुळेच लाख मरोत परंतु लाखाचा पोशिंदा जगो' असे मानणाऱ्या समाजाची वीरपूजा त्यांना निरर्थक वाटते. लाख मेल्यानंतर लाखांचा पोशिंदा कशासाठी पोसावयाचा असा ते प्रश्न विचारतात. लाखाचे पोशिंदेपण साजरे करण्याचे सामर्थ्य एखाददुसऱ्या व्यक्तीत निर्माण न होता त्या लाखांच्या हातातच ते सामर्थ्य प्राप्त व्हावे, असा समाज निर्माण करण्याची आवश्यकता ते प्रतिपादितात.

## सरदारांची विचारनिष्ठा

न्या. रानडे आणि आगरकराच्या भूमिकेत हीच दृष्टी पहिल्यादा प्रगट झाल्याचे त्याच्या लक्षात येते. जुन्या शास्त्रवचनाच्या आधाराने समन्वय साधून त्या जुन्या समाजरचनेच्या पल्याड जाण्याची दृष्टी देणारे न्या. रानड्याचे सारे जीवन त्याना वशिष्ट-वाल्मीकीप्रमाणे ऋषितुल्य वाटते, तर नव्या समाजरचनेसाठी बुद्धिवाद आणि व्यक्तिस्वातंत्र्य यांचा काटेकोर तराजू हाती घेऊन जुन्या समाजरचनेची जुनाट मूल्ये झुगारून देऊन या नव्या मूल्याधारे नवा मानव घडविण्यासाठी समन्वयापेक्षा संघर्षांवर भर देणाऱ्या आगरकरांच्या सामाजिक मूल्यभावही त्यांना श्रविप्रणीत जाज्वल्य वृत्तीचा द्योतक द्योतक वाटतो. त्या जाज्वल्य मनोवृत्तीमुळेच, 'आमच्या नीच मानलेल्या महारांची स्थिती सुधारून त्यांची व वेदशास्त्रसंपन्न ब्राह्मणाची एक पंगत झालेली जर आम्हास पाहता येती तर आम्ही स्वतःस मोठे कृतार्थ मानले असते, ही गोष्ट आम्ही आमच्या देशबांधवापासून चोरून ठेवू इच्छित नाही' असे नि.सकोचपणे जाहीर करून टाकणारे आगरकर सरदारांच्या दृष्टीने फार मोठे विचारवंत ठरतात. रानडे—आगरकर याच्या समाजविचाराचे मर्म हाती आल्याखेरीज महाराष्ट्रातील सामाजिक प्रबोधनाच्या कार्याचे नीट आकलन होणार नाही, हे या ग्रंथाद्वारे सरदारांनी दाखवून दिले आहे एकीकडे दलित वाङ्मय सत्यशोधक समाज व म. फुले या कार्याचे महत्त्व प्रस्थापित करू पाहणारे प्रा. सरदार दुसरीकडे न्या. रानडे व आगरकर याच्या कार्यांचेही महत्त्व प्रस्थापित करू पाहतात! महात्मा गांधीच्या कार्याची जोड या प्रबोधनातील आणखी एक मोठी शक्ती. प्रा. सरदार त्यांच्या कार्याचे विवेचन करण्यामागे सध्या गुतले आहेत. त्याचे हे विवेचन ज्यावेळी उजेडात येईल, त्यावेळी सरदारांच्या लेखणीचे आणखी एक परिणत रूप उजेडात येईल, यात काही शंका नाही.

अध्यापन, चिंतन, विचार प्रवर्तन यांबरोबरच आपल्या शक्तीप्रमाणे सरदार महाराष्ट्राच्या संस्थात्मक जीवनाच्या कार्यातही सातत्याने लक्ष घालताना दिसतात. महाराष्ट्र साहित्य परिषद, दाते ग्रंथ सूची मडळ इ. संस्यामध्ये त्यानी केलेले कार्य महत्त्वाचे आहे

बार्शी येथील साहित्य संमेलनाचे त्यांना अध्यक्षपद देऊन समाजाने त्याच्या वैचारिक व्यक्तिमत्त्वाला मुजरा केला आहे. त्यामध्ये आपलाही सहभाग व्यक्त करून त्यांच्या भावी विचारसंपदेची आपण आतुरतेने वाट पाहू या. □

# अफगाणिस्तानचे आव्हान : पृष्ठ ३ वरून

इराणचा शहा अमेरिकेचा मित्र. इराणमधील अमेरिकेच्या वाढत्या प्रभावाला शह म्हणून अफगाणिस्तानात आपला प्रभाव वाढविण्याचे धोरण रशियाने गेल्या दशकात अनुसरले त्यापूर्वीही अफगाण राज्यकर्त्यांचे रशियाशी मित्रत्वाचे संबंध होतेच. रशियन क्रांती-नंतरच्या सुरवातीच्या काळात १९१९–२० साली अफगाणिस्तानात अमानुल्लाची राजवट असताना अफगाणिस्तानला मदत करण्याचे धोरण रशियाने स्वीकारले होते. अमानुल्ला ब्रिटिश–विरोधी आणि सुधारणावादी मताचा होता. पण १९२९ च्या बडात त्याची सत्ता उलथली गेली. नंतर १९५३ मध्ये जनरल महमद दाऊद सत्ता हाती घेईपर्यंत अफगाणिस्तानात असलेल्या राजवटी रशियास अनुकूल नव्हत्या. दाऊद राजवटीचे रशियाशी सबध मैत्रीचे होते. पण इराणमधील अमेरिकेचा वाढता प्रभाव वाढू लागल्यावर दाऊदलाही आपल्या बाजूला वळविण्याचे प्रयत्न शहानी केले. त्याना काही प्रमाणात यश आल्याचे दिसले तेव्हा दाऊद राजवटीस विरोध करण्यासाठी खाल्क व पार्चम या दोन कम्युनिस्ट गटाचे नेते जून १९७७ मध्ये एकत्र आले आणि एप्रिल १९७८ मध्ये त्यानी दाऊद व त्याच्या कुटुंबियाची हत्या करून सत्ता हाती घेतली. पण त्याच्यातील एकजूट फार काळ टिकली नाही. सप्टेंबर १९७९ मध्य अध्यक्ष तराकीविरुद्ध उठाव होऊन ते मारले गले व हफीझुल्ला अमीन अध्यक्ष झाले. पण तीन महिन्यातच त्याच्याविरुद्ध उठाव होऊन बाब्राक कार्माल यानी सत्ता हाती घतली. पण यावेळची क्राती रशियन हस्तक्षपाने झाली. कार्माल रशियन फौजा-बरोबरच काबूलमध्ये आले. तराकी आणि अमीन दोघेही कम्युनिस्ट होते, रशियाच्या बाजूचे होते तरीही ते ठामपण नेहमी आपल्या बाजूलाच राहतील असा विश्वास रशियाला वाटत नव्हता. कम्युनिस्ट राजवटीविरुद्ध बडखोराचा प्रतिकार वाढत होता हा प्रतिकार पूर्णपणे मोडून अमीन अपुरे पडत आहेत असे दिसून आल्याने आपल्या पूर्ण प्रभावाखाली असलेल्या कार्मालला त्यानी सत्तेवर आणले. रशियाने सुरवातीला पाठविलेले सैनिक आणि गेल्या आठवड्यात पाठविलेली आणखी कुमक जमेस धरता एक लाखावर सैनिक त्यानी अफगाणिस्तानात पाठविले असावे असा पाश्चात्य निरीक्षकाचा अंदाज आहे. यापूर्वी हंगेरी आणि चेकोस्लोव्हाकियातील आपल्या बाजूच्या राजवटी वाचविण्यासाठी रशिया व वॉर्सा या राष्ट्राच्या फौजानी तेथे हस्तक्षेप केला होता. पण रशिया व पूर्व युरोपबाहेर रशियाने आपल्या फौजा पाठविण्याची ही पहिलीच वेळ होती. तसे आपण केले नाही तर बडखोराचा विजय होऊन पाश्चात्याना अनुकूल अशी राजवट अफगाणिस्तानात येईल अशी भीती रशियाला वाटत होती तेथ पहिली कम्युनिस्ट राजवट एप्रिल १९७८ मध्ये आली तेव्हापासूनच तिच्याविरुद्ध बडखोराचा लढा सघटित करावयाचा अशा योजना अमेरिकेने आखल्या होत्या. अफगाणिस्तानातून चार लाख निर्वासित पाकिस्तानात आले होते. त्याना शस्त्रे व लष्करी शिक्षण देऊन बडखोराची सेना उभी करण्यात आली होती. अमेरिका व चीनकडून त्याना शस्त्रे मिळत होती. रशियाविरुद्ध अमेरिका-पाकिस्तान-चीन अशी फळी उभी राहिली होती. अफगाणिस्तानातील रशियाच्या लष्करी हस्तक्षेपानतर तर अफगाण बंडखोराना अमेरिका शस्त्रे पुरवील तसेच पाकिस्तानला मोठ्या प्रमाणावर शस्त्रपुरवठा करील असे अध्यक्ष कार्टर यानी घोषित केले.

अमेरिका केवळ एवढ्यावरच थाबणार नाही. आपल्या मित्र राष्ट्राच्या सहकार्याने रशियाविरोधी लष्करी आघाडी अधिक बळकट करणार आहे तसेच रशियावर दडपण आणण्यासाठी आणखीही काही उपाय अमेरिकेने योजले आहेत. सहारक अण्वस्त्राची निर्मिती व वापर यावर मर्यादा घालण्या-सबंधी दुसऱ्या टप्प्यात करार ( सॉल्ट ) ब्रेझनेव्ह आणि कार्टर यांच्यात झालेला आहे. पण अमेरिकन कॉंग्रेसच्या मान्यतेशिवाय तो अमलात येऊ शकत नाही. या कराराला मान्यता देणे अमेरिकन कॉंग्रेसने आता बेमुदत लाबणीवर टाकले आहे तसेच रशियाशी झालेल्या करारानुसार त्याला पाठवावयाचे धान्य स्थगित केले आहे.

रशिया आणि अमेरिका याच्यात जे तणाव शिथिलतेचे संबंध प्रस्थापित झाले होते ते सपून थंडी लढाई आणि त्याचे पर्यवसान प्रत्यक्ष युद्धात होण्याचा धोका निर्माण झाला आहे. रशियाच्या अफगाणिस्तानातील हालचाली म्हणजे केवळ लष्करी हस्तक्षेप नसून आक्रमणच आहे. तेथील सरकारच्या विनतीनुसारच आमच्या फौजा तेथे गेल्या असे समर्थन रशियातर्फे करण्यात येत ,आहे. चेकोस्लोव्हाकियातील आक्रमणाचेही असेच समर्थन करण्यात आलेले होते. कम्युनिस्ट विरोधी बडखोराना मदत करून पाश्चात्य राष्ट्रानी कोणत्याही कम्युनिस्ट राजवटीस धोका निर्माण केला तर त्या राजवटीच्या रक्षणासाठी आम्ही फौजा पाठवू असे ब्रझनेव्ह याचे तत्त्व आहे. कम्युनिस्ट जगत हा एक राष्ट्रसमूह आहे. त्याच्यात आपसात सघर्ष असतील पण पाश्चात्य राष्ट्रे हस्तक्षेप करून आमची एखादी राजवट पाडू पाहतील तर ते आम्ही चालू देणार नाही. असा इशारा अफगाणिस्तानातील हस्तक्षेपाने रशियाने दिला आहे

मूलभूत प्रश्न असा उपस्थित होतो की, अफगाणिस्तानात कम्युनिस्ट राजवट आली तो तेथील जनतेच्या समतीने व पाठिंब्याने आला की रशियाच्या मदतीने आली ? अफगाणिस्तानात कम्युनिस्ट चळवळ असली तरी सत्ता हाती घण्याइतकी ती कधीच प्रबळ नव्हती. रशियाच्या पाठिंब्यानच तेथे कम्युनिस्ट राजवट येऊ शकली. रशियाने आपल्या फौजा काढून घतल्या पाहिजेत, तसेच अमेरिका, चान यानो बडखोराना मदत करण थाबविले पाहिज. अफगाणिस्तानातून पाकिस्तानात गलेल निर्वासित परतल पाहिजत. त्याना सुरक्षित जीवनाची हमी मिळायला हवी. अफगाणिस्तानात कोणत्या स्वरूपाचे सरकार हवे हे बाहरचा कोणताही हस्तक्षप होऊ न देता तेथील जनतेलाच लोकशाही

पद्धतीने ठरविण्याची संधी मिळायला हवी. बड्या राष्ट्रांना आपले वर्चस्व क्षेत्र वाढवायचे असल्याने ते अशी संधी देण्याची शक्यता नाही. त्याच्या सत्तास्पर्धेतूनच अफगाणिस्तानचा संघर्ष निर्माण झालेला आहे पण बड्या राष्ट्रांनी संघर्ष करायचेच ठरविले तर त्याना कोण रोखणार ? संयुक्तराष्ट्र संघटनेत ते सामर्थ्य नाही. बड्या राष्ट्रांना असलेल्या व्हेटो अधिकारामुळे संयुक्तराष्ट्र संघटना विनंतीवजा ठराव पास करण्यापलीकडे कोणतीही परिणामकारक कारवाई करू शकत नाही. अलिप्त राष्ट्राची संघटनाही दुबळी असून बड्या राष्ट्राना रोखू शकत नाही. युद्ध सुरू करणे किंवा टाळणे बड्या राष्ट्राच्याच हाती आहे. तिसरे महायुद्ध सुरू झाले तर त्यात सबंध जगाचाच विनाश आहे याची कल्पना बड्या राष्ट्राच्या नेत्याना आहे. तेव्हा शक्यतो महायुद्धाचा भडका उडू न देण्याचा प्रयत्न ते करतील पण एखाद्या अविचारी कृतीतून किंवा निर्णयातून केव्हा भडका उडेल सागता येत नाही. तेव्हा युद्ध टाळून समझोत्याचे मार्ग काढण्याबाबत जागतिक लोकमताचे दडपण सतत आणायला हवे.

गेली काही वर्षे आफ्रिका आणि आशियामध्ये रशिया आपले प्रभाव क्षेत्र वाढवीत आहे पोर्तुगीज वसाहती मुक्त झाल्यानंतर अंगोलामध्य अतर्गत यादवीयुद्ध सुरू झाले तेव्हा आपल्याला अनुकूल राजवट तेथे आणण्यासाठी रशियाने शस्त्र पुरविलो आणि क्यूबाने आपले स्वयसेवक पाठावले, एथिओपिया व येमेनमध्ये रशियाला अनुकूल असलेल्या राजवटी आल्या. दक्षिण आफ्रिका नामिबिया व ऱ्होडशियातोल आफ्रिकन राष्ट्रवाद्याच्या लढ्याला रशियाचो मदत मिळत आहे. आशिया व व्हिएतनाम रशियाच्या बाजूला असून अफगाणिस्तानात रशियाच्या बाजूची राजवट आलेली आहे. याला आताच पायबद घातला नाही तर इराण, पाकिस्तान रशियाच्या प्रभावाखाली जातील अशी भीती अमेरिकेला वाटते म्हणून रशियास अफगाणिस्तानमध्ये रोखावयाचे असा निर्धार अमेरिकेने केला आहे. ते वास्तविक अंगोलामध्येच रशियाला रोखले असले तर सध्याची वेळ आली नसती असे काही अमेरिकन निरीक्षकांना वाटते, हिटलरच्या नाझी साम्राज्याचे प्रसारास चेंबरलेनच्या धोरणाने मदत झाली तसे रशियाचे प्रभावक्षेत्र वाढण्यास अमेरिकेच्या धोरणाने मदत होत आहे. व्हिएतनाममधील पराभवानंतर आता कोणत्याही सघर्षात स्वत.ला गुरफटन घेण्याची अमेरिकेची तयारी नाही. याबद्दल रशियाची खात्री झालेली आहे अंगोलामध्ये अमेरिका काही करू शकली नाही, व्हिएतनामने काम्पूचियावर आक्रमण केले त्या वेळीही अमेरिका काही करू शकली नाही तेव्हा अफगाणिस्तानमध्येही अमेरिका आपल्याला परिणामकारक विरोध करणार नाही असा अदाज घेऊनच रशियाने तेथे आक्रमण केले.

रशियाविरुद्ध अमेरिकेने योजलेले उपाय पुरेसे परिणामकारक आहे व का ? सॉल्ट कराराच्या दुसऱ्या टप्प्याला मंजुरी लाबली याचा अर्थ अण्वस्त्रनिर्मिती व रशिया–अमेरिकेची स्पर्धा चालू राहणार त्याचा फायदा अमेरिकेला मिळणार, तसाच रशियालाही मिळणार. रशियाला धान्य पाठविणे बद केल्याचाही रशियावर फारसा परिणाम होणार नाही. रशियन नागरिकाना उपाशी राहण्याची वेळ येणार नाही. धान्य बद झाल्याचा परिणाम पुढच्या वर्षी जाणवेल. पण तोपर्यंत रशिया दुसरीकडून धान्य मिळवू शकेल. नाटो राष्ट्रानी आपला सरक्षण खर्च तीन टक्क्यानी वाढवावा अशी सूचना अमेरिकेने केली आहे. हिंदी महासागरात अमेरिका आपलं आरमारी सामर्थ्य वाढवीत आहे. दिएगो गार्शियाचा तळ त्यानी वाढविला आहे. सोमालिया, एडन, ओमान येथील लष्करी बळाचा उपयोग करण्याची सवलत मिळविण्याच्या दृष्टीने अमेरिकेच्या हालचाली चालू आहेत. चीनचाही उपयोग अमेरिकेला होऊ शकेल, चीनने पाकिस्तानला जोडणारा जो काराकोरम मार्ग बाधला आहे. तो लष्करी दृष्ट्या महत्त्वाचा असून पाकिस्तानला मोठ्या प्रमाणावर लष्करी मदत चीन या मार्गाने करू शकेल. भारताच्या ईशान्य सीमा भागात अस्थिरता आहे. तेथे नागा, मिझो बडखोराना मदत चीन कडून मिळेल. वायव्य सीमेवरील घटनाकडे लक्ष देत असतानाच ईशान्य सीमेच्या सुरक्षिततेकडेही भारताला लक्ष द्यावे लागेल.

अलिप्त राष्ट्रानी सघटित होणे हाच बड्या राष्ट्रांचा हस्तक्षेप थांबविण्याचा परिणामकारक मार्ग आहे. आमचे प्रश्न आम्ही सोडवितो. तुमचा हस्तक्षेप थाबवा असे या राष्ट्रानी बड्या राष्ट्राना सांगितले पाहिजे. पण अलिप्त राष्ट्रे खऱ्या अर्थाने अलिप्त आहेत कोठे ? त्यापैकी बरीच राष्ट्रे कोणत्या तरी बड्या राष्ट्राच्या मदतीवर अवलबून आहेत. या मर्यादा लक्षात घेऊनही अलिप्त राष्ट्राची संघटना बळकट करण्याचे प्रयत्न करायला हवेत. अफगाणिस्तानातील घटनाकडे भारताने वास्तविक गेली काही वर्षे जागरूकतेने लक्ष ठेवून तो रशियाच्या प्रभावाखाली जाऊ न देता त्याची तटस्थता ठिकविण्यासाठी आग्रह धरायला हवा होता. या मागणीसाठी अलिप्त राष्ट्राचे लोकमत संघटित करायला हवे होते. पण नेहरूंच्या काळापासूनच आपले अलिप्ततेचे धोरण दुबळेच राहिले आहे. जागतिक राजकारणावर प्रभाव पाडू शकणारी शक्ती त्यातून निर्माण होऊ शकलेली नाही.

हिमालयाला लागून असलेल्या राष्ट्राचा एक महासंघ ( को-फेडरेशन ) स्थापन करण्याच्या योजनेचाही या अनुषंगाने पुन: विचार व्हावा. डॉ. लोहियानी ही कल्पना मांडली होती. या सीमा भागातील राष्ट्रे खऱ्या अर्थाने अलिप्त राहिली तर अफगाणिस्तान ते नेपाळ, ब्रह्मदेश पर्यंतच्या राष्ट्राचा महासंघ स्थापन होऊ शकेल. पण अफगाणिस्तान रशियाच्या गटात व पाकिस्तान अमेरिकेच्या गटात आहे. हे लक्षात घेता सध्या तरी ही कल्पना मूर्त स्वरूपात येणे शक्य दिसत नाही. तरीही या राष्ट्राना बड्या राष्ट्राच्या प्रभावाखालून बाजूला काढून महासंघाची कल्पना पटवून देण्याचे प्रयत्न करायला हवेत.

# रंगभूमी

मुकुंद संगोराम

# मेलो, मेलो, मेलो ड्रामा

## मराठी रंगभूमीवरील नवे आशादायी पाऊल

नाटकाचं नाव आहे 'कोसळे आज इथें देव्हारा अर्थात मेलो मेलो मेलो ड्रामा'. नावाचा पहिला भाग 'कोसळे आज इथे देव्हारा' हा कोणत्याही कौटुंबिक जिव्हाळ्याच्या व्यावसायिक नाटकाच्या नावाशी नातं सांगणारा, अर्थात नंतरचे पहिले दोन 'मेलो' हे वेगळ्या अर्थाचे आणि मग मेलोड्रामा. म्हणजे एवढं भलं मोठं नाव वाचल्यानंतर लक्षात रहातं ते 'मेलोड्रामा' एवढंच. अशा नावाचं नाटक 'ड्रॉपर्स' या संस्थेनं निम व्यावसायिक रंगभूमीवर आणलं आहे. ड्रॉपर्सचे पूर्वीचे प्रयोग आणि त्यांची पद्धत, याहून जरा निराळी वाट या नाटकात चोखाळली आहे. हे एक विडंबन नाट्य आहे. मराठी रंगभूमीवर विनोदी नाटके चांगलीच तग धरू शकतात. (उदा० मोरूची मावशी ते घरोघरी हीच बोंब ही एक परंपरा) पण विडंबन नाटयाचा प्रयोग हे प्रेक्षकांच्या दृष्टिकोनातून एक आव्हानच होतं. ड्रॉपर्सने ते स्वीकारलं...यशस्वीही करून दाखवलं.

मेलोड्रामा हे मराठी रंगभूमीवर ठाण मांडून बसलेल्या तद्दन कोल्हटकरी स्टाईलच्या नाटकांचं विडंबन. भालचंद्र नेमाडयांनी एका मुलाखतीत म्हटलंय की जोवर मराठी रंगभूमीवर कोल्हटकर आहेत तोवर रंगभूमीला उदय नाही. (शब्द माझे, आशय त्यांचा) कोल्हटकरांची नाटके प्रेक्षकांना रडवतात, हसवतात—प्रेक्षकही पैसे भरून ती करमणूक करून घेतात; पण कोल्हटकर कुठल्याही कौटुंबिक प्रश्नाला ज्या प्रकारे आणि पद्धतीनं सोल्यूशन किंवा पर्याय देतात, त्यांचा वास्तव जीवनाशी काहीएक संबंध नसतो. प्रेक्षकांना हवं असणारं सोल्यूशन देऊन कोल्हटकरी स्टाइलची नाटके सादर होतात. (यात कोल्हटकर ही व्यक्ती नसून तो संप्रदाय आहे हा विचार अनुस्यूत आहे.) ही सोल्यूशन्स किती खोटी, उपरी, ढोबळ आणि अवास्तव असतात यांचं दर्शन 'मेलोड्रामा'मध्ये घडतं. लेखक मुकुंद टाकसाळे यांचं याबतीतलं कीन ऑब्झर्वेशन आणि स्टाईल उल्लेखनीयच आहे.

हे नाटकच मुळी 'प्राचीन काळापासून मराठी रंगभूमीवर ठाण मांडून बसलेल्या ताई, भाऊ, गडी, दिवाणखाना, तुळशी वृंदावन वगैरे वगैरे गोष्टींना सादर वंदन करून' सादर केलं आहे.

मेलोड्रामाची कथा कुठल्याही तथाकथित कौटुंबिक जिव्हाळ्याच्या नाटकाच्या कथेशी मिळतीजुळती आहे. एक सद्‌गुणी सत्शील ताई आपल्या वाईट संगतीमुळे वाया गेलेल्या आपल्या भावाला (सदाला) ताळ्यावर आणण्याऐवजी त्याला पाठीशीच घालते. आई नाही म्हणून घर पोरकं—ताई तर सद्‌गुणांची पुतळी. वडीलच त्यांचे आई आणि वडील. आईविना पोरका झालेला सदा मित्रांच्या संगतीने बिघडतो म्हणजे हॉटेलात जातो, सिगारेट ओढतो, सिनेमा काढायचे खूळही डोक्यात घेतो. शेजारचे गॅरेजवाले काका आणि सदाचे बाबा हे बालमित्र, बालपणीच्या आणाभाकांप्रमाणे काकांची मुलगी सदाला द्यायची हे ठरलेलं. त्या दोघांचं प्रेमहीवडिलांच्या आणाभाकांवरच सदाचा मानलेला भाऊ उदय – हुशार अन चुणचुणीत. सदाचा सिनेमा तयार करण्याची असलेली आर्थिक गरज कृष्णकुमार संकटकर भागवतो पण त्या बदल्यात ताईचा हात हातात देण्याचे सदाकडून लिहून घेतो. रीतीप्रमाणेच सदाचे आणि बाबांचे अजिबात पटत नाही. सिनेमा साफ कोसळतो मग संकटकराच्या चकरा सुरू होतात. आयत्यावेळी नेहमीप्रमाणे शेजारचे काका आणि घरातला नोकर वीस हजार रुपये उभे करून लाज राखतात. मग सदाच्या सिनेमाचे डबे उदय अमेरिकेला घेऊन जातो तिथे फिल्म फेस्टिवल मध्ये त्याला ऐंशी हजाराचं बक्षीस मिळतं ते पैसे तार मनिऑर्डरने येतात आणि ताईवरचं संकट टळतं. कथानकात गुंतागुंत असली तरी ती सादर करताना दिग्दर्शक श्री. अनंत कुलकर्णी यांनी फारच वेगळी ट्रीटमेंट देऊन नाटकाचा गाभा जसाच्या तसा प्रेक्षकांपर्यंत पोचविण्यात यश मिळवले आहे.

यात प्रत्येक पात्राला त्याची म्हणून इमेज देण्याचा प्रयत्न लेखकाने केला आहे. बाबा बायको गेल्यापासून एकटेच पण घरातला नोकर हरबा याच्याबरोबर असलेली morbid relationship संवादातून दिसते. सदा हा एक कवी. त्याला सदाचीच काव्यं स्फुरत असतात. पण तो अत्यंत सुशील. त्याचा जो चित्रपट असतो त्यात सेन्सॉर बोर्ड काहीच कापत नाही उलट वाढवायला सांगतो. त्यामुळे त्याच्या नऊवारीतल्या ताईला रस्त्यानं जाताना कुणी खडे मारणार नसतं.

किंवा काळाबाजार थांबणार होता असा हा भाबडा सदा नाटकभर अतिशय भाबडेपणानेच वावरत असतो. ताई हे तर नाटकाचे केंद्रवर्ती पात्र. मराठी रंगभूमीवर ठाण माडून बसलेल्या तुळशी वृंदावनाशी संगत असलेली ही ताई घरात तुळशी वृंदावनाला जागा नसल्याने ढकलगाडीवर डालडाच्या मोठ्या डब्यात तुळशी लावते आणि मनोमन पूजते. एके ठिकाणी ताई म्हणते की पृथ्वीवर प्रलय होईल, चंद्र उगवणारच नाही...पण मी मात्र नऊवारीतच राहीन. अशी ही ताई, मूर्तिमंत शील, हे रंगभूमीवरील प्रातिनिधिक पात्र. *कौटुंबिक नाटकामधील या व अशा पात्रांच्या* असुसंगत वागण्याची परंपरा मेलोड्रामामधेही आहे. फक्त संपूर्णपणे उपहासात्मक पद्धतीने टाकसाळे अशा भाबड्या आणि अवास्तव व्यक्तिरेखांना हेरून त्यांच्यातील उपहास उघडा करतात ताईनं नऊवारीत राहणं, दादानं स्मगलरांनाही स्मगलिंग सोडायला लावेल असा 'सुसंस्कृत' चित्रपट काढण्याचं खूळ डोक्यात घेणं, स्कूटरवाले काकाचं 'चार पॉइंट ऑईल खा' अशा आशयाचे उद्‌गार, दोघाच्या वडिलाच्या लहानपणीच्या खेळतानाच्या आणाभाकांवर प्रेम करणारे दादा आणि प्रिया...या सर्वच गोष्टीतून टाकसाळे आजच्या जीवनाशी सुसंगत असलेला आशय शोधण्याचा प्रयत्न उपहासगर्भितेतून करतात.

प्रश्न खरे आणि उत्तरं मात्र फसवी हे कौटुंबिक नाटकांचं तत्त्व, या फसव्या उत्तरासाठी येणारे योगायोग याही नाटकात आहेत. पण ते फसवे आहेत हे प्रेक्षकाना पहिल्यापासूनच सांगितलेलं असतं. संकटात पडलेल्या सदाला त्याचे पळून गेलेले बाबा पोस्टमनच्या रूपात येऊन तार-मनिऑर्डर देतात–हे इतकं फसवं आहे – असं घडावंसं वाटतं पण तसं घडत नसतं आणि हेच आपलं वास्तव जीवन. आहे ही यामागची भूमिका असली, पाहिजे.

मेलोड्रामातील 'सदादादा' हे पात्रही असंच फुलवत नेलेलं आहे. अतिशय हळवा. भाबडा असा हा कवी सदा सदैव कविताच करतो. आणि एक चित्रपट काढायचं ठरवतो. चित्रपट पडतो तेव्हा त्याच्या तोंडच्या काव्यपंक्ती म्हणजे त्या व्यक्तिरेखेचं एक मनोज्ञ दर्शन आहे. त्या पंक्ती अशा 'कदर नाही ग कुणा कलेची–विघडून गेली अभिरूची। पुरणपोळी ही नकोच वाटे–मिसळीची ती मस्त रुची। दौत टाक तो टाकून देती – सवय हाताला बॉलपेनची। नको नको ती बैठक येथे कुमार आणि भीमसेनची। रेकॉर्डीवरच्या गाण्यावर खूष जमाना सारा कोसळे आज इथे देव्हारा.'

मेलोड्रामातील अशी प्रत्येक व्यक्तिरेखा मेलोड्रॅमॅटिक आहे. हुंदके, हंबरडा, आसवं, लाडंलाडं बोलणं, लटकं रुसणं फुगणं, याची रेलचेल असली तरी त्यामागे हेतुपूर्वक मेलोड्रामाचा सेन्स ठेवला गेला आहे. ही या नाटकाची सर्वात महत्त्वाची जमेची बाजू. 'रंगमंचावर नट रडत असतो आणि प्रेक्षक *मात्र हसत असतो हे या नाटकाचे यश.*

रंगभूमीवरील आजपर्यंतची नाटके पाहणाऱ्या प्रेक्षकाना आपण नाटक पाहतो म्हणजे मेलोड्रामा पाहतो याची जाणीवच नाही आहे. मराठी (तथाकथित) प्रेक्षकांची अभिरुची या संदर्भात पुन्हा तपासायला हवी आहे. या नाटकाने याबाबतीत एक नवे, महत्त्वाचे पाऊल उचललं आहे. आपल्या कौटुंबिक, जिव्हाळ्याच्या नाटकात एकूणच परंपरागत सामाजिक मूल्ये ढोबळपणे, खोटेपणाने व्यक्त होत आली. त्यामधील त्याग, मग तो गड्याचा धन्यासाठी किंवा भावाने मानलेल्या भावासाठी केलेला असो पण तो अगदी आदर्शाहून वरच्या पातळीवरील असतो. म्हणून ते प्रसंग अधिक हास्यास्पदच होतात, फक्त प्रेक्षकांना (च) त्याची जाणीव नसते. मेलोड्रामामध्ये तोच त्याग, तीच पुण्याई ढोबळपणे पण उपहासात्मक पद्धतीने मांडली आहे.

उदयनं वॉशिंग्टनला जाताना सदाच्या सिनेमाचे डबे नेऊन तिथल्या फेस्टिवलमधे दाखवणे, त्याला ८०,००० चं बक्षिस लागणं, आणि ती रक्कम तार मनीऑर्डरनं येणं अभिनंदनाचं पत्र मराठीत येणं किंवा गड्यानं सुद्धा भट्टीच्या कपड्यात राहणं अशा गोष्टी मराठी रंगभूमीवर नव्या नाहीत पण त्यातील खोटेपणा कुणाला समजतच नाही. (एका नाटकात तर हिरे एका पाकिटातून मिळतात.) मराठी लेखकांच्या अज्ञानाचा हा उपहास मेलोड्रामामध्ये अतिशय सुरेख पद्धतीनं माडला आहे. हा उपहास रंगभूमीचा, ठाण मांडून बसलेल्या पात्रांचा, कलाकाराच्या बटबटीतपणाचा आहे. तो नेमका आहे–उपरा नाही.

'मेलोड्रामा' ही मराठी रंगभूमीवरील एक आशादायी खूण जरूर आहे. रंगभूमीवरील ते बहुधा पहिलेच ३ अंकी विडंबन नाट्य असावे. त्या अर्थी आणि आशय, अभिव्यक्तीच्या संदर्भातही या नाटकाने बरेच भरीव कॉन्ट्रीब्यूशन दिलेले आहे. तरीही–

तरीही या नाटकामध्ये असलेल विडंबन कित्येक वेळा 'विडंबनापोटी विडंबन' अशा प्रकारे होते. काही विधायक (इथं राजकीय अर्थ अभिप्रेत नाही, Constructive या अर्थी) विडंबन संपूर्ण नाटकभर दिसत नाही. या उपहासामागची मूळ भूमिका मराठी *प्रेक्षकांना जागं करणं वगैरे असली, तशी* ती नाटकाच्या प्रयोगातली अभिव्यक्त होत असली तरीही काही वेळा ती भूमिका बाजूला पडते. उदाहरणच द्यायचे झाले तर स्कूटरवाल्या काकांचं बोलणं–काही एका मर्यादेपर्यंत त्यातील उपहास समजू शकतो पण नंतर मात्र ते फक्त हसवणं उरतं आणि इथे या नाटकाला काहीसं वेगळं वळण मिळतं अर्थात नाटकाच्या मूळ फॉर्मला त्यामुळे बाधा येते असे वाटत नाही हे खरे. (पात्रांच्या निवडीबाबतही संपूर्ण समाधान लाभलं नाही.)

मराठी रंगभूमीवरील एक नवा वेगळा 'प्रयोग' म्हणून मेलोड्रामाचं अभिनंदनच करायला हवं. दिग्दर्शक अनंत कुलकर्णी आणि सर्वच कलाकारानी संयमित ओव्हरॲक्टिंगचं भान प्रयोगभर राखलं.

मराठी प्रेक्षकानी या प्रयोगाचं स्वागत केलेलं आहेच पण तरीही यापुढील पाऊले उचलताना काही ठिकाणी जागरूक असणे आवश्यक आहे असे वाटते. □

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य,
लेखनस्वातंत्र्य या मूलभूत
मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना
विचार करायला लावणारी
प्रभावी जीवनकथा

**मॅक्झिम गॉर्की**

**सुमती देवस्थळे**

मूल्य दहा रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

# चित्रपट

सदानंद बोरसे

# लोक-परलोक

## एक परीकथा, एक फार्स, एक फॉर्म्युला

दक्षिणेतून विशेषतः मद्रासमधून आयात झालेल्या डोक्यांचे हिंदी कर्तृत्व जर पाहिले; तर एक तर सगळा कौटुंबिक, सोज्ज्वळ, आबालवृद्धांनी एकत्र बसून पाहण्यासारखा घरेलू सपक आळणी मामला, नाही तर एकदम दक्षिणेकडील सेक्स बॉंब, साऊथकडचा अमुक-तमुक बॉंब असा गरम मसाला. याशिवाय अन्य दिशेने चालणारी डोकी अंमळ कमीच. त्यामुळेच दिग्दर्शक रामाराव, छायाचित्रकार असेच कोणी स्वामी वा अप्पा अशी नावे वाचून, चित्रपटाचेही 'लोक-परलोक' असे जरा चमत्कारिक नाव ऐकून भीत भीतच चित्रपटाला गेलो आणि काय आश्चर्य, चित्रपट चक्क आवडला गेला.

चित्रपटाची कथा एकदम एखाद्या हॅन्स अँडरसनची परीकथा वाटावी अशी. म्हणजे अमर ( जितेंद्र ) नावाचा एक शूर वीर सद्‌गुणी तरुण गावच्या मगरूर जमीनदाराविरुद्ध (मदनपुरी) लढा देतो. त्यात कालीचरण अमरचा खून करतो. मग अमर स्वर्गात जातो. येथपासून हा संपूर्ण कथाप्रवाह एका बाजूला कल्पनारम्य परीकथेचा किनारा तर दुसऱ्या अंगाला विनोदी प्रहसनाचा काठ घेऊन या दोन्हीमधून छोट्या-छोट्या प्रसंगधारांनी, टीका-टिप्पणीच्या थेंबांनी सामाजिक राजकीय, आर्थिक आणि इतर बऱ्याच गोष्टींवर केलेल्या मल्लीनाथीच्या स्वरूपात वाहतो.

स्वर्गात गेलेला अमर (नाव अमर पण तो मरतो) अशी विसंगतीतून विनोद 'ही जुनीच फुटकळ युक्ती. नावांचा विनोदासाठी उपयोग चित्रपटात पुढेही करून घेतला आहे. उदाहरणार्थ, यमराज व चित्रगुप्त पृथ्वीवर आल्यानंतर स्वतःची नावे वाय्. एम्. राज आणि सी. एच्. गुप्ता अशी सांगतात. ) आपल्या अन्यायाविरुद्ध लढण्याच्या प्रवृत्तीने इंद्राला चक्रावून टाकतो, शिफ्ट ठरवून देण्यासाठी, ओव्हरटाईम मिळवून देण्यासाठी नरकातील यमदूतांची यमलोक मज्दूर युनियन उभारतो, त्यांचा संप घडवून आणतो, खुद्द यमालाही इतर देवांकडून त्याच्यावर कसा अन्याय घडतोय, हे पटवून देतो आणि त्याला यमलोकाला टाळेबंदी करायला सांगतो. यमाचे घटना-पुस्तक आता किती जुनाट झाले आहे हे जाणून घेण्यासाठी त्याला पृथ्वीची स्टडी-टूर काढायला सांगतो. या दरम्यान मुरारीचा भ्रष्टाचारी मुलगा धनंजय ( एका दगडात तीन पक्षी ), आणीबाणी (राय ? ) बरेलीचे मंत्री असे काही चावरे-बोचरे ओरखाडेही काढून घेतले आहेत; अमर मेनकेला 'कैसी माँ हो तुम जो-' असे एक हृदयफोडक भाषण ठोकून, शकुंतलेची आठवण करून देऊन नंतर भारताची स्तुती करणारे एक मस्त देशभक्तीपर भाषण ठोकतो. या सगळ्यातून नाटकीपणाने उथळ अन् बाजारू बनविलेल्या वात्सल्य, देशभक्ती इत्यादी प्रकारांची झकास टवाळी केली आहे. स्वर्गातही 'च्यायला, मेल्यापासून सतत आपलं या रंभा. मेनका, तिलोत्तमाचं नृत्य. कित्येक दिवसात हेलन, बिंदूचा कॅबेरे पाहिला नाही, राव.' म्हणून हळहळणारे नग आहेत. स्वर्गातही आपल्यालाच गाण्याचा हक्क आहे, म्हणून झगडणारे गंधर्व आहेत.

परलोकातील हे सगळे तेथेच सोडून, यमलोकात टाळेबंदी झाल्यावर अमर, यमराज व चित्रगुप्त पृथ्वीवर अवतरतात. यानंतरच्या अमरची कथा पार फॉर्म्युलातील (आणि म्हणूनच फुसकी) हिंदी चित्रपटी कथा. चित्रपटातील यानंतरचे सगळे रंगणारे रंग फिरत राहतात ते पृथ्वीवर अचंब्याने हिंडणाऱ्या, निरनिराळ्या लफड्यांमध्ये अडकणाऱ्या, त्यांतून कशीबशी स्वतःची सुटका करून घेणाऱ्या, पुन्हा नवीन लचांडात सापडून त्यातून सुटण्यासाठी धडपडणाऱ्या यमराज व चित्रगुप्ताच्या भोवती आणि पडद्यावर रंगत जातो एक अफलातून फार्स. यम व चित्रगुप्ताचा अजब पोषाख पाहून त्यांना शूटिंगवाले समजून पोलिसाने झापणे, रात्रीच्या वेळी दोघांच्या मागे कुत्री लागल्याने या मृत्युदेवाने व त्याच्या कारकुनाने जीव घेऊन पळणे, कोकाकोलाच्या चवीने खूष होऊन आचमने घेत बाटली संपविणे, आपल्याला छळणाऱ्या प्रत्येकाला चित्रगुप्ताने 'वर ये मग तुला दाखवतो' असे धमकावणे सगळेच अफलातून.

संपूर्ण चित्रपटाला एकच एक मूड बहाल करणे हिंदी चित्रपटाला फारसे जमत नाही. प्रत्येक चित्रपट म्हणजे वेगवेगळ्या भावनांच्या ठिगळांनी शिवलेली गोधडी असेल, तरच ती धंद्याची चांगली ऊब घेऊ शकते, असाच सगळ्यांचा सिद्धांत. त्यामुळे केवळ विनोदासाठी विनोद असे निखळ चित्रपट अक्षरशः हाताच्या बोटांवर मोजण्याइतके असतील. 'लोक परलोक' अशा निखळ चित्रपटांमध्ये बसत नाही; पण चित्रपटांच्या बराच जवळ पोहोचतो. चित्रपटात अगदी सुरुवातीपासून सुरू होणारा विनोदी मूड व टेंपो एका क्षणाचाही अपवाद न करता शेवटपर्यंत कायम राहतो अगदी अमरचा खूनसुद्धा केवळ प्रेक्षकाला अगंभीर बनवील एवढाच अभयानक घेतला नाही; तर

चांगला हसविण्याइतका विनोदी घेतला आहे. संपूर्ण चित्रपटाच्या प्रवाहात हा विनोदीपणा कायम दर्जेदार राहिला आहे, असे नाही. बरेचदा या प्रवाहात बाष्कळ, पोरकट विनोदी प्रसंगांची नालीही सोडली आहे. पण चित्रपट अशा प्रसंगांमधूनही विनोदीच उरतो.

या सगळ्याला गालबोट लावणारेही प्रकार या चित्रपटात आहेत. सर्वात उबग आणणारा प्रकार म्हणजे चित्रपटातील गीते. अपवाद फक्त यमलोकातील गाण्याचा. हे एक गाणे वगळता बाकी गीते म्हणजे फक्त अडचणच नव्हे तर अडगळगीते. याशिवाय नायक-नायिकानी घडीत काश्मीर (बर्फाच्छादित पर्वतरांगा) तर घडीत आंध्र वा तामिळनाडू अशा गोपुराच्या प्रदेशात जाणे पंचायत समिती असलेल्या चिल्लर गावात मैल-मैल पसरलेल्या बागा असणे अशा बारीक सारीक गंमतीही चित्रपटात भरपूर आहेत, पण त्यांच्याकडे दुर्लक्ष करून चित्रपटाचा मजा लुटावा.

चित्रपट मध्यंतरपर्यंत खायला मिळाला आहे तो जितेंद्रला. त्याने कामही चक्क सुसह्य केले आहे. नंतर चित्रपट कबजात जातो तो यमराज (प्रेमनाथ) आणि चित्रगुप्ताच्या (देवेन वर्मा.) 'जॉनी मेरा नाम' पासून 'जॉनी'सह तीन चार चित्रपटाचे अपवाद वगळता बाकी चित्रपटांमधून प्रेमनाथांचे काम अत्यंत एकसुरी, भडक आणि कर्कश असते. 'लोक–परलोक' मात्र त्या अपवादात्मक चित्रपटांमध्ये बसतो. पहिली गोष्ट म्हणजे आपल्या आडव्या तिडव्या देहामुळे आणि संपूर्ण रंगभूषेमुळे तो यम म्हणून भलताच शोभून दिसला. शिवाय निष्कारण आरडाओरड न करता त्याने यमाचा आब तर सांभाळलाच. शिवाय चित्रपट विनोदी । हेही कायम लक्षात ठेवले. वेगवेगळ्या भावना व्यक्त करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारे वापरलेला 'यमुंडा' हा शब्द तर विसरणे शक्यच नाही. देवेन वर्मांही चित्रगुप्त म्हणून केवळ भन्नाट. मदनपुरी, अमजदखान यांच्या छोट्या भूमिकाही उल्लेखनीय.

चित्रपटाचे संवाद ही चित्रपटाची आणखी एक जमेची बाजू. चित्रपटाच्या विनोदाची आघाडी या संवादांनी उत्तम सांभाळली. विशेषत: जितेंद्रने आधुनिक भाषेत इंद्र, मेनका, यमदूत, चित्रगुप्त इत्यादींशी केलेले निरनिराळ्या गोष्टींवरील ताशेरे या अशा या संवादाच्या चागल्याच चमकदार जागा.

अशा या सर्व गुणदोषासकट एक परीकथा, एक फार्स व एक फॉर्म्युला याच्या मिश्रणातून घडविलेली ही लोक–परलोकाची सफर चांगलीच मनोरंजक बनली आहे. *

# नौकर

## तुम्हाला जया भादुरी आवडते का ?

तुम्हाला जया भादुरी आवडते का ? मला आवडते आणि केवळ म्हणूनच मी 'नौकर' पाहिला आणि कदाचित केवळ म्हणूनच तो मला नावडला नाही.

अन्यथा या चित्रपटात काय आहे ?

एक अत्यंत साधी सरळ कथा आहे. म्हणजे एक तो, एक ती–दोघाचे प्रेम जमते व लग्न होते. मग या सरळ तारेवर उगाचच तो विधुर, त्याला एक छोटी मुलगी असा सावत्रपणा, वात्सल्यपणा इत्यादी चिमटे अडकवले आहेत, निष्कारणच दोन बाजू असलेले प्रेमाचे त्रिकोण लटकवले आहेत, बराच वेळ हलका फुलका वगैरे वाटणाऱ्या चित्रपटात शवटी एक मानसिक कौटुंबिक वगैर संघर्षाचा खडा सारून दिला आहे. त्यामुळे कथेत नाविन्य वगैरे काही नाही.

इस्माईल मेमन याच्या या साध्या कथेची पटकथा आणि संवाद मात्र (शेवटची सुमारे वीस मिनिटे वगळता) पं. मुखराम शर्मांनी अगदी बासू चटर्जी शैलीत म्हणजे 'हलके फुलके, खुसखुशीत' वगैरे वगैरे लिहिले आहेत. चित्रपट नावडला नाही, त्यात एक छोटा वाटा याचाही होता.

यानंतरचा वाटा कलाकाराचा. जया भादुरी आवडते म्हटल्यावर प्रश्नच मिटला. तिने गीताची भूमिका खरोखरच चांगली केली आहे; पण यापूर्वीच्या कोणत्याही चित्रपटात दिसली नव्हती इतकी वाईट ती 'नौकर'मध्ये दिसते. हा 'नौकर'च्या छायाचित्रकाराचा दोष मानावा की आधीच्या छायाचित्रकारांचे कौशल्य की जयाचेच काहीतरी बिनसले ? असो. तिचे असे पडद्यावर दिसणेही गुड्डी, उपहारापासून कोशिश, अभिमानपर्यंतच्या रम्य स्मृती चाळवणारे होते. संजीवकुमारबद्दल वेगळे काय लिहिणार ? आपल्या परीसस्पर्शाने त्याने आणखी एका सामान्य भूमिकेचे सोने केले आहे. आणखी दोघाचा उल्लेख करायलाच हवा. एक–मेहमूद. बऱ्याच दिवसांनी मेहमूदने बरीच संयमित, कमी थिल्लर, कमी उथळ अशी विनोदी भूमिका केली. मुख्य म्हणजे हल्ली त्याच्या बऱ्याच कामांमधून डोकावणारा भडक बीभत्सपणा या भूमिकेत अजिबात दिसू न दिल्याने त्यालासुद्धा पडद्यावर बघणे सुसह्य वाटले. दुसरी व्यक्ती म्हणजे छोट्या आरतीची भूमिका केलेली चिमुरडी. आपल्या सहज आणि उत्स्फूर्त वाटणाऱ्या प्रतिक्रियानी या चिमुरडीने प्रत्येक प्रसंग विलक्षण खुलवला. आणि तरीही या प्रतिक्रियांनी तिचे निरागस सानुलेपण कुठेही मारले नाही, तिला हिंदी चित्रपटातील पोरांच्या वाट्याला हमखास येणारा उद्धटपणाही दिला नाही वा तिच्या खांद्यावर म्हातारे डोकेही चिकटवले नाही.

नौकरच्या बाबतीत आणखी एका गोष्टीकडे आवर्जून बोट दाखवायला हवे, ती म्हणजे संगीत. गीतकार मजरूह सुलतानपुरी व संगीतकार राहूलदेव बर्मन यांनी मोजकी चारच गाणी पण फारच सुरेख बनविली आहेत. राहूलदेव बर्मनचे अलीकडचे बरे संगीतच नेमके दुर्लक्षित राहते वा फारसे लोकप्रिय होत नाही. 'मंझिल' हे असेच आणखी एक उदाहरण. 'अखियो मे छोटे छोटे सपने सजाय के' ही किशोर व लताची लोरी, 'पल्लो लटके' हे द्वंद्वगीत, 'आया ना करो गुंडिया मेरे पास' हे आशाचे दर्दभरे गाणे आणि रफी व आशाने म्हटलेली कव्वाली ही चारी गाणी अतिशय सरस उतरली आहेत.

पण संजीवकुमार, मेहमूद, संगीत इत्यादी जमा धरूनही "नौकर पाहावा की नाही ?" याचे उत्तर एकच–

तुम्हाला जया भादुरी आवडते का ? □